


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अकोला, रविवार १५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्याक बनवले जातेय

## मोदींचा ममता सरकारवर थेट हल्ला

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील परिवर्तन संकल्प यात्रा सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या निर्मम सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे.तृणमूल काँग्रेसने सभेला येणा-या नागरिकांना चोर म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे.



आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.


**आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा-**यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रु पयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत.

**पंतप्रधान आवास योजनेचा उल्लेख-**याशिवाय, पंतप्रधान आवास योजनेच्या यशासंदर्भात ⇨(पान २ वर)

# वांगचुक यांची नजरकैद रद्द

## एनएसएअंतर्गत केलेली कारवाई मागे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लडाखमधील पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या विरोधातील नजरकैद तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार लागू केलेली कारवाई मागे घेतल्याची माहिती दिली आहे.गृह मंत्रालयाने यासंदर्भात निवेदन जारी केले असून सरकार लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे. सर्व संबंधित पक्षांशी संवाद घडवून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. मंत्रालयाच्या निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, लडाखच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्याची



सरकारची भूमिका कायम आहे. तसेच लडाखशी संबंधित मुद्दे चर्चेद्वारे आणि संवादाच्या माध्यमातून सोडवले जातील, अशी अपेक्षा सरकारने व्यक्तकेली आहे.


यासाठी उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून चर्चा केली जाईल. वांगचुक यांना गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये लेहमध्ये झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ताब्यात घेण्यात आले होते. त्या आंदोलनांमुळे लडाखमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर सरकारने सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी वांगचुक यांना ताब्यात घेतल्याचे सांगितले होते.सरकारने त्यांच्यावर नॅशनल⇨(पान २ वर)

### युद्धात किम जोग-उनची एंट्री; जपानमध्ये हायअलर्ट


# उत्तर कोरियाने डागले क्षेपणास्त्र

**टोकीयो /वृत्तसंस्था :** उत्तर कोरियाने पूर्व दिशेने समुद्राकडे संशयास्पद आंतरखंडीय (बॅलिस्टिक) क्षेपणास्त्र डागले असल्याची माहिती मिळत आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने याला दुजोरा दिला आहे. पश्चिम आशियात इराण-इस्रायल यांच्यात आधीच युद्धाचा भडका उडालेला असताना आता पूर्व आशियातही तणाव निर्माण होण्याची चिन्ह दिसत आहेत.

उत्तर कोरियाकडून होणा-या लष्करी हालचालीनंतर जपान सरकारने तातडीचा इशारा दिला आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सध्याच्या ताज्या



घडामोडींबद्दल जनतेने सतर्क राहावे. उत्तर कोरियाने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. पुढील माहिती लवकरात लवकर देउ. या घटनेनंतर जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची यांनी क्षेपणास्त्र प्रक्षेपण केलेल्या मार्गावर तात्काळ आपत्कालीन यंत्रणा सक्रिय केली आहे. फेब्रु वारी २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ताकायची यांनी प्रादेशिक सुरक्षा आणि जपानी भूभागाच्या संरक्षणावर आपण लक्ष देउ असे म्हटले होते. जपानच्या एनएचके या सरकारी वृत्तसंस्थेने शनिवारी दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या या नव्या शस्त्र चाचणीमुळे या प्रदेशातील सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले असून तणाव वाढला आहे. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपणानंतर⇨(पान २ वर)





# अनैतिक संबंधातून जन्मलेल्या संततीलाही समान अधिकार

## ● उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ● व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह !

**नागपूर/प्रतिनिधी :** पालकांनी केलेल्या चुकीची शिक्षा मुलांना देता येत नाही. विवाहबाह्य किंवा तथाकथित अनैतिक संबंधातून जन्मलेल्या मुलांनाही इतर मुलांप्रमाणेच अधिकार आहेत, असा महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना समाजातील बदलत्या वास्तवावर भाष्य करत मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली.

हा निर्णय एका पोलीस कान्स्टेबल पदाच्या निवडीशी संबंधित वादातून समोर आला. न्यायालयाने स्पष्ट केले की, पालकांच्या वैयक्तिक किंवा बेकायदेशीर कृतीमुळे मुलांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवता येणार नाही.

**पोलीस भरतीतून सुरू झाला वाद-**अकोला जिल्ह्यातील एका



पोलीस कर्मचा-याचे विवाहबाह्य संबंध होते. पहिल्या पत्नीपासून कायदेशीर घटस्फोट न घेता त्याने दुसरे लग्न केले आणि त्या संबंधातून एक मुलगा जन्माला आला. पुढे हा मुलगा न्यायालयीन कागदपत्रांत श्रावण (काल्पनिक नाव) पोलीस दलातील अपत्यांसाठी आरक्षित असलेल्या पोलीस कान्स्टेबल पदासाठी निवडला गेला.मात्र या निवडीला पहिल्या पत्नीच्या मुलाने प्रवीण (काल्पनिक नाव) उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्याचा दावा असा होता की, श्रावण हा अनैतिक संबंधातून जन्मलेला मुलगा असल्याने तो या नोकरीसाठी पात्र ठरू शकत नाही. प्रवीण प्रतीक्षा यादीत पहिल्या क्रमांकावर असल्याने श्रावणची निवड रद्द करून स्वतःची नियुक्ती करण्याची मागणी त्याने केली होती.

**मुलांचा जन्म त्यांच्या हातात नसतो-**या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने सांगितले की, मुलांचा जन्म कोणत्या परिस्थितीत होतो यावर त्यांचे नियंत्रण नसते. त्यामुळे पालकांच्या कृतीसाठी मुलांना दोषी धरता येणार नाही.खंडपीठाने नमूद केले की, समाजात अनैतिक म्हणून ओळखल्या जाणा-या संबंधातून जन्मलेली मुलेही निष्पाप असतात आणि त्यांना समान संधी व समान अधिकार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ जन्माच्या परिस्थितीचा आधार घेउन त्यांना नोकरी किंवा इतर लाभांपासून वंचित⇨(पान २ वर)

# ऑटोरिक्षातून महिलेवर लघवी; जमावाकडून तरुणाची हत्या

**चेन्नई /वृत्तसंस्था :** चेन्नईमध्ये एका धक्कादायक घटनेत महिलेवर लघवी केल्याच्या आरोपानंतर जमावाने केलेल्या मारहाणीत ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांची ओळख पटवण्यासाठी पोलिस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव कलाईसेलवन असे आहे. ही घटना बुधवारी (११ मार्च) घडली. त्या दिवशी कलाईसेलवन हा दारूच्या नशेत रस्त्यावरून जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याच वेळी एक महिला तिच्या मित्रासोबत ऑटोरिक्षातून प्रवास करत होती. या दरम्यान कलाईसेलवनने त्या महिलेवर लघवी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या महिलेने आणि तिच्या मित्राने कलाईसेलवनला जाब विचारला. यावेळी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद सुरू असताना आसपासच्या लोकांचे लक्ष त्या ठिकाणी गेले आणि काही वेळातच मोठी गर्दी जमा झाली. परिस्थिती अधिक तणावपूर्ण होत गेली आणि जमावातील काही लोकांनी कलाईसेलवनवर हल्ला करण्यास सुरुवात केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# प्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या

**पुणे/प्रतिनिधी :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूविषयी संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास करणा-या



यंत्रणांनी आपला अहवाल पुढच्या वर्षी द्यावा, पण प्रथम अजित पवार विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी मिटकरी यांनी केली आहे.

अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमानात अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या आमदारांनी असा दावा केला आहे. त्यात प्रामुख्याने रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करून तपास यंत्रणांवरील दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अजित पवार यांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे.अमोल मिटकरी आज एका पोस्टमध्ये म्हणाले, अजितदादा विमान दुर्घटना प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेला शंका असणारे कटाचे मुख्य सूत्रधार, सुमित कपूर, साहिल मदन, यश व यांचा बाप सिंग कुठाय तेही नंतर सांगा? डीजीसीएचा अंतिम अहवाल व ब्लैक बाक्स डेटा वाटल्यास पुढच्या वर्षी द्या निदान दादा विमानात बसतानाचा सीसीटीव्ही फुटेज तर महाराष्ट्रासमोर येउ द्या.










# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, रविवार १५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४





# पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्याक बनवले जातेय

## मोदींचा ममता सरकारवर थेट हल्ला

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील परिवर्तन संकल्प यात्रा सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या निर्मम सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे.तृणमूल काँग्रेसने सभेला येणा-या नागरिकांना चोर म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे.



आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.

**आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा-**यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रु पयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत.

**पंतप्रधान आवास योजनेचा उल्लेख-**याशिवाय, पंतप्रधान आवास योजनेच्या यशासंदर्भात ➪(पान २ वर)

# वांगचुक यांची नजरकैद रद्द

## एनएसएअंतर्गत केलेली कारवाई मागे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लडाखमधील पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या विरोधातील नजरकैद तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार लागू केलेली कारवाई मागे घेतल्याची माहिती दिली आहे.गृह मंत्रालयाने यासंदर्भात निवेदन जारी केले असून सरकार लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे. सर्व संबंधित पक्षांशी संवाद घडवून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. मंत्रालयाच्या निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, लडाखच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्याची सरकारची भूमिका कायम आहे. तसेच लडाखशी संबंधित मुद्दे चर्चेद्वारे आणि संवादाच्या माध्यमातून सोडवले जातील, अशी अपेक्षा सरकारने व्यक्तकेली आहे.




यासाठी उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून चर्चा केली जाईल. वांगचुक यांना गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये लेहमध्ये झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ताब्यात घेण्यात आले होते. त्या आंदोलनांमुळे लडाखमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर सरकारने सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी वांगचुक यांना ताब्यात घेतल्याचे सांगितले होते.सरकारने त्यांच्यावर नॅशनल ➪(पान २ वर)


## युद्धात किम जोग-उनची एंट्री; जपानमध्ये हायअलर्ट

# उत्तर कोरियाने डागले क्षेपणास्त्र

**टोकीयो /वृत्तसंस्था :** उत्तर कोरियाने पूर्व दिशेने समुद्राकडे संशयास्पद आंतरखंडीय (बॅलिस्टिक) क्षेपणास्त्र डागले असल्याची माहिती मिळत आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने याला दुजोरा दिला आहे. पश्चिम आशियात इराण-इस्रायल यांच्यात आधीच युद्धाचा भडका उडालेला असताना आता पूर्व आशियातही तणाव निर्माण होण्याची चिन्ह दिसत आहेत.



उत्तर कोरियाकडून होणा-या लष्करी हालचालीनंतर जपान सरकारने तातडीचा इशारा दिला आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सध्याच्या ताज्या घडामोडींबद्दल जनतेने सतर्क राहावे. उत्तर कोरियाने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. पुढील माहिती लवकरात लवकर देउ. या घटनेनंतर जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची यांनी क्षेपणास्त्र प्रक्षेपण केलेल्या मार्गावर तात्काळ आपत्कालीन यंत्रणा सक्रिय केली आहे. फेब्रु वारी २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ताकायची यांनी प्रादेशिक सुरक्षा आणि जपानी भूभागाच्या संरक्षणावर आपण लक्ष देउ असे म्हटले होते. जपानच्या एनएचके या सरकारी वृत्तसंस्थेने शनिवारी दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या या नव्या शस्त्र चाचणीमुळे या प्रदेशातील सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले असून तणाव वाढला आहे. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपणानंतर ➪(पान २ वर)




# अनैतिक संबंधांतून जन्मलेल्या संततीलाही समान अधिकार

## ● उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ● व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह!

**नागपूर/प्रतिनिधी :** पालकांनी केलेल्या चुकीची शिक्षा मुलांना देता येत नाही. विवाहबाह्य किंवा तथाकथित अनैतिक संबंधातून जन्मलेल्या मुलांनाही इतर मुलांप्रमाणेच अधिकार आहेत, असा महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना समाजातील बदलत्या वास्तवावर भाष्य करत मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली.

हा निर्णय एका पोलीस कान्स्टेबल पदाच्या निवडीशी संबंधित वादातून समोर आला. न्यायालयाने स्पष्ट केले की, पालकांच्या वैयक्तिक किंवा बेकायदेशीर कृतीमुळे मुलांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवता येणार नाही.

**पोलीस भरतीतून सुरू झाला वाद-**अकोला जिल्ह्यातील एका



पोलीस कर्मचा-याचे विवाहबाह्य संबंध होते. पहिल्या पत्नीपासून कायदेशीर घटस्फोट न घेता त्याने दुसरे लग्न केले आणि त्या संबंधातून एक मुलगा जन्माला आला. पुढे हा मुलगा न्यायालयीन कागदपत्रांत श्रावण (काल्पनिक नाव) पोलीस दलातील अपत्यांसाठी आरक्षित असलेल्या पोलीस कान्स्टेबल पदासाठी निवडला गेला.मात्र या निवडीला पहिल्या पत्नीच्या मुलाने प्रवीण (काल्पनिक नाव) उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्याचा दावा असा होता की, श्रावण हा अनैतिक संबंधातून जन्मलेला मुलगा असल्याने तो या नोकरीसाठी पात्र ठरू शकत नाही. प्रवीण प्रतीक्षा यादीत पहिल्या क्रमांकावर असल्याने श्रावणची निवड रद्द करून स्वतःची नियुक्ती करण्याची मागणी त्याने केली होती.

**मुलांचा जन्म त्यांच्या हातात नसतो-**या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने सांगितले की, मुलांचा जन्म कोणत्या परिस्थितीत होतो यावर त्यांचे नियंत्रण नसते. त्यामुळे पालकांच्या कृतीसाठी मुलांना दोषी धरता येणार नाही.खंडपीठाने नमूद केले की, समाजात अनैतिक म्हणून ओळखल्या जाणा-या संबंधातून जन्मलेली मुलेही निष्पाप असतात आणि त्यांना समान संधी व समान अधिकार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ जन्माच्या परिस्थितीचा आधार घेउन त्यांना नोकरी किंवा इतर लाभांपासून वंचित ➪(पान २ वर)

# ऑटोरिक्षातून महिलेवर लघवी; जमावाकडून तरुणाची हत्या

**चेन्नई /वृत्तसंस्था :** चेन्नईमध्ये एका धक्कादायक घटनेत महिलेवर लघवी केल्याच्या आरोपानंतर जमावाने केलेल्या मारहाणीत ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांची ओळख पटवण्यासाठी पोलिस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव कलाईसेलवन असे आहे. ही घटना बुधवारी (११ मार्च) घडली. त्या दिवशी कलाईसेलवन हा दारू च्या नशेत रस्त्यावरून जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याच वेळी एक महिला तिच्या मित्रासोबत ऑटोरिक्षातून प्रवास करत होती. या दरम्यान कलाईसेलवनने त्या महिलेवर लघवी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या महिलेने आणि तिच्या मित्राने कलाईसेलवनला जाब विचारला. यावेळी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद सुरू असताना आसपासच्या लोकांचे लक्ष त्या ठिकाणी गेले आणि काही वेळातच मोठी गर्दी जमा झाली. परिस्थिती अधिक तणावपूर्ण होत गेली आणि जमावातील काही लोकांनी कलाईसेलवनवर हल्ला करण्यास सुरुवात केल्याचे पोलिसांनी सांगितले.




# प्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या

**पुणे/प्रतिनिधी :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूविषयी संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास करणा-या यंत्रणांनी आपला अहवाल पुढच्या वर्षी द्यावा, पण प्रथम अजित पवार विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी मिटकरी यांनी केली आहे.



अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमानात अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या आमदारांनी असा दावा केला आहे. त्यात प्रामुख्याने रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करून तपास यंत्रणांवरील दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अजित पवार यांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे.अमोल मिटकरी आज एका पोस्टमध्ये म्हणाले, अजितदादा विमान दुर्घटना प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेला शंका असणारे कटाचे मुख्य सूत्रधार, सुमित कपूर, साहिल मदन, यश व यांचा बाप सिंग कुठाय तेही नंतर सांगा? डीजीसीएचा अंतिम अहवाल व ब्लैक बाक्स डेटा वाटल्यास पुढच्या वर्षी द्या निदान दादा विमानात बसतानाचा सीसीटीव्ही फुटेज तर महाराष्ट्रासमोर येउ द्या.






# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वाशीम, रविवार १५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्याक बनवले जातेय

## मोदींचा ममता सरकारवर थेट हल्ला

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील परिवर्तन संकल्प यात्रा सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या निर्मम सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे.तृणमूल काँग्रेसने सभेला येणा-या नागरिकांना चोर म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे.



आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.

**आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा-**यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रु पयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत.

**पंतप्रधान आवास योजनेचा उल्लेख-**याशिवाय, पंतप्रधान आवास योजनेच्या यशासंदर्भात (पान २ वर)

# वांगचुक यांची नजरकैद रद्द

## एनएसएअंतर्गत केलेली कारवाई मागे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लडाखमधील पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या विरोधातील नजरकैद तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार लागू केलेली कारवाई मागे घेतल्याची माहिती दिली आहे.गृह मंत्रालयाने यासंदर्भात निवेदन जारी केले असून सरकार लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे. सर्व संबंधित पक्षांशी संवाद घडवून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. मंत्रालयाच्या निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की,



लडाखच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्याची सरकारची भूमिका कायम आहे. तसेच लडाखशी संबंधित मुद्दे चर्चेद्वारे आणि संवादाच्या माध्यमातून सोडवले जातील, अशी अपेक्षा सरकारने व्यक्तकेली आहे.


यासाठी उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून चर्चा केली जाईल. वांगचुक यांना गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये लेहमध्ये झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ताब्यात घेण्यात आले होते. त्या आंदोलनांमुळे लडाखमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर सरकारने सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी वांगचुक यांना ताब्यात घेतल्याचे सांगितले होते.सरकारने त्यांच्यावर नॅशनल (पान २ वर)

## युद्धात किम जोग-उनची एंट्री; जपानमध्ये हायअलर्ट


# उत्तर कोरियाने डागले क्षेपणास्त्र

**टोकीयो /वृत्तसंस्था :** उत्तर कोरियाने पूर्व दिशेने समुद्राकडे संशयास्पद आंतरखंडीय (बॅलिस्टिक) क्षेपणास्त्र डागले असल्याची माहिती मिळत आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने याला दुजोरा दिला आहे. पश्चिम आशियात इराण-इस्रायल यांच्यात आधीच युद्धाचा भडका उडालेला असताना आता पूर्व आशियातही तणाव निर्माण होण्याची चिन्ह दिसत आहेत.

उत्तर कोरियाकडून होणा-या लष्करी हालचालीनंतर जपान सरकारने तातडीचा इशारा दिला आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सध्याच्या ताज्या



घडामोडींबद्दल जनतेने सतर्क राहावे. उत्तर कोरियाने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. पुढील माहिती लवकरात लवकर देउ. या घटनेनंतर जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची यांनी क्षेपणास्त्र प्रक्षेपण केलेल्या मार्गावर तात्काळ आपत्कालीन यंत्रणा सक्रिय केली आहे. फेब्रुवारी २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ताकायची यांनी प्रादेशिक सुरक्षा आणि जपानी भूभागाच्या संरक्षणावर आपण लक्ष देउ असे म्हटले होते. जपानच्या एनएचके या सरकारी वृत्तसंस्थेने शनिवारी दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या या नव्या शस्त्र चाचणीमुळे या प्रदेशातील सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले असून तणाव वाढला आहे. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपणानंतर (पान २ वर)





# अनैतिक संबंधांतून जन्मलेल्या संततीलाही समान अधिकार

## ● उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ● व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह !

**नागपूर/प्रतिनिधी :** पालकांनी केलेल्या चुकीची शिक्षा मुलांना देता येत नाही. विवाहबाह्य किंवा तथाकथित अनैतिक संबंधातून जन्मलेल्या मुलांनाही इतर मुलांप्रमाणेच अधिकार आहेत, असा महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना समाजातील बदलत्या वास्तवावर भाष्य करत मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली.

हा निर्णय एका पोलीस कान्स्टेबल पदाच्या निवडीशी संबंधित वादातून समोर आला. न्यायालयाने स्पष्ट केले की, पालकांच्या वैयक्तिक किंवा बेकायदेशीर कृतीमुळे मुलांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवता येणार नाही.

**पोलीस भरतीतून सुरू झाला वाद-**अकोला जिल्ह्यातील एका



पोलीस कर्मचा-याचे विवाहबाह्य संबंध होते. पहिल्या पत्नीपासून कायदेशीर घटस्फोट न घेता त्याने दुसरे लग्न केले आणि त्या संबंधातून एक मुलगा जन्माला आला. पुढे हा मुलगा न्यायालयीन कागदपत्रांत श्रावण (काल्पनिक नाव) पोलीस दलातील अपत्यांसाठी आरक्षित असलेल्या पोलीस कान्स्टेबल पदासाठी निवडला गेला.मात्र या निवडीला पहिल्या पत्नीच्या मुलाने प्रवीण (काल्पनिक नाव) उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्याचा दावा असा होता की, श्रावण हा अनैतिक संबंधातून जन्मलेला मुलगा असल्याने तो या नोकरीसाठी पात्र ठरू शकत नाही. प्रवीण प्रतीक्षा यादीत पहिल्या क्रमांकावर असल्याने श्रावणची निवड रद्द करून स्वतःची नियुक्ती करण्याची मागणी त्याने केली होती.

**मुलांचा जन्म त्यांच्या हातात नसतो-**या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने सांगितले की, मुलांचा जन्म कोणत्या परिस्थितीत होतो यावर त्यांचे नियंत्रण नसते. त्यामुळे पालकांच्या कृतीसाठी मुलांना दोषी धरता येणार नाही.खंडपीठाने नमूद केले की, समाजात अनैतिक म्हणून ओळखल्या जाणा-या संबंधातून जन्मलेली मुलेही निष्पाप असतात आणि त्यांना समान संधी व समान अधिकार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ जन्माच्या परिस्थितीचा आधार घेउन त्यांना नोकरी किंवा इतर लाभांपासून वंचित (पान २ वर)

# ऑटोरिक्षातून महिलेवर लघवी; जमावाकडून तरुणाची हत्या

**चेन्नई /वृत्तसंस्था :** चेन्नईमध्ये एका धक्कादायक घटनेत महिलेवर लघवी केल्याच्या आरोपानंतर जमावाने केलेल्या मारहाणीत ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांची ओळख पटवण्यासाठी पोलिस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव कलाईसेलवन असे आहे. ही घटना बुधवारी (११ मार्च) घडली. त्या दिवशी कलाईसेलवन हा दारूच्या नशेत रस्त्यावरून जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याच वेळी एक महिला तिच्या मित्रासोबत ऑटोरिक्षातून प्रवास करत होती. या दरम्यान कलाईसेलवनने त्या महिलेवर लघवी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या महिलेने आणि तिच्या मित्राने कलाईसेलवनला जाब विचारला. यावेळी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद सुरू असताना आसपासच्या लोकांचे लक्ष त्या ठिकाणी गेले आणि काही वेळातच मोठी गर्दी जमा झाली. परिस्थिती अधिक तणावपूर्ण होत गेली आणि जमावातील काही लोकांनी कलाईसेलवनवर हल्ला करण्यास सुरुवात केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# प्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या

**पुणे/प्रतिनिधी :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूविषयी संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास करणा-या



यंत्रणांनी आपला अहवाल पुढच्या वर्षी द्यावा, पण प्रथम अजित पवार विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी मिटकरी यांनी केली आहे.

अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमानात अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या आमदारांनी असा दावा केला आहे. त्यात प्रामुख्याने रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करून तपास यंत्रणांवरील दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अजित पवार यांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे.अमोल मिटकरी आज एका पोस्टमध्ये म्हणाले, अजितदादा विमान दुर्घटना प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेला शंका असणारे कटाचे मुख्य सूत्रधार, सुमित कपूर, साहिल मदन, यश व यांचा बाप सिंग कुठाय तेही नंतर सांगा? डीजीसीएचा अंतिम अहवाल व ब्लैक बाक्स डेटा वाटल्यास पुढच्या वर्षी द्या निदान दादा विमानात बसतानाचा सीसीटीव्ही फुटेज तर महाराष्ट्रासमोर येउ द्या.









# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अमरावती, रविवार १५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्याक बनवले जातेय

## मोदींचा ममता सरकारवर थेट हल्ला

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील परिवर्तन संकल्प यात्रा सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या निर्मम सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे.तृणमूल काँग्रेसने सभेला येणा-या नागरिकांना चोर म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे.



आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.

**आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा-**यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रु पर्यांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत.

**पंतप्रधान आवास योजनेचा उल्लेख-**याशिवाय, पंतप्रधान आवास योजनेच्या यशासंदर्भात⇨(पान २ वर)

# वांगचुक यांची नजरकैद रद्द

## एनएसएअंतर्गत केलेली कारवाई मागे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लडाखमधील पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने त्यांच्या विरोधातील नजरकैद तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाने राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार लागू केलेली कारवाई मागे घेतल्याची माहिती दिली आहे.गृह मंत्रालयाने यासंदर्भात निवेदन जारी केले असून सरकार लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हटले आहे. सर्व संबंधित पक्षांशी संवाद घडवून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले. मंत्रालयाच्या निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, लडाखच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना करण्याची सरकारची भूमिका कायम आहे. तसेच लडाखशी संबंधित मुद्दे चर्चेद्वारे आणि संवादाच्या माध्यमातून सोडवले जातील, अशी अपेक्षा सरकारने व्यक्तकेली आहे.




यासाठी उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून चर्चा केली जाईल. वांगचुक यांना गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये लेहमध्ये झालेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर ताब्यात घेण्यात आले होते. त्या आंदोलनांमुळे लडाखमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर सरकारने सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी वांगचुक यांना ताब्यात घेतल्याचे सांगितले होते.सरकारने त्यांच्यावर नॅशनल⇨(पान २ वर)


## युद्धात किम जोग-उनची एंट्री; जपानमध्ये हायअलर्ट

# उत्तर कोरियाने डागले क्षेपणास्त्र

**टोकीयो /वृत्तसंस्था :** उत्तर कोरियाने पूर्व दिशेने समुद्राकडे संशयास्पद आंतरखंडीय (बॅलिस्टिक) क्षेपणास्त्र डागले असल्याची माहिती मिळत आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने याला दुजोरा दिला आहे. पश्चिम आशियात इराण-इस्रायल यांच्यात आधीच युद्धाचा भडका उडालेला असताना आता पूर्व आशियातही तणाव निर्माण होण्याची चिन्ह दिसत आहेत.



उत्तर कोरियाकडून होणा-या लष्करी हालचालीनंतर जपान सरकारने तातडीचा इशारा दिला आहे. जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सध्याच्या ताज्या घडामोडींबद्दल जनतेने सतर्क राहावे. उत्तर कोरियाने आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले आहे. पुढील माहिती लवकरात लवकर देउ. या घटनेनंतर जपानच्या पंतप्रधान सनाए ताकायची यांनी क्षेपणास्त्र प्रक्षेपण केलेल्या मार्गावर तात्काळ आपत्कालीन यंत्रणा सक्रिय केली आहे. फेब्रुवारी २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ताकायची यांनी प्रादेशिक सुरक्षा आणि जपानी भूभागाच्या संरक्षणावर आपण लक्ष देउ असे म्हटले होते. जपानच्या एनएचके या सरकारी वृत्तसंस्थेने शनिवारी दिलेल्या वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या या नव्या शस्त्र चाचणीमुळे या प्रदेशातील सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले असून तणाव वाढला आहे. उत्तर कोरियाच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपणानंतर⇨(पान २ वर)





# अनैतिक संबंधांतून जन्मलेल्या संततीलाही समान अधिकार

## ● उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय ● व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह !

**नागपूर/प्रतिनिधी :** पालकांनी केलेल्या चुकीची शिक्षा मुलांना देता येत नाही. विवाहबाह्य किंवा तथाकथित अनैतिक संबंधातून जन्मलेल्या मुलांनाही इतर मुलांप्रमाणेच अधिकार आहेत, असा महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना समाजातील बदलत्या वास्तवावर भाष्य करत मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली.

हा निर्णय एका पोलीस कान्स्टेबल पदाच्या निवडीशी संबंधित वादातून समोर आला. न्यायालयाने स्पष्ट केले की, पालकांच्या वैयक्तिक किंवा बेकायदेशीर कृतीमुळे मुलांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवता येणार नाही.

**पोलीस भरतीतून सुरू झाला वाद-**अकोला जिल्ह्यातील एका



पोलीस कर्मचा-याचे विवाहबाह्य संबंध होते. पहिल्या पत्नीपासून कायदेशीर घटस्फोट न घेता त्याने दुसरे लग्न केले आणि त्या संबंधातून एक मुलगा जन्माला आला. पुढे हा मुलगा न्यायालयीन कागदपत्रांत श्रावण (काल्पनिक नाव) पोलीस दलातील अपत्यांसाठी आरक्षित असलेल्या पोलीस कान्स्टेबल पदासाठी निवडला गेला.मात्र या निवडीला पहिल्या पत्नीच्या मुलाने प्रवीण (काल्पनिक नाव) उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्याचा दावा असा होता की, श्रावण हा अनैतिक संबंधातून जन्मलेला मुलगा असल्याने तो या नोकरीसाठी पात्र ठरू शकत नाही. प्रवीण प्रतीक्षा यादीत पहिल्या क्रमांकावर असल्याने श्रावणची निवड रद्द करून स्वतःची नियुक्ती करण्याची मागणी त्याने केली होती.

**मुलांचा जन्म त्यांच्या हातात नसतो-**या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने सांगितले की, मुलांचा जन्म कोणत्या परिस्थितीत होतो यावर त्यांचे नियंत्रण नसते. त्यामुळे पालकांच्या कृतीसाठी मुलांना दोषी धरता येणार नाही.खंडपीठाने नमूद केले की, समाजात अनैतिक म्हणून ओळखल्या जाणा-या संबंधातून जन्मलेली मुलेही निष्पाप असतात आणि त्यांना समान संधी व समान अधिकार मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ जन्माच्या परिस्थितीचा आधार घेउन त्यांना नोकरी किंवा इतर लाभांपासून वंचित⇨(पान २ वर)

# ऑटोरिक्षातून महिलेवर लघवी; जमावाकडून तरुणाची हत्या

**चेन्नई /वृत्तसंस्था :** चेन्नईमध्ये एका धक्कादायक घटनेत महिलेवर लघवी केल्याच्या आरोपानंतर जमावाने केलेल्या मारहाणीत ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. हल्ल्यात सहभागी असलेल्या लोकांची ओळख पटवण्यासाठी पोलिस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव कलाईसेलवन असे आहे. ही घटना बुधवारी (११ मार्च) घडली. त्या दिवशी कलाईसेलवन हा दारूच्या नशेत रस्त्यावरून जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्याच वेळी एक महिला तिच्या मित्रासोबत ऑटोरिक्षातून प्रवास करत होती. या दरम्यान कलाईसेलवनने त्या महिलेवर लघवी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या महिलेने आणि तिच्या मित्राने कलाईसेलवनला जाब विचारला. यावेळी दोघांमध्ये जोरदार वाद झाला. हा वाद सुरू असताना आसपासच्या लोकांचे लक्ष त्या ठिकाणी गेले आणि काही वेळातच मोठी गर्दी जमा झाली. परिस्थिती अधिक तणावपूर्ण होत गेली आणि जमावातील काही लोकांनी कलाईसेलवनवर हल्ला करण्यास सुरुवात केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# प्रथम अजितदादा विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज द्या

**पुणे/प्रतिनिधी :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूविषयी संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तपास करणा-या यंत्रणांनी आपला अहवाल पुढच्या वर्षी द्यावा, पण प्रथम अजित पवार विमानात बसतानाचे सीसीटीव्ही फुटेज देण्याची मागणी मिटकरी यांनी केली आहे.



अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमानात अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या आमदारांनी असा दावा केला आहे. त्यात प्रामुख्याने रोहित पवार व अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करून तपास यंत्रणांवरील दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांनी शनिवारी पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे अजित पवार यांचा अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे.अमोल मिटकरी आज एका पोस्टमध्ये म्हणाले, अजितदादा विमान दुर्घटना प्रकरणात महाराष्ट्रातील जनतेला शंका असणारे कटाचे मुख्य सूत्रधार, सुमित कपूर, साहिल मदन, यश व यांचा बाप सिंग कुठाय तेही नंतर सांगा? डीजीसीएचा अंतिम अहवाल व ब्लैक बाक्स डेटा वाटल्यास पुढच्या वर्षी द्या निदान दादा विमानात बसतानाचा सीसीटीव्ही फुटेज तर महाराष्ट्रासमोर येउ द्या.






जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# धारणी शहरात गॅस एजन्सीकडून सिलेंडरची कृत्रिम टंचाई

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख शैलेंद्र मालवीय यांची तक्रार



**धारणी/प्रतिनिधीः-** शहरातील भाईजी HP गॅस एजन्सीकडून गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई निर्माण करून ग्राहकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख शैलेंद्र मालवीय यांनी उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्याकडे लेखी तक्रार देत तात्काळ चौकशी करून कठोर कारवाईची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, मागील आठ ते दहा दिवसांपासून धारणी तालुक्यातील HP गॅस ग्राहकांना सिलेंडर मिळविण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एजन्सीकडून मोबाईल बुकिंग सेवा बंद ठेवण्यात आल्याने नागरिकांना एजन्सी कार्यालयासमोर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेकांचे बुकिंग झालेले असतानाही त्यांना सिलेंडर घेण्यासाठी गोदामात पाठवले जात असून तेथेही प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मोबाईल बुकिंग सेवा मुद्दाम बंद ठेवून बाजारात सिलेंडरची काळाबाजारात विक्री करण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. यापूर्वीही या एजन्सीविरोधात धारणीपासून अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत तक्रारी करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मध्यप्रदेशातील देडतलाई, तुकईथड व खकनार भागांत सिलेंडर काळ्या बाजारात विक्री होत असल्याचे पुरावे समोर आले होते. पोलिस चौकशीतही संबंधित एजन्सीचे नाव पुढे आल्याचा दावा करण्यात आला असून आर्थिक बळाच्या जोरावर ही प्रकरणे दाबली गेल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

दरम्यान, सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिना सुरू असून तसेच हिंदू बांधवांचा चैत्र नवरात्रोत्सव देखील सुरू झाला आहे. या काळात दोन्ही धर्मीयांचे पवित्र सण सुरू असल्याने हा काळ हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आणि धार्मिक विधींचा अत्यंत महत्त्वाचा कालावधी मानला जातो. अशा संवेदनशील आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या काळात नागरिकांना गॅस सिलेंडरसाठी तासन्तास रांगेत उभे राहण्याची वेळ येणे ही अत्यंत अयोग्य आणि अमानवी बाब असल्याचे मालवीय यांनी नमूद केले आहे.

याशिवाय शासन नियमांनुसार गॅस सिलेंडरची घरपोच सेवा देणे बंधनकारक असतानाही एजन्सीकडून वितरणाची वाहने बंद ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ग्राहकांकडून सिलेंडरच्या नावावर जादा पैसे घेऊन पावतीही न देण्याच्या तक्रारी पुढे येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकारामुळे धारणीतील गॅस ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शैलेंद्र मालवीय यांनी प्रशासनाला दिला आहे.

# राहुल गांधीच्या पोस्टरवर व्यक्त केला संताप

## संसद परिसरात केलेल्या अशोभनीय कृतीचा भाजपाने केला निषेध



**अमरावती/प्रतिनिधीः-** काँग्रेस नेता व खासदार राहुल गांधी यांनी केंद्रीय अर्थसंकल्प सुरू असताना संसदेच्या द्वारावर गुरुवारी विचित्र प्रकारे आंदोलन केले. ही बाब लोकशाहीच्या मंदिरात घडणे अत्यंत खेदजनक आहे, असे सांगत भाजपा शहर जिल्ह्याच्या वतीने आज शनिवार १४ मार्च रोजी या अशोभनीय कृतीचा निषेध केला. राजकमल चौकात राहुल गांधीच्या पोस्टरवर चप्पल जोडे मारत संताप व्यक्त केला. जोरदार घोषणेबाजी करण्यात आली.

माहितीनुसार अर्थसंकल्प अधिवेशनादरम्यान काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वात संसदेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करण्यात आले होते. अशाप्रकारे आंदोलन करणे खेदजनक आहे. त्यांच्या या कृतीचा निषेध करत शहरात भाजपाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. भाजपा शहराध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांच्या नेतृत्वात आंदोलन करणाऱ्यांमध्ये किरण पातूरकर,बादल कुलकर्णी, राधा कुरिल,सुनिल खराटे, सचिन रासने, राजू कुरील, मिलिंद बांबल, गजानन देशमुख, कमल मालवीय आकाश पाटील, संजय शादी, लता देशमुख, लविना हर्षे , वंदना मडगे, विनोद तानबैस, राजेंद्र मेटे , कुणाल टिकले, उमेश निलगिरें, अलका सरदार, शैलेंद्र चव्हाण, प्रफुल बर्वे, तुषार चौधरी,आकाश पाटील, कीर्तिदीप सराफ,दिपक अनासाने, अशोक पंचारे, , आदित्य खैरकार, अनिकेत तारवाणी, मनीष आडविकार, भूषण हरकुट, रवी पारवे , भय्या तिरपुडे,, मिना पवार अंजली पाठक,उज्ज्वल महाजन, मनीषा मडोदे, सपना कंडलकर, गीता साहूकार, मीना कलप्रीति मकवाना, गीता सावरकर, मीना काळे, राधिका जोशी, अबोली लेंगे, संगीता बुरंगे आदिंचा सहभाग होता.

# बालकांचे संगोपन वाऱ्यावर

## एक वर्षापासून बालकांना लाभच मिळाला नाही

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाने अनाथ, निराधार,बेघर काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचो संगोपनासाठी देण्यात येणारी आर्थिक मदत गेल्या एक ते दीड वर्षापासून गरजू लाभार्थ्यांना मिळाली नसल्याने बालकांचे संगोपन धोक्यात आले असल्याचे दिसून येत आहे.याबाबत माहिती अशी की, महाराष्ट्र शासनाने अनाथ, निराधार, पालक नसलेल्या, बेघर, संकटात सापडलेल्या,काळजी व संरक्षणाच्या बालकांना शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत गरजा भागविण्या करिता ० ते १८ वर्ष वयोगटातील बालकांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना सुरू केली आहे.या योजनेची उद्दिष्ट सुद्धा चांगली आहे.ही योजना काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे भविष्य उज्वल करते अशी महत्वपूर्ण योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली आहे परंतु दप्तर दिरंगाई, प्रस्ताव तसेच पडून राहणे शासनास वेळोवेळी पाठपुरावा न करणे अशा अनेक कारणामुळे बाल संगोपन योजनेला खीळ बसत आहे. अमरावती जिल्ह्यातील महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत लाभार्थ्यांना जवळपास एक ते दीड वर्षापासून आर्थिक लाभ मिळाला नसल्यामुळे ०ते १८ वयोगटातील गरजू लाभार्थ्यांचे संगोपन धोक्यात आले आहे. गेल्या वर्षभरापासून लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही. त्यामुळे अशा बालकांचे संगोपन धोक्यात आले आहे.विशेष म्हणजे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेतील लाभार्थ्यांना दर महिन्याला लाभ दिल्या जात नसल्याने लाभार्थ्यांना गंभीर समस्यांना समोर जावे लागते. बाल संगोपन योजनेतील गरजू लाभार्थ्यांचे पैसे सहा महिन्याचे एकत्र किंवा वर्षभराचे एकत्र असा लाभ गरजू लाभार्थ्यांना दिला जातो. त्यामुळे लाभार्थ्यांना अनेक संकटाशी सामना करावा लागतो. दर महिन्याला बाल संगोपन योजनेतील लाभार्थ्यांना पैसे मिळाल्यास त्याचे संगोपन व्यवस्थित होऊ शकते. परंतु दर महिन्याला लाभार्थ्याला लाभ दिल्या जात नसल्याने लाभार्थ्यांमध्ये कारभाराबद्दल तीव्र संताप व्यक्त केल्या जात आहे.दर महिन्याला लाभार्थ्यांना का लाभ दिल्या जात नाही याची उच्चस्तरीय चौकशी शासनाने करावी अशी मागणी सुद्धा केल्या जात आहे.गरजू लाभार्थ्यांना जवळपास एक ते दीड वर्षापासून लाभ मिळाला नसल्याचे लाभार्थी सांगत आहे.

### पुण्याच्या कार्यालयाने माहिती घेतली

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेतील काही लाभार्थ्यांना लाभ मिळाला तर काहींना मिळाला नाही. मागील वर्षीचे काही लाभार्थी वंचित आहेत. आणि यावर्षीचे सुद्धा लाभार्थी आहेत. पुण्याच्या कार्यालयाने संपूर्ण डेटा घेतला असून चार-पाच दिवसांमध्ये मागील वर्षीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळेल.

-अतुल भडांगे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अमरावती.




# १७ ते २० मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

**मुंबई** : १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# भुयारी गटार योजनेच्या कृती आराखडा संदर्भात मंत्रालयस्तरावर बैठक लावावी

## -आ. सुलभा खोडके



**अमरावती/प्रतिनिधीः-** अर्थसंकल्पिय अनुदानावर विधानसभेत चर्चा करतांना आ. सुलभा खोडके यांनी चर्चा करतांना अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मल निस्सारण व स्वच्छतेची प्रभावी व्यवस्था उभी करण्यासाठी भुयारी गटार योजना प्रभावीपणे राबविण्याची गरज असल्याचे सांगितले. शहरी भुयारी गटार योजना गेल्या २८ वर्षांपासून निधी अभावी अर्धवटरित्या रखडलेली आहे. अमरावती महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता मनपा आपला स्वहिस्सा देऊ न शकत नसल्याने निधी अभावी अनेकदा भुयारी योजनेची कामे हाती घेणे शक्य नाही. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व पुढील तीन वर्षाचे भुयारी गटार योजनेचे नियोजन करायचे असल्याने अमरावती शहरात भुयारी गटार योजनाचे सुधारित प्रारूप कृती आराखडा हा २,५०० कोटींवर गेला आहे. अमरावती शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने हि योजना अत्यंत महत्वाकांक्षी असल्याने शासनाने याबाबत बैठक घेऊन योजनेच्या २,५०० कोटींच्या आराखड्यास मंजुरी देण्याची मागणी अमरावतीच्या आ. खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे.

# ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या 'खुल्या धोरणा'ला स्थगिती

## नवीन परवाने देण्यास तूर्तास बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने ऑटोरिक्षा आणि टॅक्सी परवान्यांबाबत सुरू असलेल्या 'खुल्या धोरणाला' तूर्तास स्थगिती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या निर्णयानुसार, नवीन परवान्यांसाठी दिले जाणारे 'इरादापत्र' देण्याचे काम थांबविण्यात आले असल्याची माहिती अमरावतीच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली आहे. नुकत्याच राज्याच्या परिवहन मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत या धोरणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी आणि विनंती अर्जांचा विचार करून हे निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाने १७ जुलै २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे जुन्या निर्णयांमध्ये बदल करून नवीन टॅक्सी आणि ऑटोरिक्षा परवाने जारी करण्यावरील निबंध हटवले होते, ज्यामुळे परवाने मिळणे सुलभ झाले होते. मात्र, या खुल्या धोरणामुळे रिक्षा व टॅक्सी व्यवसायावर परिणाम होत असल्याचे सांगत राज्यातील विविध संघटनांनी हे धोरण बंद करण्याची मागणी परिवहन आयुक्त कार्यालयाकडे लावून धरली होती.

या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार, आता नवीन परवाने देण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.

# मुलासह सुनेकडून आईचा छळ

**अमरावती** : मुलासह सुनेने माझा निवारा, सुरक्षितता, औषधोपचार व जीवनावश्यक गरजा हिरावून घेतल्याची तक्रार एका महिलेने शुक्रवारी राजापेठ पोलिस ठाण्यात नोंदविली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी विजय तुकाराम गजबे व एक महिला (दोन्ही रा. दरोगा प्लॉट) यांच्याविरुध्द कलम २४, जेष्ठ नागरिक कायद्यासह कलम ३५२ नुसार गुन्हा नोंदविला आहे.

१ व १० वरिल उर्वरित

### पश्चिम बंगालमध्ये हिंदूंना

भाष्य करताना मोदी म्हणाले, देशभरातील गरिबांना पक्की घरे मिळत असताना बंगालमध्ये मात्र या योजनेचे नाव बदलण्यात आले. लाभार्थ्यांच्या यादीत फेरफार करण्यात आले, यामुळे ज्या गरिबांना हक्काचे घर मिळायला हवे होते, ते आजही प्रतीक्षेतच आहेत.

### वांगचुक यांची नजरकैद

सिक्युरिटी ॲक्टअंतर्गत कारवाई करत त्यांना राजस्थानमधील जोधपूर येथील तुरुंगात ठेवले होते. या कारवाईमुळे देशभरात चर्चा झाली होती आणि अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यावर प्रश्न उपस्थित केले होते. आता सरकारने त्यांची नजरकैद रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने या प्रकरणाला नवे वळण लागले आहे. या निर्णयामुळे लडाखमधील परिस्थिती शांत करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, लडाखमधील विविध प्रश्नांवर सरकार आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्यात संवाद सुरू राहणार असल्याचेही गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी काळात या प्रदेशातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### उत्तर कोरियाने डागले

जपानच्या तटरक्षक दलाने तात्काळ प्रतिसाद दिला असून समुद्रातील जहाजांना इशारा दिला असून पुढीच सूचनांची अंमलबजवाणी करण्यास सांगितले आहे. दक्षिण कोरियाच्या लष्कराने स्थानिक माध्यमांना दिलेल्या एका निवेदनात म्हटले की, हे क्षेपणास्त्र उत्तर कोरियाच्या पूर्ण किना-यावरील समुद्रात सोडले गेले. यावर अधिक माहिती देण्यास लष्कराने नकार दिला. तर जपानच्या तटरक्षक दलाने सदर क्षेपणास्त्र समुद्रात कोसळल्याचे म्हटले.

### अनैतिक संबंधांतून जन्मलेल्या

ठेवणे अन्यायकारक ठरेल.

**हिंदू विवाह कायद्यातील बदलांचा संदर्भ-**निर्णय देताना न्यायालयाने हिंदू विवाह कायद्याच्या सुधारित तरतुदींचाही संदर्भ दिला. बदलत्या सामाजिक वास्तवामुळे पूर्वी बेकायदेशीर मानले जाणारे काही संबंध आज कायदेशीर चौकटीत येउ शकतात. त्यामुळे अशा संबंधातून जन्मलेल्या मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे कायद्याचे कर्तव्य असल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा मुलांना इतर कायदेशीर मुलांप्रमाणेच वागणूक देणे आवश्यक आहे, तसेच पालकांच्या मालमत्तेवरही त्यांचा हक्क असू शकतो. या सर्व बाबींचा विचार करून उच्च न्यायालयाने प्रवीणची याचिका फेटाळून लावली. परिणामी, श्रावणची पोलीस कान्स्टेबल पदासाठी झालेली निवड कायम राहिली.

### 'एमडी'ची तस्करी पुन्हा उघड

रफीक मोहम्मद सलीम याच्या ताब्यातून ७६ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) हा अंमली पदार्थ आढळून आला. प्राथमिक तपासात हा अमली पदार्थ मुंबईहून अमरावतीत आणून स्थानिक स्तरावर विक्री करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या एमडीची किंमत सुमारे ११.४० लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास बडनेरा पोलीस ठाणे करत आहे.

### बहिणीच्या विरहात गेला

दरम्यान गुरुवारी दुपारी राम ढोबळे यांचा मृतदेह यवतमाळ येथे नेण्यात आला. तिथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. बहिणीच्या निधनाने विरहात असलेल्या भावाने तिच्या दारात प्राण सोडले.

### पत्नीला माहिती देऊन

सायंकाळी प्रितमच्या पत्नीने त्याच्या चुलत भावाला फोन करून सांगितले की, प्रितम हा फाशी घेत आहे. त्यामुळे चुलत भावाने तत्काळ प्रितमच्या घरी जाऊन बघितले. त्यावेळी प्रितम हा मोबाईल पाहत होता. त्यानंतर चुलत भावाने वहिनीला फोन करून सांगितले. परंतू त्यानंतर प्रितमच्या पत्नीच्या सांगण्यावरून एक ते दोन तासात अचानक पोलिस प्रितमच्या घरी पोहोचले. त्यावेळी प्रितम हा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी तत्काळ प्रितमला गळफासावरून काढले आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. त्यावेळी डॉक्टरांनी प्रितमला मृत घोषीत केले. याप्रकरणात पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

### गोवंश वाहतूक करणाऱ्या ट्रकचा

मागील लोखंडी गार्ड तुटला, तर धडक देणाऱ्या ट्रकच्या कॅबिनचा पूर्ण चुराडा झाला. अपघातानंतर चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला. माहिती मिळताच समृद्धी महामार्गाची रेस्क्यू टीम व सेलू पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमी दिनेश गव्हाणे यांना तत्काळ सेलू ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये १२ बैल आढळले. त्यापैकी १० बैलांचा मृत्यू झाला असून २ बैल किरकोळ जखमी झाले आहेत. संबंधित ट्रक गोवंश वाहतुकीसाठी विशेष तयार करण्यात आला होता. त्यात लोखंडी पाइपचे कठडे, पाण्याची टाकी, चारा तसेच तळाशी रबर मॅटची व्यवस्था करण्यात आली होती.

दरम्यान, समोरील ट्रकचा चालक घटनास्थळी आढळून आला नाही. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### संजिता महापात्र होणार प्रभारी

यथास्थिती व्यवस्थित ठेवण्यात येत आहे. यानंतर मनपा आयुक्त सौम्या शर्मा मातृत्व अवकाशवर जाणार असून त्यांच्या जागी सीईओ संजीता महापात्रा मनपाच्या प्रभारी आयुक्त होणार, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

### 'राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धा -

ठोंबरे, प्रणव राऊत, वृषभ शेलोकर,अनुश्री भोकरे व साक्षी बावनकर ह्यांच्या चमूने 'AI-चालित इंटरएक्टिव्ह फिटनेस गेमिंग प्लॅटफॉर्म' या प्रोजेक्टच्या शीर्षका खाली आणि प्रा. अश्विनी घाटोळ यांच्या मार्गदर्शनात मिळवीला. तसेच द्वितीय पुरस्कार हा चतुर्थ वर्षाच्या संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या आनंद तायडे, श्रावणी बालापुरे, निश्चय साहू, शंतनू बंड, रोशन अवतीरक सोबत अवनी मिरानी (इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन) च्या चमूने 'न्यूरोब्लिंक: अ मल्टी-फॅक्टर डीपफेक डिटेक्शन सिस्टम इंटिग्रेटिंग' या प्रोजेक्टच्या शीर्षकाखाली आणि डॉ. निकिता मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त केला.

डिपेक्स (डिझाइन इनोव्हेशन प्रोजेक्ट एक्झिबिशन) हे महाराष्ट्र आणि गोव्यात अभियांत्रिकी, डिप्लोमा आणि कृषी विद्यार्थ्यांसाठी कार्यरत मॉडेल्स प्रदर्शित करण्यासाठी एक प्रमुख वार्षिक राज्यस्तरीय प्रदर्शन आणि स्पर्धा आहे. १९८६ मध्ये स्थापन झालेले हे शैक्षणिक, उद्योग आणि समाज यांना उद्योजकता आणि नवोपक्रमांना चालना देण्यासाठी जोडते, ज्यामध्ये बहुतेकदा कृषी तंत्रज्ञान, एआय आणि शाश्वततेतील प्रकल्पांचा समावेश असतो.

संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे सरांच्या प्रेरणेतून विभागप्रमुख डॉ. विजया शांडिल्य, डॉ. विश्वास गायकवाड ह्यांच्या मार्गदर्शनात प्रा. अश्विनी घाटोळ आणि डॉ. निकिता मोहोड ह्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करून यश संपादन केले.

### शेतकऱ्यांना पिकांचा योग्य

शेतकऱ्यांना पिकाचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी शेतकरी सभा प्रयत्न करत आहे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव मिळणार आहे. १७ मार्च पर्यंत सभेच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात येणार आहे. या संवाद यात्रे निमित्त ते विदर्भ दौऱ्यावर आले आहे. अमरावतीनंतर ते वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी संपर्क करणार आहेत. शेतक-यांना कोणत्या अडचणी आहे हे ते जाणून घेणार आहे. शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी जाणून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यांनी सांगितले की शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांना दोन लाख पर्यंत कर्जमाफी देण्यात आली आहे तसेच ६० हजार कोटीचा प्रस्ताव आहे. फक्त कर्जमाफी मिळाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी दूर नाही होणार नाही तर त्यावर आवश्यक उपाययोजना गरजेचे आहे. त्यांच्या पिकांना योग्य मोबदला मिळणे जरुरी आहे. पिकांना भाव मिळाल्यावरच त्यांना येणाऱ्या अडचणी दूर होणार असेही ते म्हणाले. योग्य उपाय योजना आम्ही करणार आहोत असे आश्वासन त्यांनी दिले. पत्रकार परिषद मध्ये एड. नरेंद्र राऊत, बबनराव तिखाते, गणेश डोंगरे, प्रवीण इखे, किशोर मानकर, जगदीश जुनघरे, डॉ. गणेश खारकर उपस्थित होते.

### चहा टपरीचे कुलूप तोडून सिलेंडर

आहे. या टपरीमुळे त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालतो. नेहमीप्रमाणे शुक्रवारीं रात्री ९ वाजता सुमारास ते दुकान बंद करून घरी गेले. शनिवारी सकाळी ६ वाजता ते जेव्हा दुकान उघडण्यासाठी आले तर त्यांना टपरीचे ताळे तुटलेले दिसले. त्यांनी जेव्हा पाहिले तर गॅस सिलेंडर सह चहा बनवण्यासाठी लागणारे पितळ आणि स्टीलचे भांडे तेथून गायब होते आणि पान मटेरियलचे साहित्यही चोरांनी चोरले होते. हे पाहिल्यावर त्यांनी तात्काळ डायल ११२ वर कॉल करून याची माहिती पोलिसांना दिली. पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना कोतवाली ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करण्याचे सांगितले. रोख रक्कम ही येथून गायब झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### अंबादेवी संस्थानची प्रसाद सेवा

आहे. गॅस सिलेंडर लोकांना सहज उपलब्ध होत होते, त्या सिलेंडरसाठी आता रांगा लावायला लागत आहे. तुटवडयामुळे सिलेंडर साठी इकडे तिकडे भटकावे लागत आहे. शहर आणि जिल्ह्यात याचे परिणाम पाहायला मिळत आहे.गॅस सिलेंडर साठी भटकंती होत आहे. जागोजागी टंचाई पाहायला मिळत आहे. अशात वर्षांपासून सुरू असलेली अंबादेवी संस्थानची प्रसाद सेवा बंद करण्यात आली आहे. यामुळे बाहेर गावावरून येणाऱ्या भक्तांची मोठी गैरसोय होत आहे.आई अंबे साठी जे नैवेद्य बनविण्यात येत आहे ते, तसेच सुरू आहे पण प्रसाद सेवा जे सर्वसामान्य नागरिकांसाठी होती ते सध्यातरी बंद करण्यात आली आहे. जोपर्यंत टंचाई नाही संपत तोपर्यंत प्रसाद सेवा बंद राहणार आहे, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात येत आहे.

### अवैध दारू अड्ड्यांवर धाड, २२

रुपयांचा हा माल नष्ट केला. याशिवाय गवळीपुरा परिसरातील एका ५० वर्षीय महिलेच्या घरातून ३० लिटर गावठी दारू (किंमत सुमारे ६ हजार रुपये) जप्त करण्यात आली. तसेच फॉरेस्ट क्वॉर्टर रोड परिसरातील एका महिलेच्या घरातून ३० लिटर आणि गवळीपुरा परिसरातील आणखी एका महिलेच्या घरातून १० लिटर कच्ची दारू जप्त करण्यात आली. या सर्व कारवाईत एकूण २२ हजार २४० रुपयांचा माल नष्ट करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्यासह राहुल महाजन, सुभाष पाटील, शशिकांत गवई, सागर चव्हाण, जावेद पटेल, जयेश परिवाले, रोशन वर्हाडे, संदीप राठोड, धर्मा शिंदे, पवन शिभाते, अनिता सोळंके आणि तृप्ती कासदेकर यांनी सहभाग घेतला.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १५ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोट सिटीचा 'सुपरफास्ट एजंट' राजू कोणाच्या छत्रछायेत?

## वरली-मटका, जुगार आणि बनावट नोटांच्या साखळीतील मोठे रॅकेट चर्चेत

### 'नंदू'च्या वरदहस्ताचीही जोरदार चर्चा

*अकोट : अकोट शहरात 'सुपरफास्ट एजंट' म्हणून ओळख निर्माण केलेल्या राजूच्या अवैध साम्राज्याभोवती आता गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. वरली-मटका, जुगार आणि बनावट नोटांच्या कथित व्यवहारातून जाळे उभारणाऱ्या या राजूवर यंत्रणांनी कारवाईची कात्री चालवताच तो संतापून शहरभर आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडवत असल्याची चर्चा आहे. मात्र या सर्व प्रकरणात राजूला नेमका वरदहस्त कोणाचा आहे? हा सवाल आता अकोटकरांच्या चर्चेचा मुख्य विषय ठरला असून '**नंदू**' नामक झारीतील शुक्राचार्याचे नाव यानिमित्ताने समोर येत आहे.*

माहितीनुसार, मागील काही काळापासून राजूने अकोट शहरातील काही धंदेवाईकांना हाताशी धरून अवैध वरली-मटक्याचे जाळे उभे केले होते. या धंद्यातून मिळणाऱ्या अस्सल नोटांच्या व्यवहारात बनावट नोटा मिसळून त्या चलनात आणण्याचा गंभीर प्रकार घडत असल्याची धक्कादायक चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे भविष्यात या नकली नोटांचा तपास उलगडल्यास राजू स्वत: बाजूला राहून त्याच्या भागीदारांनाच अडचणीत ढकलू शकतो, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### मुख्य बाजारपेठेत उभारला 'आशियाना'

शहरातील गजबजलेल्या बाजारपेठ परिसरात राजूने आपल्या बोलबच्चन आणि आमिषाच्या जोरावर काही जणांना विश्वासात घेतले. **'आप्पा, अतुल आणि हाफिज गांजेवाला'** या तिघांना हाताशी धरून वरली-मटक्याचे अड्डे उभारण्यात आले, अशी माहिती समोर येत आहे. या धंद्यात राजूचा केवळ १५ टक्के हिस्सा असल्याचे सांगितले जात असले तरी वाटपाची व मॅनेजमेंटची सूत्रे मात्र त्याच्याच हातात असल्याची चर्चा आहे. नकली नोटांच्या संभाव्य व्यवहारामुळे हे भागीदारही संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### ग्रामीण भागात भोळ्या जनतेची फसवणूक

शहरापुरतेच न थांबता राजूने ग्रामीण भागातील धरमकाट्यांवर लक्ष केंद्रीत करत वरली-मटक्याचे जाळे पसरवले. ग्रामीण भागातील भोळ्या-भाबड्या आणि अशिक्षित नागरिकांना आकडा लागल्यास मोठा मोबदला मिळेल, असे आमिष दाखवून त्यांना या साखळीत ओढण्यात आले. मोबदल्याच्या वेळी अस्सल नोटांमध्ये बनावट नोटा मिसळून त्या चलनात आणण्याचा प्रकार घडत असल्याची चर्चा आहे. या ठिकाणी ग्रामीण मधील **'राजू, आकाश आणि इमरान'** हे त्याचे भागीदार असल्याचेही बोलले जात आहे.

#### अडचण आली तर भागीदारच पुढे?

यंत्रणेतील काही अधिकाऱ्यांशी असलेले कथित 'मधुर संबंध' आणि एका संस्थेचा घेतलेला आडोसा यामुळे राजू निर्धास्तपणे अवैध धंदे चालवत असल्याची चर्चा आहे. भविष्यात मोठी कारवाई झाल्यास स्वत: सुरक्षित राहून भागीदारांनाच पुढे करून संकटातून सुटण्याचा डाव त्याचा असल्याचे बोलले जात आहे.

#### पोलिस ठाण्यातून हकालपट्टीची घटना

काही वर्षांपूर्वी अकोट शहरातील एका तत्कालीन पोलिस निरीक्षकांनी संशयास्पद हालचालींमुळे राजूला थेट शहर पोलीस ठाण्यातून हाकलून लावत येण्यास मज्जाव केला होता. मात्र त्यानंतर एका संस्थेचे 'सुपरफास्ट' ओळखपत्र मिळवून त्याच संस्थेच्या नावाचा आधार घेत पुन्हा पोलिस ठाण्यात वावर सुरू केल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना राजूच्या कथित काळ्या कारवायांची माहिती दिली नसल्याचे सांगितले जाते.

#### तपासाची मागणी तीव्र

अकोट शहरात अवैध वरली-मटका, जुगार आणि बनावट नोटांच्या चर्चेमुळे वातावरण तापले असताना या संपूर्ण रॅकेटमागे नेमका कोणाचा राजकीय, आर्थिक किंवा प्रशासकीय वरदहस्त आहे? हा प्रश्न आता अधिकच तीव्र झाला आहे. शहरात पसरलेल्या या अवैध साखळीचा सखोल तपास करून संपूर्ण सत्य बाहेर आणावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# समाधान शिबिरातून समस्या मार्गी लावूया – विभागीय आयुक्त डॉ. सिंघल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या तातडीने मार्गी लावून शासनाच्या सेवा लोकांपर्यंत सुलभ आणि वेळेत पोहोचतील यासाठी प्रशासनाने समन्वयातून काम करावे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले. त्या कारंजा तालुक्यातील खेर्डा बु येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराजस्व अभियान समाधान शिबिराला भेट देऊन आढावा घेत असताना बोलत होत्या.

यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, सहाय्यक आयुक्त राजीव फडके, तुकाराम टेकाडे, उपायुक्त संतोष कवडे, उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, तहसीलदार रवी महाले, गटविकास अधिकारी पुनम राणे, खेर्डा येथील उपसरपंच सिमाताई ढोके, माजी समाजकल्याण सभापती अशोक डोंगरदीवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सिंघल यांनी शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या महसूल विषयक अडचणी जाणून घेतल्या. विविध अर्ज व तक्रारींची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

नागरिकांना प्रमाणपत्रे, नोंदी दुरुस्ती, जमीन संबंधित बाबी तसेच इतर महसूल सेवांचा लाभ जलद गतीने मिळावा यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय राहण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली.

पुढे बोलतांना डॉ. श्रीमती सिंघल म्हणाल्या ,महाराजस्व अभियान अंतर्गत जिल्ह्यातील नागरिकांच्या प्रलंबित महसूल विषयक कामांना गती देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमध्ये मंडळ स्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरांमधून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, जास्तीत जास्त प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे तसेच विविध प्रमाणपत्रे व सेवांचा लाभ देण्यावर भर दिला जावा. या शिबिरांमुळे नागरिकांना महसूल कार्यालयांमध्ये वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच त्यांच्या समस्या स्थानिक पातळीवरच तत्काळ सोडविण्यात याव्यात, या उद्देशाने प्रशासनाकडून भरपूर प्रयत्न केले जावे असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

प्र. जिल्हाधिकारी श्री.पाटील म्हणाले, महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित करण्यात येत असलेल्या समाधान शिबिरांमुळे नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारी व प्रलंबित प्रकरणे स्थानिक पातळीवर तातडीने निकाली काढण्यास मदत होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महसूल प्रशासनाच्या कामकाजात अमुलाग्र बदल होत असून या माध्यमातून प्रशासन नागरिकांना जलद व पारदर्शक सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी तेजराव वानखेडे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदान येथे ११ मार्च रोजी पार पडलेल्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या बैठकीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

सदर कार्यकारिणीत सार्वजनिक जयंतीउत्सव समिती सचिव म्हणून ज्येष्ठ समीक्षक विद्रोही कवी शेषराव पिराजी धांडे यांची तर कोषाध्यक्षपदी अभिनेते अरविंद उचित यांची निवड करण्यात आली.बैठकीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्याचे ठरवण्यात आले.यावेळी आरोग्य निदान शिबिर,रक्तदान शिबिर तसेच समाजप्रबोधन पर व्याख्यान आयोजित करण्या बाबत चर्चा करण्यात आली.

# महाड सत्याग्रह स्मृती व्याख्यानमाला १९ व २० मार्चला वाशिममध्ये

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक श्री शिवाजी विद्यालय, वाशिम येथे दि. १९ व २० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता 'महाड सत्याग्रह स्मृती' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी ही व्याख्यानमाला १५ व्या वर्षात पदार्पण करत असून समाजप्रबोधनाच्या दृष्टीने विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.


दि. १९ मार्च रोजी होणाऱ्या पहिल्या सत्राचे उद्घाटन अ?ड. किरणराव सरनाईक, अध्यक्ष शिवाजी शिक्षण संस्था वाशिम तथा शिक्षक आमदार यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संजय खडसे, उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा हे राहतील. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. ऋषिकेश कांबळे, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत, संभाजीनगर हे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला माणसात आणलं; आपण शुद्धीवर



आहोत काय?' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विलास के. खिल्लारे (सेवानिवृत्त प्रकल्प संचालक, जिल्हा परिषद वाशिम), सचिन दत्तात्रेय खरात (प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय वाशिम) व सुरेश गणपत कांबळे (गटविकास अधिकारी, सेनगाव) उपस्थित राहणार आहेत. दि. २० मार्च २०२६ रोजी होणाऱ्या द्वितीय सत्राच्या अध्यक्षस्थानी मा. प्रतिभाताई रामप्रभू सोनोने, अध्यक्ष संघमित्रा धम्म सेवा महिला मंडळ वाशिम या राहतील. प्रमुख व्याख्याते म्हणून अ‍ॅड. वैशाली डोळस, फुले-शाहू-आंबेडकरी विचारवंत, संभाजीनगर या 'भारतीय लोकशाही पुढील आव्हाने' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. एस. के. उंडाळ (ज्येष्ठ विधीज्ञ, जिल्हा विधीज्ञ मंडळ वाशिम), डॉ. विजय कानडे (बालरोग तज्ञ, वाशिम) व गजानन पडघन (महिला व बालविकास अधिकारी, वाशिम) उपस्थित राहतील. या व्याख्यानमालेचा मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन महाड सत्याग्रह स्मृती समितीचे अ?ड. पी. पी. अंभोरे, हरिश्चंद्र पोफळे, महेंद्र ताजने, दिलीप गवई, विलास भालेराव, एस. पी. चवरे, प्रा. मधुकर बनसोड, किसन ह. राजे, पंढरी खिल्लारे, अरविंद उचित, भीमराव सावळे आदींनी केले आहे.

# अनेक वर्षांची प्रतीक्षा संपली

## सावरगावातील प्रलंबित रस्ता पूर्ण



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या सावरगाव येथील गजानन पायघन यांच्या घराजवळील रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. खराब रस्त्यामुळे ग्रामस्थांसह शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेषतः पावसाळ्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. चिखल, साचलेले पाणी आणि वाहतुकीची गैरसोय यामुळे नागरिक त्रस्त झाले होते.

ही समस्या ग्रामस्थांनी सौ. संगीता वामन राठोड यांच्याकडे मांडल्यानंतर त्यांनी तातडीने याची गंभीर दखल घेतली. केवळ आश्वासनांवर न थांबता त्यांनी सातत्याने पाठपुरावा करत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे बाळापूर मतदारसंघाचे आमदार नितीन बापू देशमुख यांच्या विशेष निधीतून रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली. अखेर अनेक वर्षांपासून रखडलेले हे काम पूर्ण झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रस्ता पूर्ण झाल्यामुळे परिसरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी ग्रामस्थांनी आमदार नितीन बापू देशमुख यांचे आभार मानत सौ. संगीता वामन राठोड यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. स्थानिक समस्यांकडे तत्परतेने लक्ष देऊन त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची कार्यपद्धती ग्रामस्थांसाठी विकासाची आशा निर्माण करणारी असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

> पावसाळ्यात शाळकरी मुलांना व ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही व्यथा आम्ही संगीताबाई वामन राठोड यांच्याकडे मांडली. त्यांनी तातडीने दखल घेत सातत्याने पाठपुरावा करून रस्त्याचे काम पूर्ण करून दिले. त्यामुळे आम्ही त्यांचे आभारी आहोत.
>
> **गजानन पायघन,**
> सामाजिक कार्यकर्ता,
> सावरगाव

# आयुष्यमान भारत शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## २२४ आयुष्यमान व १२७ वयवंदना कार्ड तयार



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव नगरपंचायतीच्या पुढाकारातून जनआरोग्य योजना अंतर्गत आयुष्यमान कार्ड व वयवंदना कार्ड तयार करण्यासाठी एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री आरोग्य कार्ड वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर दिनांक १२ मार्च २०२६ ते १३ मार्च २०२६ दरम्यान नगरपंचायत कार्यालय येथे पार पडले.

या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण २२४ नागरिकांची आयुष्यमान भारत कार्ड तर १२७ नागरिकांची वयवंदना कार्ड तयार करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष , मुख्याधिकारी, आरोग्य सभापती तसेच सर्व नगरसेवक / नगरसेविका उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी काम करणाऱ्या आयुष्यमान कार्ड व वयवंदना कार्ड तयार करणाऱ्या टीमचे तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका यांचेही यावेळी आभार व्यक्त करण्यात आले.

सरकारच्या आरोग्य योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# आयटीसी चौपाल महोत्सवाचे थाटात उद्घाटन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्थानिक मालेगाव रोड स्थित आयटीसी चौपाल सागर शॉपिंग मॉल येथे दि. १३ ते १५ मार्च ३ दिवसीय चौपाल महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक १३ मार्च रोजी तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे डॉ गीते, आयटीसी संयोजक सुभाष सत्यनारायण बंग, चिखली,झाकलवाडी चे सरपंच लक्ष्मण गावंडे,सहायक कृषी अधिकारी अनिल जैताडे, आत्मा चे अधिकारी जयप्रकाश लव्हाळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत फीत कापून व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. वाशिम ला सन २००५ ला आयटीसी चौपाल सागर ची स्थापना करण्यात आली आहे गेल्या निरंतर २१ वर्षांपासून



चौपालसागर येथे शेतकऱ्यांसाठी व घरातील प्रत्येक सदस्यांसाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. या चौपाल महोत्सवात जाऊळका रेल्वे येथील प्रगतिशील शेतकरी रवींद्र सुडके व कोयाळी भिसडे येथील शंकर भिसडे या नाविन्यपूर्ण शेती करणाऱ्या दोन शेतकऱ्यांचा शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या महोत्सवात महिंद्रा मोटर्स, जेके टायर्स, टाटा ?ग्रिको, न्यू हॉलंड ट्रॅक्टर, सलासर अलॉय अँड स्टील, कॅस्ट्रोल ऑइल, रहेजा फूड अँड प्रोसेसिंग, जेसीबी बॅकलोडर, अँक्सिस बँक, पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, व पंजाब नॅशनल बँक सह आयटीची च्या प्रॉडक्ट्स चे स्टॉल विक्री व प्रदर्शन साठी उपलब्ध आहेत. तसेच या ठिकाणी दररोज प्रश्नमंजुषा च्या माध्यमातून ताबडतोब बक्षिसे देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांसाठी किसान गोष्टी, विरो का हिरो स्पर्धा,संगीत खुर्ची,रस्सीखेच, युवांसाठी करिअर गायडन्स, गायन व नृत्य स्पर्धा, महिलांसाठी सलाद बनविण्यासाची स्पर्धा, मार्गदर्शन, स्पिन द व्हील, रील बनविण्याची स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, पोते घालून धावण्याची स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करण्यात आले आहे.

# खेळ व योगशिक्षण पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथील सौ. रजनीताई देशमुख महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. दिनेश तांदळे यांनी लिहिलेल्या 'खेळ व योगशिक्षण' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार, दि. १२ मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थी जीवनात खेळ आणि योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या पुस्तकात विषयाची सखोल आणि अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाला ISBN क्रमांकही प्राप्त झाला आहे. डॉ. तांदळे हे केवळ शिक्षक म्हणूनच नव्हे, तर सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही भडगाव व परिसरात परिचित आहेत. त्यांनी अनेक होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली असून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून समाजकार्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. हे पुस्तक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बी. एस्सी. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमावर आधारित असून मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात

## ६७५ लाभार्थ्यांची उपस्थिती; विविध विभागांच्या योजनांचा लाभ नागरिकांना थेट मिळाला

■ प्रतिनिधी | कारंजा ■

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' टप्पा क्र. १ अंतर्गत खेर्डा खुर्द मंडळ, तालुका कारंजा येथे शनिवार (दि. १४ मार्च) रोजी सकाळी १० वाजता भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षस्थान विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी भूषविले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील (वाशिम), उपविभागीय अधिकारी कैलास देवरे (कारंजा), अपर आयुक्त (विकास) कवडे (अमरावती), उपायुक्त तुकाराम टेकाळे (अमरावती) व उपआयुक्त राजू फडके (अमरावती) उपस्थित होते. या शिबिराच्या आयोजनासाठी तहसीलदार रवी महाले, नायब तहसीलदार विनोद हरणे, अनिल वाडेकर, लक्ष्मण बनसोडे तसेच गटविकास अधिकारी श्रीमती पुनम राणे यांनी पुढाकार घेतला. विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामध्ये महसूल, आरोग्य, पोलीस, कृषी, पशुवैद्यकीय, वन, पुरवठा, महिला व बाल विकास, बहुजन कल्याण विभाग तसेच महाबियान सहकारी प्रयत्नांना जनभागाची साथ अनुलोम संस्था आदी



विभागांनी स्वतंत्र स्टॉल उभारून नागरिकांना योजनांची माहिती व सेवा उपलब्ध करून दिली. याशिवाय लोकसेवा हक्क सेतू केंद्र व आधार केंद्रही उभारण्यात आले होते.

शिबिरामध्ये विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. संजय गांधी व श्रावण बाळ योजनेअंतर्गत १९ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. पुरवठा विभागाकडून २० रेशनकार्ड प्रकरणांमध्ये नाव दुरुस्ती, नाव समावेश व नाव वगळणे यासंबंधी कामे करण्यात आली. एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत तीन बेबी किटचे वितरण करण्यात आले.

भूमी अभिलेख कार्यालयाकडून ५० सनदांचे वाटप करण्यात आले. अभियानांतर्गत ३६ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली, तर सातबारा दुरुस्तीची १४ प्रकरणे करण्यात आली. डिजिटल सातबारा व आठ-अचे प्रत्येकी १४९ प्रती वितरित करण्यात आल्या. याशिवाय २४७ विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत ३२ अर्ज निकाली काढण्यात आले असून कमी-जास्त पत्रांची दोन प्रकरणे तयार करण्यात आली. कार्यक्रमाला एकूण ६७५ लाभार्थी उपस्थित होते. तसेच ५ तक्रारी प्राप्त झाल्या असून १९५ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खेर्डा बुद्रुक येथील विद्यार्थ्यांनी लेझिम नृत्य सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांच्या स्वागत नृत्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी पीएम श्री विद्यालयाचे शिक्षक गोपाल वसंतराव खाडे यांनी पारंपरिक 'कच्ची घोडी' लोकनृत्य सादर करून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाबाबत जनजागृती केली. या लोकनृत्याच्या माध्यमातून पीएम किसान योजना, आधार सेवा, निवडणूक सर-मॅपिंग, आरोग्य विभागाच्या योजना, सातबारा दुरुस्ती, अग्रोस्टॅग व ई-मॅपिंग आदी योजनांची माहिती प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०७ ■ रविवार, १५ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

# गोवंश वाहतूक करणाऱ्या ट्रकची धडक; चालकासह १० बैलांचा मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावर शनिवारी पहाटे भीषण अपघात होऊन एका ट्रक चालकासह १० बैलांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकला मागून भरधाव वेगात येणाऱ्या गोवंश वाहतूक करणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. ही घटना सकाळी सुमारे ६ वाजता धानोली-मेघे परिसरात घडली. मृत चालकाचे नाव दिनेश दादाराव गव्हाणे (वय २९, रा. मंगरूळपीर, जि. वाशिम) असे आहे.

माहितीनुसार, आर.जे. ०२ जी.बी. ६३३ क्रमांकाचा ट्रक पुढील लेनने मुंबईकडे जात होता. त्याच्या मागून एम.एच. ३७ टी. ४५८७ क्रमांकाचा गोवंश वाहतूक ट्रक वेगात येत होता. निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याने चालकाचे नियंत्रण सुटून त्याने समोरील ट्रकला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की समोरील ट्रकचे टायर फुटले, मागील लोखंडी गार्ड तुटला, तर धडक देणाऱ्या ट्रकच्या कॅबिनचा पूर्ण चुराडा झाला. अपघातानंतर चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला. माहिती मिळताच समृद्धी महामार्गाची रेस्क्यू टीम व सेलू पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमी दिनेश गव्हाणे यांना तत्काळ सेलू ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.





ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये १२ बैल आढळले. त्यापैकी १० बैलांचा मृत्यू झाला असून २ बैल किरकोळ जखमी झाले आहेत. संबंधित ट्रक गोवंश वाहतुकीसाठी विशेष तयार करण्यात आला होता. त्यात लोखंडी पाइपचे कठडे, पाण्याची टाकी, चारा तसेच तळाशी रबर मॅटची व्यवस्था करण्यात आली होती.

दरम्यान, समोरील ट्रकचा चालक घटनास्थळी आढळून आला नाही. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# वेणा नदीवरील ६० कोटींच्या बंधाऱ्याची पाहणी; हिंगणघाटचा पाणीप्रश्न सुटणार

## -आ. समीर कुणावार यांचे अधिकाऱ्यांना वेळेत व दर्जेदार कामाचे निर्देश



**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट शहराच्या दीर्घकालीन पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी वेणा नदीवर प्रस्तावित बंधाऱ्याच्या कामाची आमदार समीर कुणावार यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

राज्य शासनाने सुमारे ६० कोटी रुपयांच्या निधीतून या महत्त्वपूर्ण प्रकल्पास मंजुरी दिली असून, आमदार कुणावार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा बंधारा प्रत्यक्षात येत असल्याचे सांगण्यात आले. शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

बंधारा पूर्ण झाल्यानंतर हिंगणघाटकरांना मुबलक व नियमित पाणीपुरवठा होणार असून भविष्यात चोवीस तास पाणी उपलब्ध करण्याचा उद्देश असल्याचे आमदारांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी अधिकाऱ्यांना कामाची गुणवत्ता अबाधित राखत नियोजित वेळेत बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. नागरिकांना या प्रकल्पाचा लाभ लवकर मिळावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे आवाहनही करण्यात आले.

पाहणीदरम्यान नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर, उपाध्यक्ष निलेश ठोंबरे, नगरसेवक, पाटबंधारे विभागाचे अधिकारी तसेच नगरपरिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

हा बंधारा पूर्ण झाल्यानंतर हिंगणघाट शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा आधार मिळून नागरिकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता होण्यास मदत होणार आहे.

# जय श्रीराम'च्या गजरात प्रभात फेरीचे भक्तिमय स्वागत

**वर्धा जनमाध्यम :** गुढीपाडव्याच्या पावन पर्वानिमित्त आयोजित 'पाडवा पहाट' व नवरात्रातील धार्मिक कार्यक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी काढण्यात आलेल्या श्रीराम प्रभात फेरीचे रामनगर-हिंदनगर परिसरातील गणेश मंदिर चौकात भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. स्थानिक प्राचीन श्रीराम मंदिर गोल बाजार समिती व श्रीराम शोभायात्रा समितीच्या वतीने ही फेरी आयोजित करण्यात आली आहे.



शहरातील विविध भागांत ही प्रभात फेरी सलग १४ दिवस काढली जात असून त्यामध्ये श्रीरामांचा सुशोभित रथ, टाळ-मृदुंगाच्या नादात भजन करणारी मंडळी आणि भाविकांचा मोठा सहभाग दिसून येतो. फेरीदरम्यान १९ मार्च रोजी पहाटे ५ वाजता होणाऱ्या 'पाडवा पहाट' कार्यक्रमाचे निमंत्रण घरोघरी दिले जात आहे.


गणेश मंदिर चौकात नागरिकांनी रांगोळ्या काढून, फुलांची उधळण करून व जय श्रीराम च्या घोषणांनी फेरीचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी रुईकर परिवारातर्फे लंगर चे आयोजन करण्यात आले होते यावेळी संजय लाभे, कमल कुलधरीया राजूभाऊ उमाटे, दिलीप भागवतकर, दीपक डाफणे, पूनम जावंधिया, पूजा मुंदडा, यांच्यासह परिसरातील अनेक भाविक उपस्थित होते. वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले होते.

# रेतीच्या आमिषाने ५० हजारांची लूट; एलसीबीची सिनेमा स्टाईल कारवाई, सराईत आरोपी गजाआड

## ८० हजारांचा मुद्देमाल जप्त; पुढील तपास सेलू पोलिसांकडे

**सेलू जनमाध्यम :** स्वस्त दरात रेती (वाळू) मिळवून देण्याचे आमिष दाखवत महिलेच्या घरातून ५० हजार रुपये लंपास करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला वर्धा स्थानिक गुन्हे शाखेने थरारक पद्धतीने अटक केली. आरोपीकडून रोख रक्कम, मोबाईल आणि दुचाकीसह तब्बल ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२४ फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक ५ येथील रहिवासी यासमीन जुनेद खान पठाण (वय २८) यांच्या घरी एक अनोळखी व्यक्ती आली. ८ हजार रुपये प्रति ट्रिप दराने रेती मिळेल, असे सांगून त्याने फिर्यादीच्या वडिलांना रेती दाखवण्याच्या बहाण्याने दुचाकीवर नेले. वाटेत पेट्रोल संपल्याचे नाटक करून त्यांना तिथेच थांबवले आणि आरोपी परत फिर्यादीच्या घरी आला.



यानंतर तुमच्या वडिलांना पोलिसांनी पकडले असून सोडवण्यासाठी पैसे लागतील, असे सांगत त्याने भीती निर्माण केली. फिर्यादी पैसे काढत असतानाच आरोपीने त्यांच्या हातातील ५० हजार रुपयांचे बंडल हिसकावून दुचाकीवरून पलायन केले.

या घटनेनंतर सेलू पोलिसांत गुन्हा दाखल झाला. स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे छत्रपती संभाजीनगर येथील सराईत गुन्हेगार शेख फेरोज शेख अहमद (वय ५५) याला येळाकेळी परिसरातून सापळा रचून अटक केली.

तपासात आरोपीकडून २० हजार रुपये रोख, गुन्ह्यात वापरलेली विना क्रमांकाची होंडा शाईन दुचाकी (५० हजार रुपये) आणि विवो कंपनीचा मोबाईल (१० हजार रुपये) असा एकूण ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद चौधरी आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. आरोपीला पुढील तपासासाठी सेलू पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# आज महिलांच्या आरोग्यासाठी संवाद, निरोगी स्त्रीत्वाचा कार्यक्रम

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी इंडियन मेडिकल संघटना वर्धा शाखेतर्फे संवाद, निरोगी स्त्रीत्वाचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आज रविवार, १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत शिव वैभव सभागृह येथे होणार आहे.

या कार्यक्रमात महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मासिक पाळीतील समस्या, पीसीओडी, महिलांमधील कर्करोग, मेनोपॉज, त्वचेची निगा तसेच निरोगी जीवनशैली याबाबत सविस्तर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. महिलांनी दैनंदिन जीवनात आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी, याबाबतही माहिती दिली जाणार आहे.कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या महिलांसाठी हाडांची ठिसूळता तपासणी तसेच व्हिटॅमिन डी तपासणी मोफत करण्यात येणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उपक्रमाला इंडियन रेड क्रॉस संघटना (वर्धा), वैद्यकीय जनजागृती मंच तसेच शिव वैभव शिक्षण प्रचार मंडळ यांचे सहकार्य लाभणार आहे. सर्व महिला व किशोरवयीन मुलींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्ध्यात कांशीराम जयंतीनिमित्त राज्यस्तरीय मेळावा आज

**वर्धा जनमाध्यम :** बहुजन चळवळीचे प्रणेते कांशीराम यांच्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पार्टी (बसपा)च्या वतीने रविवार, दि. १५ मार्च रोजी सावंगी टी-पॉइंट येथील साटोणे ले-आउट मैदानावर राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांनी शनिवारी पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



मेळाव्यात सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, विद्यार्थ्यांसाठी करिअरविषयक मार्गदर्शन तसेच शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय विकास राजा आणि त्यांच्या संचाकडून प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार असल्याचेही डोंगरे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसपाचे महाराष्ट्र केंद्रीय प्रभारी व खासदार रामजी गौतम असतील. यावेळी प्रदेशाध्यक्ष अॅड. सुनील डोंगरे, प्रदेश प्रभारी मुकुंद सोनवणे, प्रदेश महासचिव डॉ. मोहन राईकवार, मंगेश ठाकरे, पृथ्वी शेंडे, दादाराव उईके, नागोराव जयकर, जानराव ठोंबरे, प्रदेश संघटिका डॉ. विद्या राईकवार, मोहसीन खान, एल. एस. तुस्कर, स्कर्मिश खडसे आदी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेला प्रदेश महासचिव डॉ. मोहन राईकवार, डॉ. विद्या राईकवार तसेच जिल्हाध्यक्ष अनोमदर्शी भैसारे उपस्थित होते. मेळाव्यास मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सालोड येथे आयोजित समाधान शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

## शिबिरास दीड हजारावर लाभार्थ्यांची उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान टप्पा क्रमांक एक अंतर्गत वर्धा तालुक्यातील सालोड (हिरापूर) येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास दीड हजारावर लाभार्थ्यांनी उपस्थित राहून महसूलसह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविला.

यावेळी उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, सालोडचे उपसरपंच आशिष कुचेवार तसेच तहसीलदार व विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरीक, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थी यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे त्वरित निराकरण व्हावे, तक्रारी तत्काळ निकाली निघाव्यात तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा एक राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सालोड येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले.




शिबीरामध्ये जवळपास १ हजार ५७५ नागरिकांनी सहभाग नोंदविला. शिबिरामध्ये आरोग्य विभागामार्फत ५२० नागरीकांनी आरोग्य तपासणी करण्यात आली. महसूल विभागामार्फत २८७ फेरफार निकाली काढण्यात आले. एकुण ४३३ डिजिटल सातबारा वाटप करण्यात आले. तसेच एकुण ४३३ आठ अ सुद्धा वाटप करण्यात आले. शैक्षणिक व इतर असे एकुण ८४७ दाखले, प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे.

एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत २७५ अर्ज निकाली काढण्यात आले. भुसंपादन प्रकरणी कमी-जास्त पत्रकानुसार एकुण १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच सातबारा दुरुस्ती संदर्भात स्विकारण्यात आलेल्या एकुण १७५ अर्जांवर तत्काळ कार्यवाही करण्यात आली. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ८५ अन्वये आपसी वाटणीची १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. नागरीकांनी शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिनांक १० एप्रिल रोजी ग्रामपंचायत सभागृह, आंजी (मोठी) येथे आयोजित समाधान शिबीरामध्ये जास्तीत जास्त नागरीकांनी सहभाग घेऊन शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन वर्धा तहसीलदार यांनी केले आहे.

# सेलू येथे नाफेडच्या हरभरा खरेदी केंद्राचा थाटात शुभारंभ

## -शेतकऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन केला गौरव -खरेदी विक्री संघाचा पुढाकार

**सेलु जनमाध्यम :** येथील खरेदी विक्री संघामार्फत नाफेड अंतर्गत हरभरा (चना) खरेदीचा शुभारंभ शनिवार, १४ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आला. या केंद्राच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

खरेदीच्या पहिल्या दिवशी आपला शेतमाल घेऊन आलेल्या शेतकऱ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यामध्ये विठ्ठल बाळसराफ (दहेगाव),खुशाल चंदनखेडे (रेहकी),राहुल रोकडे क्षिरसमुद्र

या मान्यवर शेतकऱ्यांचा केंद्राच्या वतीने शाल आणि श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी खरेदी विक्री संघाचे सभापती दिलीप गावंडे आणि उपसभापती अशोक कलोडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.



या कार्यक्रमाला खरेदी विक्री संघाचे सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापक साहिल पवार, माजी व्यवस्थापक मनोज नाईक तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> शेतकऱ्यांनी आपला माल स्वच्छ करून आणि विहित मर्यादेत ओलावा राखून विक्रीसाठी आणावा, जेणेकरून खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पडेल.
> प्रशासकीय पथक, खरेदी विक्री संघ, सेलू.
> या खरेदी केंद्रामुळे सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आजपासून हरभरा खरेदी नियमितपणे सुरू राहणार आहे.


## नावात बदल

माझे पूर्वी HITESH SANJAYRAO PATALE असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील HITESH SANJAYRAO PATLE हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
**गणेश नगर बोरगाव मेघे वर्धा ४४२००१**



## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार उमेश रमेशराव चौधरी यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा इंझापुर, मौजा नं. १७ त. सा. कं. ३४, ता. जि. वर्धा येथील शेत सर्वे कं. ६५/२ जुना ११९ नविन प्लॉट कं. ३१/ब व प्लॉट कं. ११९/३१/ब (७/१२ प्रमाणे) एकूण आराजी १८४. ८५ चौ. मी. म्हणजेच १९८८.९८ चौ. फुट इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-
पुर्वेसः प्लॉट नं. १५ व १६ प्रमोद वरघट यांचा,
पश्चिमेसः प्लॉट नंबर ३१/अ अशोक शंकरराव नागोसे,
उत्तरेसः ९ मिटर रूंदीचा लेआउट मधील रोड,
दक्षिणेसः प्लॉट नंबर १८ खाली प्लॉट,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १२,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

ॲड. सचिन एस. कुरझडकर
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## अरब देशांमध्ये युद्धाची भीती

# लाखो रुपयांच्या नोक-या सोडून भारतीय परतीच्या मार्गावर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आखाती देशांमध्ये वाढत चाललेल्या युद्ध संकटामुळे तेथे काम करणा-या भारतीयांच्या चिंता वाढल्या आहेत. दशकांपासून, करिअर आणि ऊज्वल भविष्यासाठी जगातील सर्वात पूर्णपणे बदलली आहे. देशातील आघाडीच्या कार्यकारी शोध कंपन्यांच्या आकडेवारीवरून या महत्त्वपूर्ण बदलाची स्पष्टपणे साक्ष मिळते. गेल्या काही दिवसांत, भारतात नोकरी शोधणा-या



आखाती देशांमधील वरिष्ठ अधिका-यांकडून होणा-या चौकशीत २५ ते ३० टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाली आहे.तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या युद्धाने मध्य पूर्व 'सुरक्षित आश्रयस्थान' आहे ही मिथक मोडून काढली आहे. लोक आता स्वत?च्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेशी सुरक्षित ठिकाण मानले जाणारे मध्य पूर्व आता धोक्यात आहे. मागील काही दिवसांपासून आखाती देशांमध्ये युद्ध संकट सुरू आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर इराणने आखाती अनेक देशांवर हल्ले केले. या आखाती देशात काम करणारे या संकटामुळे चिंता वाढल्या आहेत. दशकांपासून, करिअर आणि ऊज्वल भविष्यासाठी जगातील सर्वात सुरक्षित ठिकाण मानले जाणारे मध्य पूर्व आता धोक्यात आहे. या अडचणीमुळे भारतीय नागरिक पुन्हा भारतात नोकरी मिळण्याच्या प्रयत्नात आहेत. काही दिवसांपासून सुरू असलेल्या भू-राजकीय ऊलथापालथीमुळे मध्य पूर्वेची एकेकाळी शांत आणि स्थिर असलेली प्रतिमा तडजोड करण्यास तयार नाहीत. अनेक जण आता पुन्हा एकदा मायदेशात नोकरी करण्यास इच्छुक आहेत.

कतारपासून दुबईपर्यंत भीतीचे सावट मिळालेल्या माहितीनुसार, भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण फक्त एकाच देशापुरते मर्यादित नाही. कतारमधील एका बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपनीत काम करणा-या मध्यम-स्तरीय व्यावसायिकांनी भारतात नोकरी शोधण्यास सुरु वात केली आहे, कारण भारतातील त्यांचे वृद्ध पालक तेथील परिस्थितीमुळे खूप चिंतेत आहेत. दुबईमध्ये राहणारी अनेक कुटुंबे देखील गोंधळलेल्या स्थितीत आहेत. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी राहण्यासाठी आणि बाल्कनी आणि खिडक्यांपासून दूर राहण्याचे वारंवार अलर्ट पाठवले जात आहेत.

## युध्दात इराणचा मोठा पराभव-ट्रम्प

**वॉशिंग्टन :** अमेरिका-इस्त्रायलच्या लष्कराने २८ फेब्रु वारी रोजी संयुक्तपण इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्यपूर्वेत संघर्ष पेटल्याचे पाहायला मिळाले होते. या



संघर्ष आता चांगलाच वाढला असून अमेरिकेने इराणच्या तेल निर्यातीचे प्रमुख केंद्र असलेल्या खर्ग बेटावरील लष्करी लक्ष्यांवर भीषण हवाई हल्ले केल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली होती. यानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी आणखी एक मोठा दावा केला आहे. या संघर्षात इराणचा या मोठा पराभव झाला असून ते आता करारासाठी प्रयत्न करत आहेत, पण हा करार मला हवा तसा नाही, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रूथ सोशलवरील एका पोस्टमध्ये ट्रम्प यांनी लिहिले की फेक न्यूज मीडियाला अमेरिकेच्या लष्कराने इराणविरुद्ध किती चांगली कामगिरी केली हे दाखवणे अजिबात आवडत नाही. इराणचा पूर्णपणे पराभव झाला असून ते आता एक करार करू इच्छित आहेत पण असा करार नाही जो मी स्वीकारेन. खर्ग हे बेट पर्शियन आखातात असून ते इराणच्या तेल निर्यातीचे महत्त्वाचे केंद्र आहे. तसेच इराणच्या उर्जा क्षेत्रासाठी याचे महत्त्व खूपच जास्त आहे. तसेच अमेरिकेने नैतिकतेच्या आधारावर येथील तेलासंबंधी पायाभूत सुविधांना लक्ष्य न करण्याचा निर्णय घेतल्याचे ट्रम्प म्हणाले. मात्र यावेळी ट्रम्प यांनी इशारा दिला की, जर होर्मुझच्या समुद्रधुनीमधून जाणा-या जहाजांना कसलाही अडथळा करण्यात आला तर अमेरिका या बेटावरील तेलासंबंधी पायाभूत सुविधांना लक्ष्य न करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करेल. ट्रम्प यांनी दुस-या एका ट्रूथ सोशल पोस्टमध्ये सांगितले की, अमेरिकेने इराणच्या खर्ग बेटावर मध्य पूर्वेच्या इतिहासातील सर्वात शक्तीशाली बॉम्बहल्ला केला आहे. तसेच ट्रम्प यांनी दावा केला की आमेरिकन लष्कराने या बेटावरील लष्करी लक्ष्य पूर्णपणे नष्ट केले. तसेच ट्रम्प यांनी तेलासंबंधी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले नसल्याचेही यावेळी नमूद केले आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांचे आता 'मी पुन्हा येईन'

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळच्या सहकारी लारा लूमर यांनी मोठे भाष्य केले असून डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचे पंतप्रधान मोदी यांच्यासाठी एक खास संदेश पाठवला असल्याचे लारा लूमर यांनी इंडिया टुडे कान्क्लेव्ह २०२६ मध्ये बोलताना म्हटले आहे. यावेळी लारा लूमर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचा एक खास संदेश वाचून दाखवला. लारा लूमर यांनी म्हटले की, मी आताच एका तासापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवर बोलले. तेव्हा ट्रम्प यांनी मला सांगितले की माझा भारतासाठी संदेश आहे.



ट्रम्प म्हणाले की, आय लव्ह इंडिया, लव्ह मोदी. मला भारतीय लोक आवडतात. पंतप्रधान मोदी एक उत्तम नेते आणि माझे चांगले मित्र आहेत. कृपया भारतातील लोकांना सांगा की मी लवकरच पुन्हा एकदा भारतात येईन असे असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले असल्याचे ल?रा लूमर यांनी सांगितले आहे. गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि भारतामधील व्यापार कराराच्या मोठ्या चर्चा सुरू होत्या. अखेर काही दिवसांपूर्वी भारत-अमेरिकेतील बहुप्रतीक्षित व्यापार करारावर दोन्ही देशांची अंतरिम सहमती झाल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. त्यानंतर भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांऐवजी १८ टक्के करण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला. मात्र, जोपर्यंत भारत-अमेरिकेतील बहुप्रतीक्षित व्यापार करारावर दोन्ही देशांची सहमती होत नव्हती, तोपर्यंत डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने भारताच्या विरोधात वक्तव्य करत असल्याचे दिसून आले होते. तसेच भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करावे असेही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले होते. एवढेच नाही तर भारत आणि पाकिस्तान संघर्षात आपण मध्यस्थी केल्याचा दावाही डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. पण भारताने डोनाल्ड ट्रम्प यांचे हे सर्व दावे फेटाळून लावल्यानंतर ते सातत्याने भारताच्या विरोधी वक्तव्य करताना पाहायला मिळाले.

## दिल्ली विद्यापीठात जात पाहून मार्क

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी शुक्रवारी कांशीराम जयंतीनिमित्त झालेल्या संविधान संमेलनात भाग घेण्यासाठी लखनउला पोहोचले होते.



यावेळी त्यांनी दिल्ली विद्यापीठात जात पाहून मुलाखतीत नापास केल्याचा आरोप केला. राहुल म्हणाले मी दिल्ली विद्यापीठात गेलो होतो. मुलाखतीत मुलांना बाहेर काढण्याचा एक मार्ग आहे. तुमची जात काय आहे भैया, तुम्ही मुलाखतीत नापास.दिल्ली विद्यापीठाने राहुल यांचे हे विधान फेटाळून लावले आहे. विद्यापीठाने वर एका पोस्टमध्ये लिहिले- विद्यापीठ सीयूईटी स्कोअरच्या आधारावर प्रवेश देते. अनेक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मुलाखती आवश्यक नाहीत. राहुल यांनी विधान करण्यापूर्वी तथ्यांची तपासणी करायला हवी. दिल्ली विद्यापीठाने सोशल मीडिया प्लॅटफ?र्म वर पोस्ट करून सांगितले की, जर राहुल गांधींचा रोख प्राध्यापक भरतीवर असेल, तर अलीकडच्या काळात सर्व श्रेणींमध्ये हजारो शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान डीयूने राहुल गांधींच्या विधानावर आक्षेप घेत म्हटले- आम्ही अशा टिप्पण्यांचा तीव्र निषेध करतो, कारण त्या विद्यापीठात असे वातावरण निर्माण करतात जे शिक्षण आणि अभ्यासासाठी अनुकूल नाही. राहुल शनिवारी म्हणाले होते, नरेंद्र मोदी मानसिकदृष्टया संपले आहेत. मोदी आता भारताचे पंतप्रधान राहिलेले नाहीत, ते अमेरिकेसाठी काम करत आहेत आणि नरेंद्रने शरणागती पत्करली आहे. जेव्हा मी ही गोष्ट संसदेत बोलणार होतो तेव्हा नरेंद्र मोदी पळून गेले. ते म्हणाले नरेंद्र मोदींनी देशाच्या उर्जा सुरक्षेशी तडजोड केली आहे. कारण आता अमेरिका ठरवत आहे की आपण तेल कुठून घेणार? उर्जा क्षेत्रातील परिस्थिती अजून खराब होईल. राहुल म्हणाले की कांशीरामजी समाजात समानतेबद्दल बोलत होते. जर जवाहरलाल नेहरूजी जिवंत असते तर कांशीरामजी काँग्रेसचे मुख्यमंत्री झाले असते. पण आज भाजपने समाजाला १५ आणि ८५ मध्ये विभागले आहे.

# वारी एनर्जीच्या १० गिगावॅट एकात्मिक प्रकल्पाचे भूमिपूजन

### सौर इनगाट आणि वेफर उत्पादन संकुल असलेले नागपूर भारतातील प्रमुख केंद्र-मुख्यमंत्री

**नागपूर/प्रतिनिधी :** सौरउर्जा निर्मितीमध्ये जागतिकस्तरावर महत्त्वाची भूमिका असलेल्या एकात्मिक इनगाट व वेफर उत्पादन संकुल नागपूर येथे वारी एनर्जिज माध्यमातून उभारण्यात येत आहे. भारतातील सर्वात मोठी १० गिगावॅट क्षमता असलेला हा प्रकल्प सौर क्षेत्रासाठी अधिक स्थिर देशांतर्गत पुरवठा यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे सौरउर्जा निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची नवी ओळख निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अतिरिक्तबुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात वारी एनर्जीज लिमीटेड या आघाडीच्या उद्योग समूहातर्फे भारतातील सर्वात मोठ्या १० गिगावॅट एकात्मिक इनग?ट व वेफर उत्पादन प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.यावेळी अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री डा पंकज भोयर, वारी एनर्जीचे अध्यक्ष हितेशभाई दोशी, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार समीर मेघे, माजी खासदार अजय संचेती, वारी एनर्जीजचे विरेंद्र दोशी, अंकित दोशी, करण दोशी तसेच उद्योग विभागाचे सचिव डा पी. अन्बलगन मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

भारताच्या उर्जा सुरक्षितता व उत्पादन स्वालंबीत्वामधील महत्त्वाचा टप्पा असलेला वारी एनर्जीज हा प्रकल्प सहा हजार २०० कोटी रू पयांच्या गुंतवणुकीसह ३०० एकर जागेवर विकसित होत आहे. या प्रकल्पामुळे दोन हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, या संपूर्ण प्रकल्पामध्ये ३० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून संपूर्ण क्षमता निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. एकात्मिक इनगाट व वेफर उत्पादन यापूर्वी चीनमध्ये होत असून या




प्रकल्पाच्या माध्यमातून नागपूर येथे उत्पादनाला सुरु वात होणार आहे. चीन नंतर जगातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून निर्यात क्षेत्रातही नावलौकिक असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात ७ प्रकल्प मंजूर केले असून त्यापैकी ४ प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी ३ प्रकल्पांचे भूमिपूजन झाले आहे. महाराष्ट्र १ ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करतांना औद्योगिक विकासाला प्राधान्य देत असल्यामुळे दावोस येथे राज्यात गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात सामंजस्य करार झाले आहेत.महाराष्ट्राने तयार केलेल्या मुख्यमंत्री सौर योजनेच्या माध्यमातून १६ हजार मेगावॅट क्षमता पूर्ण करण्यासाठी वेगाने कार्यवाही सुरू असून आतापर्यंत ५ हजार मेगावॅट वीजनिर्मिती झाली असून सर्व शेतक-यांना सौरउर्जा देण्यासाठी कटीबद्ध असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री म्हणाले की, थर्मल पावरमुळे निर्माण होणारे पप्रदूषण टाळण्यासाठी ३०० कोटीपेक्षा जास्त झाडे लावावी लागतील. परंतु सौरउर्जेच्या माध्यमातून प्रदूषण व पर्यावरण संतुलित ठेवण्यास मदत होणार आहे. सौरउर्जेच्या निर्मितीमुळे वीजदर ९ टक्क्यांनी कमी होणार असून सौरउर्जेने संपूर्ण जगभरात क्रांती केली असल्याचे यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. प्रारंभी वारी एनर्जीज लिमिटेडच्या भारतातील सर्वात मोठ्या १० गिगावॅट एकात्मिक इनगाट व वेफर उत्पादन प्रकल्पाच्या पायाउभारणीचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा असलेली विशेष सोलर फोटोफ्रेम प्रकल्पाचे अध्यक्ष हितेशभाई दोशी यांनी प्रदान केली. वारी एनर्जीजचे प्रमुख हितेशभाई दोशी यांनी स्वागत केल्यानंतर प्रास्तविकात अकोला जिल्ह्यात वारी येथून प्रेरणा घेउन या उद्योग समूहाची सुरु वात केली असून या उद्योग समूहाद्वारे २५ देशात निर्यात होत आहे. तसेच १० हजारपेक्षा जास्त प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून ९३ हजार मेगावॅट सौरउर्जा निर्मिती होत आहे. मुख्यमंत्री महोदय यांच्या पुढाकाराने अल्पावधीत प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून पहिल्या टप्प्यात ६ हजार २०० कोटी रूपयांची गुंतवणूक होणार आहे. भविष्यात ३० हजार कोटी रु पयांची गुंतवणूक करण्यात येणार असून येत्या १८ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

# मोदी सरकार स्वत:ची इज्जत घालवत आहे

### युद्धाबाबतच्या भूमिकेवरून प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल

**अकोला/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने स्ट्रेट ऑफ होर्मुज येथून तेलाचे जहाज भारतात आल्याचे म्हटले आहे. मात्र, ते चुकीचे आहे. ते जहान ओमानवरून निघून भारतात आले आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केला. इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धामध्ये भारताने स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे अनेक भारतीय अडकले असून त्यांचा जीव धोक्यात असल्याचा गंभीर आरोपही अड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. अकोल्यात अड. प्रकाश आंबेडकर यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धामध्ये भारताच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



ते म्हणाले, केंद्र सरकारने म्हटले की स्ट्रेट ऑफ होर्मुज येथून तेलाचे जहाज भारतात येउन पोहचले. मात्र, हे चुकीचे आहे. त्याऐवजी हे जहाज ओमान येथून निघून भारतात आले आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुज येथे जगभरातील १४० जहाज थांबले आहेत. त्यातील १७ जहाजांना काल रात्री इराणी सैनिकांनी निशाणा बनवून उद्ध्वस्त केले. १४० जहाजांमध्ये भारताच्या ३५ जहाज स्ट्रेट ऑफ होर्मुजमध्ये अडकल्या आहेत. इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धामध्ये भारत सरकारची भूमिका स्पष्ट नाही. मध्य पूर्व भागातील सर्वसामान्य नागरिक इराणसोबत असल्याचे दिसून येते. मात्र, भारत सरकार कुणाही सोबत नाही, असे ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे आदी उपस्थित होते. केंद्र सरकारला विनंती करतो की, युद्धाच्या कारणामुळे भारतीय अडकले आहेत. विशेष विमान पाठवून त्यांना भारतात आणले पाहिजे. तरच त्यांचा जीव वाचू शकेल, असेही ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्ध संपण्याचे कोणतेही संकेत किंवा मार्ग दिसून येत नाही. युद्धापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्त्रायल येथे जावून आले. त्याठिकाणी त्यांची काय चर्चा झाली, हे सांगणे आवश्यक आहे. सरकारने भूमिका जाहीर केल्यास त्याठिकाणच्या भारतीयांच्या जीवाचे आणि मालमत्तेचे संरक्षण होउ शकते. चुकीची माहिती देउन सरकार आपली इज्जत घालवत आहेत, असा आरोप ॲड. आंबेडकर यांनी केला. या प्रकरणात देशातील नागरिकांनी देखील प्रश्न विचारण्यास सुरु वात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## देशात उन्हासह पावसाची हजेरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्य प्रदेशमध्ये उष्णतेचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. यामुळे उष्णतेच्या लाटेचा धोका वाढला आहे. शुक्रवारीही नर्मदापुरममध्ये सलग दुस-या



दिवशी तापमान ४० अंशापेक्षा जास्त राहिले. हवामान विभागाच्या मते, १५ मार्चपासून राज्यातील हवामान पुन्हा बदलू शकते. या काळात काही भागांमध्ये पाउस पडू शकतो.उत्तर प्रदेशमध्ये तीव्र उष्णतेचा प्रभाव दिसू लागला आहे. शुक्रवारी राज्यात पहिल्यांदाच दिवसाचे तापमान ४० अंशापेक्षा जास्त राहिले. बांदाचे तापमान ४०.२ अंशावर होते. याशिवाय, झाशीमध्ये ३८.३ अंश आणि उरईमध्ये ३७.८ अंश तापमान नोंदवले गेले. आजही गोरखपूरसह १० जिल्ह्यांमध्ये सकाळी धुके होते.राजस्थानमधील अनेक शहरांमध्ये शुक्रवारी ढगाळ वातावरण होते. यामुळे तापमानात घट झाली. चूरू , अलवरसह अनेक शहरांमध्ये पारा २ अंश ते ४ अंशा पर्यंत खाली आला. हवामान विभागाच्या मते, आज ५ जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण, धुळीचे वारे आणि पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. १५ मार्च रोजी १८ जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यासह पावसाची शक्यता आहे. उत्तराखंडमधील ८ जिल्ह्यांमध्ये आज पाउस-बर्फवृष्टीची शक्यता आहे. हवामान विभागाच्या मते, आज उत्तरकाशी, रु द्रप्रयागसह ५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट आहे. राज्यात कमाल तापमान ३१ अंश आणि किमान तापमान सुमारे १७ अंशाच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

## गोव-यांचे दर वधारले

**पुणे/नागपूर :** इराणवर इस्त्रायल-अमेरिकेने चढवलेलला हल्ला., त्यानंतर युद्धाला फुटलेलं तोंड, याला आज १५ दिवस उलटून गेले आहेत. पण तीन देशांच्या या युद्धाच्या अख्ख्या जगाला फटका बसत असून अनेकांना त्याची झळ पोहोचली आहे. भारताला युद्धाचे चटके बसत असून इंधन टंचाईमुळे, गॅसच्या तुटवड्यामुळे लोकं हवालदिल झाले आहेत. महाराष्ट्राही गॅसची टंचाई असून लोकं पॅनिक झाले आहे, गॅसऐवजी इंडक्शन, इलेक्ट्रिक शेगड्या यांचा वापरक करत आहेत. मात्र मोठे व्यवसाय, हाटेल मालक यांनाही सिलेंडरचा तुटवडा भासत असून अनेकांनी चुलीकडे मोर्चा



वळवला. तर काहींनी आता स्वंपाकासाठी पारंपारिक मार्ग निवडला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस सिलिंडरच्या वितरणावरती निर्बंध आले असल्याने आता शेणाच्या गोव-यांना मागणी वाढली आहे. जळगावात गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने म्हशीच्या तसेच गायीच्या शेणापासून तयार होणा-या गोव-यांची विक्री वाढली आहे. व्यवसायिक गॅस सिलिंडर मिळत नसल्याने हाटेल व्यवसायिक चुलीकडे वळले असून चूल पेटवण्यासाठी तसेच घरगुती वापरासाठी शेणाच्या गोव-यांचा वापर केला जात आहे. अनेकांनी चुलीचा पर्याय वापरायला सुरु वात केल्याने लाकडांबरोबरच, म्हशीच्या तसेच गायीच्या शेणाच्या गोव-यांची विक्री मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लाकडांमुळे मोठ्या प्रमाणात धूर होत असल्याने त्याला पर्याय म्हणून, तसेच चूल लवकर पेटण्यासाठी शेणापासून तयार होणा-या गोव-या घेण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. सुरु वातीला कवडीमोल असलेल्या तसेच गोव-यांची आता चांगली विक्री होत असून भावही वाढला आहे.

## यवतमाळात बारमध्ये मद्याचे पेग रिचवत कर्मचा-याने स्वीकारली 50 हजारांची लाच

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील प्रशासकीय केंद्र असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक आणि एका वरिष्ठ लिपिकाला एका बारमध्ये ५० हजार रु पयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. महसूल सहायक गोपाल महादेवराव मोहाडे (४४) व वरिष्ठ लिपिक राहुल अरु णराव कुयटे (३८) अशी आरोपी लोकसेवकांची नावे आहेत. या कारवाईने महसूल प्रशासनात खळबळ उडाली.तक्रारदाराची



कळंब तालुक्यातील मौजा मेंढला शिवारात शेतजमीन आहे. या जमिनीचे स्वरू प भोगवटादार वर्ग-२ असून त्यांना ते भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करायची होती. त्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात रीतसर अर्ज केला होता. ही प्रक्रिया तांत्रिक आणि कायदेशीर असल्याने महसूल विभागाची मंजुरी आवश्यक असते.

या कामाचा पाठपुरावा करताना, जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक गोपाल महादेवराव मोहाडे याने या कामाच्या मोबदल्यात ७५ हजार रु पयांच्या लाचेची मागणी केली. ही रक्कम स्वतः न स्वीकारता त्यांनी त्यांचे जुने सहकारी आणि सध्या पांढरकवडा तहसील कार्यालयात प्रतिनियुक्तीवर असलेले वरिष्ठ लिपिक राहुल अरु णराव कुयटे यांच्याकडे देण्यास सांगितले.लाचेची मागणी झाल्यामुळे तक्रारदाराने ६ मार्च रोजी यवतमाळच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. एसीबीने तातडीने तक्रारीची पडताळणी केली. पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाले आणि तडजोडीनंतर ५० हजार रु पये देण्याचे ठरले. शुक्रवारी, शहरातील गजबजलेल्या स्टेट बँक चौकातील फ्रेंड्स बार मध्ये राहुल कुयटे हा मद्याचे पेग रिचवत लाच स्वीकारण्यासाठी बसला होता. त्यावेळी सापळा रचण्यात आला.राहुल कुयटे याने तक्रारदाराकडून ५० हजार रु पयांची रोकड स्वीकारताच, दबा धरू न बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. या गुन्ह्यात मुख्य सूत्रधार असलेल्या गोपाल मोहाडे यालाही तातडीने ताब्यात घेण्यात आले. या दोन्ही आरोपींविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.सामान्यत? वर्ग-२ जमिनीचे रू पांतर वर्ग-१ मध्ये करण्यासाठी शासनाचे विशिष्ट नियम आणि शुल्क निर्धारित असते. मात्र, नियमानुसार काम करण्याऐवजी अशा प्रकारे खाजगी फायद्यासाठी पैशांची मागणी करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा ठरतो.

# पत्रकारांनी 'एआय'कडे कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पहावे-प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**मुंबई/प्रतिनिधी :** पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर झपाट्याने वाढत असला तरी एआयला वास्तव समजण्याची क्षमता नसते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सत्य शोधण्याची जबाबदारी आणि समाजाचा विश्वास हे पत्रकारितेचे मूलभूत बळ असल्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळातही पत्रकारितेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे, असे मत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले. पत्रकारांनी एआयकडे धोका म्हणून न पाहता कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पाहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित एआय परिषद २०२६चो उद्‌घाटन महासंचालक श्री. सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी एआयमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात होणारे बदल, संधी आणि आव्हाने यावर सविस्तर भाष्य केले. यावेळी संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त देवदास मटाले, अजय वैद्य, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते. सिंह म्हणाले, मानव इतिहासात ज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया छपाई तंत्रज्ञानाच्या शोधानंतर मोठ्या प्रमाणावर बदलली. पूर्वी ज्ञान काही विशिष्ट गटांपुरते मर्यादित होते; मात्र छपाईमुळे ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. त्यानंतर प्रसारमाध्यमांचा विकास झाला. दूरदर्शन सुरू




झाले तेव्हा वृत्तपत्रांना धोका वाटत होता; डिजिटल माध्यमे आली तेव्हा टीव्हीला धोका वाटू लागला. मात्र या सर्व बदलांनंतरही वृत्तपत्रांनी आपले अस्तित्व टिकवले. भविष्यातही पत्रकारिता टिकेल, मात्र जे काही काम स्वयंचलित होउ शकते ते एआयमुळे स्वयंचलित होणार हेही वास्तव आहे, असे त्यांनी नमूद केले. आज पत्रकारितेत एआयचा वापर वाढत आहे. जगात काही ठिकाणी पूर्णपणे स्वयंचलित वन-मॅन न्यूज रूम तयार होत असून बातम्यांचे संकलन, लेखन, संपादन, फॅक्ट-चेकिंग आणि पेज लेआउटसारखी कामे एआयच्या साहाय्याने केली जात आहेत. वित्त, क्रीडा आदी अनेक क्षेत्रांतील बातम्या मोठ्या प्रमाणावर स्वयंचलित पद्धतीने तयार होउ शकतात. त्यामुळे पत्रकारितेतील कामकाजाची पद्धत बदलत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तुमची नोकरी एआय घेणार नाही; पण एआय वापरणारा दुसरा माणूस तुमची नोकरी घेउ शकतो. त्यामुळे पत्रकारांनी एआय कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पत्रकारांना एआयचे प्रशिक्षण देण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या पुढाकारातून लवकरच एआय इन जर्नलिझम हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार असल्याचेही श्री. सिंह यांनी यावेळी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामुळे ज्ञान निर्मिती, प्रसार आणि वापराची संपूर्ण पद्धत झपाट्याने बदलत आहे. पत्रकारितेतील अनेक कामे ही स्वयंचलित होत आहेत. भविष्यातही अनेक कामे स्वयंचलित (ऑटोमेटेड) होणार असली, तरी पत्रकारितेमधून सत्यता मांडण्याची जबाबदारी मात्र मानवी बुद्धिवरच राहणार आहे. त्यामुळे एआयमुळे पत्रकारितेचे स्वरूप बदलणार असले, तरी पत्रकारितेचे मूलभूत बळ म्हणजे विश्वस असून सत्यता, विश्वास आणि संपादकीय जबाबदारी ही पत्रकारितेची मूलभूत तत्त्वे कायम राहणार आहेत, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

एआयमुळे बातम्या रिअल-टाईम, गतिमान आणि वैयक्तिकृत (हायपर पर्सनलाइज्ड) होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आजच्या अटेन्शन इकानामी मध्ये वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध प्लॅटफ?र्मवर वेगवेगळ्या स्वरूपात सामग्री सादर केली जात आहे. काही विदेशी वृत्तसंस्था एकाच बातमीचे अनेक पर्याय तयार करून वेगवेगळ्या वाचकगटांना पाठवतात आणि कोणता प्रकार प्रभावी ठरतो याचा अभ्यास करतात, अशी माहितीही प्रधान सचिव तथा महासंचालक श्री. सिंह यांनी यावेळी दिली.

एआयच्या मदतीने रिअल-टाइम कंटेंट, इन्फोग्राफिक्स आणि व्हिडिओ तयार होत आहेत. त्यामुळे बातम्या लिक्विड आणि सतत बदलणा-या स्वरूपात उपलब्ध होत आहेत. माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. आज एआयमुळे एक व्यक्ती दिवसाला २०-३० लेख तयार करू शकते. त्यामुळे माहितीचे प्रमाण वाढले असले, तरी त्यातील विश्वासार्हतेचा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे, असे श्री. सिंह यांनी सांगितले. एआयची एक मोठी मर्यादा म्हणजे भारतीय भाषांचे आकलन. एआय तंत्रज्ञानात मोठी प्रगती झाली असली तरी त्याला मराठीसह भारतीय भाषांचा संदर्भ पूर्णपणे समजत नाही, असे त्यांनी निदर्शनास आणले. बहुतेक मोठी लँग्वेज माडेल्स ही विकिपीडिया, रेडिटसारख्या पाश्चात्त्य स्रोतांवर आधारित असल्याने भारतीय अनुभव, संस्कृती आणि भाषांचा डेटा कमी प्रमाणात आहे. त्यामुळे भारतीय भाषांसाठी स्वतंत्र एआय विकास आणि डेटा सार्वभौमत्व महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. एआयवर आधारित प्रणाली कधी कधी चुकीची माहिती तयार करतात. हॅलुसिनेशनमुळे नसलेले संदर्भ किंवा माहिती निर्माण होउ शकते. न्यायालयीन प्रकरणांमध्येही एआयने चुकीची माहिती दिल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे एआय-निर्मित सामग्रीची जबाबदारी शेवटी संपादकीय स्तरावरच राहते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

श्री. सिंह म्हणाले की, एआयमुळे माहितीचे प्रचंड प्रमाण तयार होत आहे. डिजिटल माध्यमांमध्ये एआय स्लाप म्हणून ओळखली जाणारी मोठ्या प्रमाणातील हलकी सामग्री तयार होत आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# इच्छामरणाला परवानगी

मागील १३ वर्षापासून कोमात असलेला गाझियाबादचा ३२ वर्षीय हरीश राणा याच्या इच्छामरणाला सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारचा पहिलाच निकाल देताना २०१८ च्या 'कॉमन कॉज' विरूध्द केंद्र सरकार या खटल्यात मान्य करण्यात आलेल्या 'सन्मानाने मरण पावण्याचा मूलभूत अधिकारा' चा आधार घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अनेक निर्णयांमधून मानवी जीवनाच्या अधिकाराचा अर्थ अधिक व्यापक केला आहे. जीवन म्हणजे केवळ श्वास चालू असणे नव्हे, तर सन्मानाने जगण्याची क्षमता असणे. या भूमिकेतून न्यायालयाने काही परिस्थितींमध्ये निष्क्रिय इच्छामरणाला मर्यादित मान्यता दिली आहे. या निर्णयाचे दूरगामी परिणाम भारताच्या वैद्यकीय, सामाजिक आणि कायदेशीर व्यवस्थेवर होणार आहेत. इच्छामरण म्हणजे एखाद्या व्यक्तीला असाध्य आजार, असह्य वेदना किंवा अत्यंत गंभीर अवस्थेमुळे स्वतःच्या इच्छेने मृत्यू स्वीकारण्याची परवानगी देणे. याचे दोन प्रकार मानले जातात सक्रिय इच्छामरण आणि निष्क्रिय इच्छामरण. सक्रिय इच्छामरणामध्ये डॉक्टर किंवा इतर व्यक्ती जाणीवपूर्वक रुग्णाचा मृत्यू घडवून आणणारी कृती करतात. उदाहरणार्थ, घातक इंजेक्शन देणे किंवा औषधांचा अतिमात्रेत वापर करणे. हा प्रकार बहुतेक देशांमध्ये अत्यंत कठोर अटींशिवाय मान्य केलेला नाही आणि भारतात तर तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. निष्क्रिय इच्छामरणामध्ये रुग्णाला जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक असलेली वैद्यकीय साधने किंवा उपचार थांबवले जातात तर जीवनरक्षक प्रणाली काढून घेतल्यामुळे किंवा कृत्रिमरीत्या दिले जाणारे पोषण थांबवल्यामुळे रुग्णाचा मृत्यू होतो. सर्वोच्च न्यायालयाअच्या ताज्या निर्णयामुळे हा विषय नव्याने चर्चेत आला. भारतात इच्छामरणाच्या प्रश्नावर न्यायालयीन पातळीवर दीर्घकाळ चर्चा झाली आहे. २०११ मध्ये अरुणा शानबाग प्रकरणाने या विषयाकडे देशाचे लक्ष वेधले. त्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने प्रथमच मर्यादित स्वरूपात निष्क्रिय इच्छामरणाची संकल्पना मान्य केली. यानंतर २०१८ मध्ये सर्वोच न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिलेला निर्णय हा या विषयातील महत्त्वाचा टप्पा ठरला. न्यायालयाने संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत 'सन्मानाने जगण्याचा अधिकार' हा 'सन्मानासह मरण्याचा अधिकार' याचाही समावेश करणारा असल्याचे स्पष्ट केले. या निर्णयात न्यायालयाने 'लिव्हिंग विल' किंवा अग्रिम वैद्यकीय निर्देशांची संकल्पना मान्य केली. याचा अर्थ असा, की एखादी व्यक्ती पूर्ण शुद्धीमध्ये असताना आधीच लिहून ठेवू शकते, की भविष्यात ती असाध्य आजाराने ग्रस्त झाली आणि कृत्रिम आधाराशिवाय जगणे शक्य नसेल, तर तिला कृत्रिमरीत्या जिवंत ठेवू नये. सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाचा प्रश्न अत्यंत सावध आणि संतुलित पद्धतीने हाताळला आहे. एका बाजूला मानवी करुणा आणि रुग्णांच्या असह्य वेदनांचा विचार केला गेला, तर दसऱ्या बाजूला समाजातील संभाव्य गैरवापराची शक्यताही लक्षात घेण्यात आली. न्यायालयाने स्पष्ट केले आहे, की इच्छामरणाची परवानगी देताना अत्यंत कठोर प्रक्रिया अनुसरावी. डॉक्टरांचे पॅनल, वैद्यकीय अहवाल आणि रुग्णाची स्पष्ट इच्छा यांची खात्री झाल्यानंतरच अशा निर्णयाला परवानगी दिली जावी. यामागील प्रमुख कारण म्हणजे इच्छामरणाचा गैरवापर होण्याची भीती. संपत्ती, कौटुंबिक वाद किंवा सामाजिक दबाव यासारख्या कारणांमुळे एखाद्या व्यक्तीला मृत्यूकडे ढकलले जाऊ नये. भारतामध्ये इच्छामरणाची पूर्णपणे कायदेशीर अंमलबजावणी करायची असेल, तर अनेक स्तरांवर बदल करावे लागतील. सर्वप्रथम स्पष्ट आणि सुसंगत कायदा आवश्यक आहे. सध्या इच्छामरणाची प्रक्रिया प्रामुख्याने न्यायालयीन निर्णयांवर आधारित आहे. त्यामुळे संसदेमार्फत सविस्तर कायदा करण्यात येणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करावी लागतील. डॉक्टर, रुग्णालये आणि वैद्यकीय मंडळ यांची भूमिका याबाबत स्पष्ट नियम असणे आवश्यक आहे. तिसरे म्हणजे 'लिव्हिंग विल' या संकल्पनेचा व्यापक प्रचार आणि नोंदणी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. डिजिटल आरोग्य नोंदींच्या माध्यमातून ही प्रक्रिया अधिक सुलभ करता येऊ शकते. चौथे म्हणजे संभाव्य गैरवापर टाळण्यासाठी मजबूत नियंत्रण व्यवस्था निर्माण करावी लागेल. प्रत्येक प्रकरणात स्वतंत्र वैद्यकीय मंडळ आणि कायदेशीर पडताळणी आवश्यक असू शकते. इच्छामरणाचा प्रश्न केवळ कायद्यापुरता मर्यादित नाही. तो नैतिक आणि सामाजिक मूल्यांशीही जोडलेला आहे. अनेक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांमध्ये जीवन पवित्र मानले जाते आणि मृत्यूची निवड करणे नैतिकदृष्ट्या अयोग्य मानले जाते. त्याच वेळी काही विचारवंतांच्या मते एखाद्या व्यक्तीचे जीवन केवळ असह्य वेदनांनी भरलेले असेल, तर त्याला सन्मानाने मृत्यू निवडण्याचा अधिकार असावा. दोन टोकांच्या या मतांमध्ये संतुलन साधणे हे कोणत्याही समाजासाठी मोठे आव्हान असते. इच्छामरणाच्या चर्चेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मानवी करुणा. दीर्घकाळ असाध्य आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांची वेदना केवळ शारीरिक नसते, तर मानसिक आणि सामाजिकदेखील असते. अशा परिस्थितीत कुटुंबीयांवरदेखील प्रचंड भावनिक आणि आर्थिक ताण येतो. त्यामुळे इच्छामरणाचा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण समाजाशी संबंधित ठरतो. भारतामध्ये इच्छामरणाचा प्रश्न अद्याप पूर्णपणे निकाली निघालेला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांनी या विषयाला एक वैचारिक चौकट दिली आहे; परंतु अंतिम धोरण ठरवण्याची जबाबदारी संसद आणि समाजावर आहे. आगामी काळात वैद्यकीय विज्ञानातील प्रगती, सामाजिक मूल्यांमधील बदल आणि मानवी हक्कांविषयी वाढती जागरूकता या सर्वांचा या प्रश्नावर प्रभाव पडणार आहे. इच्छामरणाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर नाही, तर मानवी जीवनाच्या मूलभूत मूल्यांशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने या विषयाकडे अत्यंत संवेदनशीलतेने पाहत काही मर्यादित परिस्थितींमध्ये निष्क्रिय इच्छामरणाला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे रुग्णांच्या सन्मानाचा प्रश्न केंद्रस्थानी आला आहे; परंतु त्याच वेळी संभाव्य गैरवापर टाळण्यासाठी अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. मानवी करुणा, वैद्यकीय नैतिकता आणि कायद्याची चौकट यांचा समतोल राखत भारताने या विषयावर पुढील पावले उचलली पाहिजेत. कारण शेवटी प्रश्न केवळ मृत्यूचा नाही, तर मानवी सन्मानाचा आहे. वेदना, करुणा आणि कायद्याच्या चौकटीतील कठीण प्रश्न कधी कधी आयुष्य माणसाला अशा वळणावर आणून उभे करते, की जिथे घेतलेला प्रत्येक निर्णय हृदय पिळवटून टाकणारा ठरतो. म्हणूनच बदलत्या काळातही हा अत्यंत कळीचा विषय ठरतो.

# इंधनटंचाई कधीतरी संपेल, पण सरकारच्या 'संवाद टंचाई'चे काय करायचे?

**इंधन टंचाईच्या प्रश्नाने केवळ पुरवठा व्यवस्थेतील समस्या उघड केल्या नाहीत, तर सरकार आणि नागरिक यांच्यातील विश्वासाच्या नात्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सरकारने या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहिले नाही आणि जनतेच्या अनुभवांना मान्यता दिली नाही, तर वाढता असंतोष भविष्यात मोठ्या राजकीय परिणामांना कारणीभूत ठरू शकतो.**

सरकारच्या कारभारावर टीका करणे हे कोणत्याही लोकशाही समाजात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. कारण लोकशाही व्यवस्थेत सत्तेचा अंतिम स्रोत जनता असते आणि सरकार हे त्या जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम करत असते. त्यामुळे सरकारने केलेल्या दाव्यांची आणि प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची तुलना करून त्याचे विश्लेषण करणे ही केवळ राजकीय टीका नसून लोकशाहीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेली बौद्धिक प्रक्रिया असते. अलीकडच्या काळात इंधन टंचाईच्या संदर्भात सरकारचे दावे आणि जनतेच्या अनुभवांमध्ये निर्माण झालेली तफावत ही अशाच प्रकारच्या विश्लेषणाची मागणी करते. सरकार एकीकडे देशात इंधनाचा पुरेसा साठा असल्याचे सांगत आहे, तर दुसरीकडे अनेक शहरांमध्ये गॅस सिलेंडरच्या वितरणामध्ये अडथळे निर्माण होत असल्याचे दिसत आहे, उद्योगधंदे अडचणीत येत आहेत, खानावळी बंद पडत आहेत आणि सामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या दोन गोष्टींमधील विसंगती ही केवळ प्रशासकीय अकार्यक्षमता दर्शवणारी नाही, तर ती माहितीच्या व्यवस्थापनातील आणि जनतेशी संवाद साधण्यातील गंभीर समस्येकडेही निर्देश करते.

पुणे, कोल्हापूर, इचलकरंजी, सातारा अशा महाराष्ट्रातील औद्योगिक आणि व्यापारी दृष्ट्या महत्त्वाच्या शहरांमध्ये गॅस सिलेंडरच्या वितरणातील अडचणींमुळे आंदोलन करण्याची वेळ आली आहे, ही बाब गंभीर नाही काय? उद्योगधंदे आणि सेवा क्षेत्रे ही आधुनिक अर्थव्यवस्थेची कणा असतात. लहान खानावळी, चहाचे हातगाडे, मेस, भोजनालये आणि इतर छोटे व्यवसाय हे केवळ व्यापारी उपक्रम नसून हजारो लोकांच्या उपजीविकेचे साधन असतात. तसेच हजारो जीवांची क्षुधाशांती करणारी केंद्रे असतात. इंधनाच्या अभावामुळे अशा व्यवसायांना बंद करण्याची वेळ येते, तेव्हा त्याचा परिणाम संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो. शहरातील खानावळी बंद पडल्यामुळे स्पर्धा परीक्षांसाठी शहरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा गावाकडे परत जावे लागत आहे, ही घटना केवळ आर्थिक अडचणीचे लक्षण नाही तर ती सामाजिक परिणामांची साखळी दाखवते. शिक्षण, रोजगार, आणि स्थलांतर यासारख्या अनेक क्षेत्रांवर अशा टंचाईचा अप्रत्यक्ष परिणाम होतो.

या परिस्थितीतील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे सरकारकडून केले जाणारे दावे आणि प्रत्यक्षात दिसणारे वास्तव यांच्यातील तफावत. खरोखरच देशात इंधनाचा पुरेसा साठा असेल, तर स्थानिक स्तरावर इतक्या मोठ्या प्रमाणात वितरणातील अडथळे का निर्माण होत आहेत? काही वेळा प्रशासन असे म्हणते की समस्या पुरवठ्याची नसून वितरण व्यवस्थेतील आहे. इतकी अकार्यक्षम वितरण व्यवस्था दोन-चार दिवसात निर्माण होत नाही ना की त्यामुळे अचानक उद्योगधंदे बंद पडावेत? मग इतके दिवस सरकार काय झोपले होते? याचा अर्थ त्यांनी या अकार्यक्षम वितरण व्यवस्थेकडे दुर्लक्ष केले असे होत नाही काय? खरे तर इंधनाच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे इंधन टंचाई निर्माण झाली आणि त्यामुळे नागरिकांना मूलभूत गरजांसाठी रांगा लावाव्या लागत आहेत, हे गंभीर प्रशासकीय अपयशच ठरत नाही काय? कारण नागरिकांना प्रत्यक्षात कोणती समस्या आहे यापेक्षा त्यांना त्याचा सामना कसा करावा लागत आहे हे सरकारने समजून घेणे अधिक महत्त्वाचे असते.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये गरीब मुलांना दिला जाणारा पोषण आहार हा अनेक कुटुंबांसाठी अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम असतो. कारण त्यामुळे शाळा गळतीला आळा बसतो. अनेक मुलांसाठी शाळेत मिळणारा हा आहार दिवसातील सर्वात पौष्टिक अन्न असते. गॅस टंचाईमुळे हा कार्यक्रम अडचणीत येत असेल, तर त्याचा परिणाम थेट मुलांच्या आरोग्यावर आणि शिक्षणावर होतो. अशा परिस्थितीत सरकारने



त्वरित उपाययोजना करणे अपेक्षित असते. परंतु सरकारच समस्या नाकारण्याच्या भूमिकेत राहते, तेव्हा समस्या सोडवण्याची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची बनते.

कोल्हापुरात पाईपलाईनद्वारे पुरवला जाणारा नैसर्गिक वायू बंद करण्यात आल्याची घटना देखील असे अनेक प्रश्न उपस्थित करते. शहरांमध्ये पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा करण्यामागे मुख्य उद्देश असा असतो की, नागरिकांना आणि उद्योगांना सतत आणि स्थिर इंधन पुरवठा मिळावा. अशा प्रकारचा पुरवठा अचानक बंद केला जात असेल, तर त्यामागील कारणे स्पष्टपणे सांगितली जाणे आवश्यक असते. अन्यथा अफवा, असंतोष आणि अविश्वास निर्माण होणे अपरिहार्य ठरते. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता ही केवळ नैतिक मूल्य नसून ती प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेली अट आहे. या सर्व परिस्थितीमध्ये माहितीचे राजकारणही तितकेच महत्त्वाचे ठरते. आधुनिक राजकारणात सरकार अनेकदा जनमत व्यवस्थापनासाठी माहितीचे निवडक सादरीकरण करते. म्हणजेच स्वतःच्या सोयीच्या असलेल्या काही आकडेवारी किंवा घटनांना अधिक महत्त्व दिले जाते, तर काही गोष्टी दुर्लक्षित केल्या जातात. परंतु नागरिकांना त्यांच्या रोजच्या जीवनात प्रत्यक्ष अडचणींचा सामना करावा लागतो, तेव्हा अधिकृत दावे आणि वास्तव यांच्यातील अंतर स्पष्टपणे जाणवू लागते. अशा वेळी सरकारवरचा विश्वास कमी होऊ लागतो.

या इंधन टंचाईवर मात करण्यासाठी भारतीय ध्वज असलेल्या जहाजाला होर्मुझ सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी मिळाल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला असल्याचे सांगितले जाते, परंतु त्याला इराणकडून पुष्टी मिळत नसल्याचेही म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा प्रकारच्या माहितीची देवाणघेवाण अत्यंत संवेदनशील असते. सरकारने केलेल्या दाव्यांना संबंधित देशांकडून पुष्टी मिळत नसेल, तर त्याचा परिणाम केवळ देशांतर्गत राजकारणावरच होत नाही तर आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवरही होऊ शकतो. परराष्ट्र धोरणात विश्वासार्हता ही अत्यंत महत्त्वाची असते, कारण तीच पुढील वाटाघाटी आणि सहकार्याची पायाभूत अट असते. लोकशाही व्यवस्थेत सरकारचे सर्वात मोठे भांडवल म्हणजे जनतेचा विश्वास. हा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सरकारने पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि उत्तरदायित्व या तत्त्वांचे पालन करणे आवश्यक असते. जर सरकार सतत परिस्थितीपेक्षा वेगळे चित्र सादर करत असेल, तर काही काळासाठी ते राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते, परंतु दीर्घकालीन दृष्टीने ते धोकादायक ठरते. कारण एकदा नागरिकांना असे वाटू लागले की सरकार त्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत आहे किंवा त्यांच्याशी प्रामाणिकपणे संवाद साधत नाही, तर असंतोष वाढू लागतो.

इतिहासात असे अनेक प्रसंग आढळतात की, आर्थिक किंवा सामाजिक अडचणींमुळे निर्माण झालेला असंतोष राजकीय आंदोलनांमध्ये रूपांतरित झाला आहे. इंधन टंचाई, अन्नधान्याची कमतरता, बेरोजगारी, आणि महागाई यासारख्या प्रश्नांमुळे अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनआंदोलने झाली आहेत. त्यामुळे सरकारने अशा संकेतांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. लोकशाही व्यवस्थेत असंतोष हा अनिवार्यपणे वाईट असतोच असे नाही; उलट तो सरकारला आपल्या धोरणांचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. परंतु जर या असंतोषाकडे दुर्लक्ष केले गेले, तर तो अधिक तीव्र स्वरूप धारण करू शकतो. म्हणूनच सध्याच्या परिस्थितीत सर्वात महत्त्वाची गरज आहे ती म्हणजे वास्तववादी आणि पारदर्शक संवादाची. काही कारणांमुळे तात्पुरती टंचाई निर्माण झाली आहे आणि ती दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, हे सरकारने स्पष्टपणे सांगितले तर नागरिक अधिक सहानुभूतीने परिस्थितीकडे पाहू शकतात. परंतु समस्या नाकारण्याची किंवा वेगळे चित्र सादर करण्याची प्रवृत्ती दीर्घकालीन दृष्टीने विश्वासघातासारखी वाटू शकते.

शेवटी, कोणत्याही सरकारची खरी कसोटी ही संकटकाळात होते. विकासाचे मोठे दावे करणे सोपे असते, परंतु सामान्य नागरिकांना रोजच्या जीवनातील मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो, तेव्हा सरकारच्या प्रशासनिक क्षमतेचे आणि नैतिक प्रामाणिकतेचे खरे मूल्यांकन होते. इंधन टंचाईच्या या प्रश्नाने केवळ पुरवठा व्यवस्थेतील समस्या उघड केल्या नाहीत, तर सरकार आणि नागरिक यांच्यातील विश्वासाच्या नात्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सरकारने या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहिले नाही आणि जनतेच्या अनुभवांना मान्यता दिली नाही, तर वाढता असंतोष भविष्यात मोठ्या राजकीय परिणामांना कारणीभूत ठरू शकतो. लोकशाहीमध्ये सत्ता ही कायमस्वरूपी नसते; ती जनतेच्या विश्वासावर उभी असते. आणि तो विश्वास एकदा ढासळला की कोणतेही सरकार कितीही मजबूत वाटत असले तरी टिकून राहणे कठीण होते.

**जगदीश काबरे**

## सजग ग्राहक बाजारपेठेची खरी ताकद!

जागतिक ग्राहक दिन दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा केला जातो. एक ग्राहक म्हणून आपले हक्क काय आहेत याविषयी जागरूकता निर्माण व्हावी याकरिता हा दिवस साजरा केला जातो. बरेचदा खरेदी करताना नवनवीन मार्केटिंग फंडात अडकून ग्राहक ठगले जातात. तर कधी सुपरमार्केटमधील आकर्षक ऑफर्सना अनवधानाने बळी पडून नकळतपणे अनावश्यक खर्च होऊन जातो.

बाजारपेठेचा केंद्रबिंदू म्हणजे ग्राहक! आणि हा केंद्र बिंदूच बाजारपेठेत अनेक वेळा फसवणुकीला बळी पडतो, असे चित्र बघायला मिळते. आकर्षक जाहिराती, मोठ्या सवलतींचे आमिष, 'एकावर एक फ्री' अशा ऑफर्स पाहून अनेकजण विचार न करता खरेदी करतात. त्या क्षणी ती खरेदी फायदेशीर वाटते; पण नंतर लक्षात येते की अनेक वस्तू गरजेच्या नव्हत्याच.

कधी वस्तूची गुणवत्ता निकृष्ट असते, कधी मुदत संपण्याच्या जवळ आलेल्या वस्तू विकल्या जातात, तर कधी बिल न देता ग्राहकांची फसवणूक केली जाते. अशा वेळी ग्राहकाने सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. वस्तू घेताना तिची किंमत, उत्पादनाची तारीख, मुदत, गुणवत्ता आणि बिल घेणे या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्राहकांनी खरेदी संदर्भातील आपले हक्क जसे की, सुरक्षेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, योग्य किंमतीत वस्तू मिळण्याचा हक्क आणि तक्रार नोंदवण्याचा हक्क याविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे.

जागतिक ग्राहक दिन आपल्याला याच गोष्टीची आठवण करून देतो. सजग आणि जागरूक ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्रबिंदू असून बाजारपेठेची ताकद आहे याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. याकरिता प्रत्येकाने जागरूक ग्राहक बनून स्वतःचे आणि समाजाचे हित जपावे.

**प्रिया बागडदेव**

# इराणने अमेरिकेला कोंडीत पकडले

इस्त्रायल -अमेरिका यांनी इराण विरुद्ध सुरू केलेल्या युद्धाला दोन आठवडे होत असताना, या प्रकरणी अमेरिकेचे कुठे चुकले ते पहाण्याची आवश्यकता आहे. जगातील सर्वात शक्तीशाली असलेल्या राष्ट्राचे नेतृत्व सध्या असा माणूस करत आहे, जो अतिशय गोंधळलेला आहे. इराणच्या विरोधातील युद्धाची व्याप्ती आता मोठ्या प्रमाणात वाढली असून, अमेरिका आणि इस्त्रायलच्या सततच्या हल्ल्यांमुळे इराणमध्ये सध्या मृत्यूचे तांडव सुरू आहे. इराणमध्ये आतापर्यंत दोन हजारच्या आसपास नागरिक बॉम्ब हल्ल्यांना बळी पडले आहेत. त्यामध्ये १७५ शालेय विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तेल आणि गॅस यांच्या वाढत्या किंमती अमेरिकेतील गरीब आणि कष्टकरी कामगारांचे जीणे हराम करत आहेत.

अमेरिका युद्धावर प्रचंड प्रमाणात खर्च करत आहे. साधारणपणे दिवसाला एक बिलियन डॉलर्स खर्च होत आहेत. हाच खर्च तासांच्या हिशोबात मांडायचा झाल्यास या युद्धावर अमेरिकेचे दर तासाला ४ कोटी सोळा लाख ६६ हजार ६६७ डॉलर्स खर्च होत आहेत आणि यातून काय साध्य होणार आहे? हेच पैसे अमेरिकेन जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी वापरता आले असते. अमेरिकन जनतेला चांगल्या आरोग्य विषयक सुविधा, खिशाला परवडतील अशी घरे, लहान मुले आणि वृद्धांची चांगली काळजी घेणारी व्यवस्था या गोष्टींची जास्त गरज आहे. मात्र सरकारकडून सांगण्यात येते की आम्हाला ते परवडणारे नाही. मात्र पेंटॅगॉनसाठी अमेरिका अंदाजे एक ट्रिलियन डॉलर्स खर्च करत आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे या युध्दाला सामान्य अमेरिकन माणसाचा पाठिंबा दिसत नाही. गार्डियन या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, युध्दाच्या बाबतीत अमेरिकन जनतेची मते जाणून घेण्यासाठी जे निरनिराळे पोल्स अमेरिकेत आयोजित करण्यात येत आहेत, त्यांमध्ये या युद्धाला बहुसंख्य अमेरिकन जनतेचा पाठिंबा नसल्याचे आढळून आले आहे. अमेरिकेने आजवर जी युद्धे लढली, त्यांमध्ये इराण विरोधातील युद्ध हे असे आहे की ज्याला बहुसंख्य अमेरिकन जनतेचा विरोध आहे.

जगातील सर्वात श्रीमंत आणि सर्वात शक्तिशाली अशा अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे नेतृत्व केले आहे. परंतु आज त्या देशाचे नेतृत्व एक अतिशय गोंधळलेला माणूस करत आहे. ट्रंप यांनी युद्धाचा निर्णय एकट्याने घेतला आहे. त्यांनी त्याकरता अमेरिकन कॉंग्रेसची मान्यता घेतलेली नाही. ट्रंप यांनी आपल्या दोस्त राष्ट्रांना या करता विश्वासात घेतलेले नाही. इतकेच काय, इराण विरोधात युद्ध का सुरू केले याच नेमक कारण त्यांनी स्पष्ट केलेले नाही.

हा सगळा विध्वंस एका व्यक्तीने आरंभला असून, त्यामध्ये अनेक निरपराध माणसे मारली गेली आहेत. या युद्धामुळे अमेरिकेच्या तिजोरीवर मोठा भार पडला असून, त्याचे परिणाम अमेरिकेला दिर्घकाळ सोसावे लागतील.

अमेरिकेला व्हिएतनाम विरुद्धच्या युद्धात अपमानित व्हावे लागले. अफगाणिस्तानच्या विरोधातील युद्धातही अमेरिकेची तीच गत झाली. इराण विरोधातील युद्धात ट्रंप यांना आपला फाजील आत्मविश्वास नडत आहे. कतार, बहारिन, सौदी अरेबिया वगैरे आखाती देशांतील अमेरिकन तळांवर हल्ला करून इराणने अमेरिकेला जेरीस आणले आहे. आता हे अमेरिकन तळ, आखाती देशांसाठी आपत्ती होऊन बसेल आहेत. युध्द तुम्ही सुरू केलेत, आता त्याचा शेवट कसा करायचा हे आम्ही ठरवू, अशाप्रकारची भाषा इराणकडून केली जात आहे. अमेरिकेवर दबाव आणण्यासाठी इराणने महत्वाचा तेल व्यापारी मार्ग, हॉर्मुझची सामुद्रधुनी, बंद केला आहे. यामुळे जागतीक तेलाच्या किंमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. इराणने अमेरिका आणि इस्त्रायलशी संबंधित जहाजांना या मार्गावरुन जाण्यास मनाई केली आहे

.अशाप्रकारे इराणने अमेरिकेला चांगलेच कोंडीत पकडले आहे. महत्त्वाचे म्हणजे या मार्गावरुन जगातील सुमारे २० ते २५ टक्के तेलाचा पुरवठा होतो, त्यामुळे अमेरिकेवरील दबाव दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. इस्त्रायलच्या नादी लागून, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी विनाकारण अमेरिकेला युद्धाच्या खाईत लोटले आहे. त्याचे परिणाम अमेरिकेला दिर्घकाळ सोसावे लागणार आहेत.

**अभय गोखले**


# असंघटीत शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी महिलांना सावत्रपणाची वागणूक का?

**प्रति,**
**मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस**
**महाराष्ट्र शासन**
**उपमुख्यमंत्री, सुनेत्रा पवार**
**महाराष्ट्र शासन**

**विषय: असंघटीत शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी महिलांची सावत्रपणाची वागणूक का?**

**सस्नेह नमस्कार**

महाराष्ट्र सरकार व्दारा आयोजीत जागतीक महिला दिन, जागतीक शेतकरी महिला दिनाच्या निर्मित्ताने आयोजीत महिला शेतक-यांचे सक्षमीकरण या कार्यक्रमातील सर्वांचे मनोगत (विचार) एकूण समाधान झाले. भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामीनाथनजी यांच्या कन्या डी. सोम्या स्वामीनाथनजी व डॉ. निलाजी यांचा सरकारने जो सन्मान केला त्याचा ही आनंद आहे.



छत्रपती राजे शिवाजी महाराजांच्या काळात शेतक-यांच्या हित रक्षणाचे आदेश दिले जात होते. म्हणूनच महाराज म्हणाले होते की, 'शेतक-यांच्या भाजीच्या देठाला पण हात लावू नका..?

मोगलांनी- इंग्रजांनी भारतीय जनतेचा गुलाम केले हे सत्य नाकारता येणार नाही. पण आज ७८ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही शेतकरी-शेतमजूर असंघटीत श्रम शक्ती गुलाम म्हणूनच मरत आहे, याचे अधिक दुःख आहे. या कार्यक्रमातील सर्वांची भाषण ऐकूनच हे पत्र लिहीण्याची प्रेरणा मिळाली आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या आम्ही सर्वजण गप्पा मारतो. पण, वास्तविकता काय आहे? या वादात मी पडू इच्छित नाही. पण सरकारच्या धोरणात्मक निर्णयामध्ये महिला-महिलांमध्ये दुजाभाव व सावत्रपणाची वागणूक दिली जाते याचे दुःख आहे.

आमच्या सरकारच्या धोरणात संघटीत महिलांना दोन बाळंतपणासाठी १८० दिवसाची प्रसूती रजा दिली जाते, तोच न्याय शेतकरी शेतमजूर, असंघटीत कष्टकरी महिलांना का नाही? त्यांना पण १८० दिवसाची पगारी रजा का नाही? मनरेगा आता जय श्रीरामजी योजनेच्या माध्यमातून राज्याचे किमान वेतन हिशेबात घेऊन १८० दिवसाची मजुरी त्या माय-बहिणीच्या जन-धन खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला तर ही सावत्र पणाची वागणूक समाप्त होऊन पापमुक्त होता येईल. ही विनंती आहे.

या संदर्भात राज्यसभा सदस्य आदरणीय श्रीमती सुधाजी मुर्ती यांना लिहिलेले पत्र पण देत आहे. महाराष्ट्र सरकारच कृषीमूल्य आयोग स्त्री-पुरूष शेतमजूरांची मंजूरी उत्पादन खर्च करताना हिशेबात किती घेते, आणि तीच मजूरी दिल्लीचे कृषीमूल्य आयोग हिशेबात घेते का? याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. आपण विचार करावा ही विनंती.

धन्यवाद!

आपला विनम्र
**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

# राष्ट्रीय लोकअदालत मध्ये 13,967 प्रकरणे निकाली..!

## दोन कुटुंबांचा संसारही पुन्हा जुळला

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार १४ मार्च २०२६ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर चू. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोक अदालत पार पडली. या वेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती नंदेश शं. देशपांडे आभासी पद्धतीने उपस्थित राहून लोकअदालतीचे महत्त्व स्पष्ट केले व जास्तीत जास्त प्रकरणे आपसी तडजोडीने निकाली काढण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला जिल्हा न्यायाधीश एस. यू. बघेले, एस. आर. शर्मा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दीपक एच. दाभाडे, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सी. एल. देशपांडे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश पी. एस. इंगळे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते. लोकअदालतीत न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांसह वादपूर्व प्रकरणे, विविध राष्ट्रीयकृत बँका व पतसंस्थांची प्रकरणे ठेवण्यात आली होती. पक्षकारांनी स्वेच्छेने तडजोडीचा मार्ग स्वीकारल्यामुळे जिल्ह्यातील १८८७ प्रलंबित प्रकरणे व १२,०८० वादपूर्व प्रकरणे अशी एकूण १३,९६७ प्रकरणे निकाली निघाली. या प्रकरणांचे एकूण तडजोड मूल्य तब्बल २२ कोटी २९ लाख ६७ हजार २३४ रुपये इतके आहे. विशेष म्हणजे पाच ते दहा वर्षांपासून प्रलंबित असलेली २६ हून अधिक प्रकरणे ही सामंजस्याने मार्गी लागली. याशिवाय लोकअदालतीत दोन दांपत्यांमधील वाद मिटून त्यांचा संसार पुन्हा जुळल्याची हृद्य घटना घडली. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, विविध शासकीय अधिकारी, बँका, विमा कंपन्या, वकील, स्वयंसेवक व न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे ही राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी ठरली.

# रस्त्याचे डांबरीकरण झाले; मात्र दोन्ही बाजूच्या नाली बांधकाम रखडले



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - पुसद ते सावंगी तसेच राठोड यांच्या शेतापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंने नाल्यांचे बांधकाम करणे अपेक्षित असतानाही ठेकेदाराने ते केले नसल्याची तक्रार पुढे आली आहे. या संदर्भात मौजा एरंडा येथील भाजप कार्यकर्ते संजय ठाकरे यांनी बुधवार दि.११ मार्च रोजी उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पुसद ते सावंगी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. मात्र पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्हावा यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंने नाल्यांचे बांधकाम करणे आवश्यक असतांनाही ठेकेदाराने नाल्या बांधल्या नाहीत. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूने मुरूमही टाकण्यात आलेला नसल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणाची उपअभियंत्यांनी तातडीने दखल घेऊन रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करावी व दोषी आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार ठाकरे यांनी केली आहे. तसेच रस्त्याचे डांबरीकरणही निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे. याबाबत योग्य कारवाई तात्काळ करण्यात यावी अन्यथा संबंधित कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा त्यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात काय कारवाई करतात, याकडे तक्रारकर्ता व नागरिकांचे लक्ष लागले आहे.


# "आयपीएल सट्टयाचा काळाबाजार होणार सुरू..!

## फंटरांवर धाडी, मुख्य बुकींना पोलिसांचे अभय आहे का?"

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेसोबत सट्टा बाजारही झपाट्याने वाढत असून आयपीएल स्पर्धा सुरू होताच जिल्ह्यात अवैध सट्टेबाजीला अक्षरशः उधाण येत असल्याचे चित्र समोर येत आहे. ८ मार्च २०२६ रोजी भारताने टी-ट्वेंटी विश्वचषक जिंकून देशाला अभिमानास्पद क्षण दिला असला तरी या मोठ्या सामन्यांच्या पार्श्वभूमीवर सट्टेबाजांनी कोट्यवधी रुपयांची उलाढाल केल्याची चर्चा रंगली आहे.

आयपीएल सामन्यांदरम्यान प्रत्येक चेंडू, चौकार, षटकार किंवा विकेटवर पैज लावली जाते. या डिजिटल सट्टा बाजारात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून पासवर्ड संरक्षित संकेतस्थळे, क्लोज सर्किट ॲप्स आणि क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार केले जात असल्याची माहिती समोर आली आहे. यवतमाळ जिल्ह्यातही या अवैध सट्टेबाजीचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. यवतमाळ शहरासह वणी, पांढरकवडा, आर्णी, दिग्रस, घाटंजी, पुसद आणि नेर या शहरांमध्ये स्थानिक सटोडियांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सट्टा खेळला जात असल्याची माहिती



विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातील काही प्रमुख बुकींनी पोलिसांच्या कारवाई पासून बचाव करण्यासाठी आपले प्रस्थान ऑपरेशन बाहेर जिल्ह्यातील शहरांत हलविले असल्याची चर्चा आहे. तेथूनच स्थानिक फंटरांच्या माध्यमातून जिल्ह्यात सट्टेबाजीचे जाळे चालविले जात आहे. अमरावती येथील काही बलाढ्य बुकींसोबत यवतमाळातील सटोडियांचे घनिष्ठ संबंध असून त्यांच्याकडे 'खायवली' दिली जात असल्याचे सांगितले जाते.


या व्यवहारातून कोट्यवधी रुपयांची अवैध उलाढाल होत असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान, जिल्ह्यात अवैध व्यवसायांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस यंत्रणेवरही नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. क्रिकेटच्या नावाखाली सुरू असलेला हा डिजिटल जुगार अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडवत असून तरुण वर्ग यामध्ये ओढला जात असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

आगामी आयपीएल हंगामात या अवैध सट्टा बाजारावर पोलिसांकडून कठोर कारवाई होणार का? याकडे आता जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

### फंटरांवर धाडी, मुख्य सूत्रधार मात्र सुरक्षित?

जिल्ह्यात सट्टेबाजीविरोधात कारवाई होत असल्याचे अधूनमधून दिसून येते. मात्र या कारवायांमध्ये बहुतांश वेळा स्थानिक "फंटर" किंवा लहान एजंटच पोलिसांच्या जाळ्यात सापडतात, अशी चर्चा आहे. सट्टा रॅकेटचे मुख्य सूत्रधार आणि मोठे बुकी मात्र बाहेर जिल्ह्यातून संपूर्ण जाळे चालवत असल्याने ते कारवाईपासून दूर राहत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. फक्त देखाव्यासाठी फंटरांवर कारवाई करून मुख्य बुकींना अभय दिले जाते का, असा सवालही आता उपस्थित केला जात आहे. त्यामुळे सट्टा बाजाराच्या मूळ सूत्रधारांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# वेचक



## जागतिक महिला दिन व आशा दिवसानिमित्त बाभुळगावात महिला शक्तीचा गौरव

बाभुळगाव - सार्वजनिक आरोग्य विभाग व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय बाभुळगाव यांच्या वतीने जागतिक महिला दिन व आशा दिवसानिमित्त महिला शक्तीचा गुणगौरव व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम कमळजापुर (रानी अमरावती) येथील भवानी माता मंदिराच्या सांस्कृतिक सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी (महसूल) पूनम अहिरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी मीरा पगारे, गटविकास अधिकारी उज्वला ढोले, पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. रमा बाजोरिया, मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोठे, तालुका कृषी अधिकारी ऋतिका डेरे, वनपरिक्षेत्र अधिकारी कुशल अंबाडे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कृष्णदास बानोत, डॉ. मधुकर मडावी, डॉ. संजय मडावी व डॉ. साईनाथ भोसीकर उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील विविध विभागांमध्ये कार्यरत महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आरोग्य सेवेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आशा कार्यकर्त्यांचाही विशेष गौरव करण्यात आला. आशा दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, डिश डेकोरेशन, गायन, नृत्य आणि नाटिका यांसारखे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना उपजिल्हाधिकारी पूनम अहिरे यांनी महिला सशक्तीकरणाबाबत प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. तर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी गावपातळीवर निस्वार्थपणे सेवा देणाऱ्या आशा कार्यकर्त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. सुषमा पांडे, डॉ. मारुती बोंबले, डॉ. अर्पित भगत, डॉ. गोपाल गायकवाड, डॉ. शुभम राठोड, डॉ. पद्मजा वटे तसेच तालुका आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद ५८६ रुग्णांची तपासणी, १६७ शस्त्रक्रिया

दिग्रस - ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ५८६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १६७ रुग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, तर ४३१ रुग्णांना औषधोपचार व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी बहुउद्देशीय संस्था दिग्रस आणि ग्रामपंचायत मांडवा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, मांडवा (ता. दिग्रस, जि. यवतमाळ) येथे हे शिबिर पार पडले. शिबिरात मेडिसिन, नेत्ररोग, सर्जरी, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा व मुखरोग या विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, शरीरावरील गाठींच्या शस्त्रक्रिया तसेच विविध गंभीर आजारांची तपासणी करून रुग्णांना योग्य उपचार देण्यात आले. शिबिराचे उद्घाटन शिवसेना तालुका प्रमुख उत्तम ठवकर व राहुल शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य सुधीर देशमुख, मिलिंद मानकर, अशोक गादेवार, बंडू गजभारे, संजय रुडे, दिनेश भानावत, अमोल गावंडे, यादव गावंडे व यादव पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वाशिम जिल्हा निरीक्षकपदी शरद मैंद यांची नियुक्ती

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - मतदारसंघातील राजकारण व समाजकारणात सक्रिय भूमिका बजावत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांची वाशिम जिल्हा निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या निर्देशानुसार प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी नुकतेच नियुक्तीपत्र देऊन ही घोषणा केली.

शरद मैंद यांनी मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांनी पक्षाच्या वतीने पुसद विधानसभा मतदारसंघातून निवडणूकही लढविली होती. तेव्हापासून ते पक्षात सक्रियपणे काम करत असून सध्या ते प्रदेश सरचिटणीस या महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. पक्ष संघटनात्मक कामकाजात त्यांचा दीर्घ अनुभव असून ते पक्षाचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात.



पक्ष संघटना अधिक सक्षम, शिस्तबद्ध आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर वाशिम जिल्हा निरीक्षक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या पदावरून त्यांना जिल्ह्यातील तालुका, शहर, ग्रामीण प्रभाग तसेच बूथ पातळीवरील पक्ष संघटनेचा आढावा घ्यावा लागणार आहे. यासोबतच विविध फ्रंटल संघटना व सेलमधील पदनियुक्त्यांची पाहणी, कार्यकर्त्यांची सक्रियता आणि बूथ समित्यांचे कामकाज याचा नियमित आढावा घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावर राहणार आहे. तसेच पक्षातील शिस्त व एकसंघता टिकवून ठेवणे, गटबाजी अथवा पक्षविरोधी वक्तव्य आढळल्यास त्यावर तात्काळ हस्तक्षेप करणे आणि त्याबाबत प्रदेश कार्यालयास अहवाल सादर करणे ही जबाबदारी त्यांना पार पाडावी लागणार आहे. स्थानिक प्रश्न, जनभावना व राजकीय परिस्थितीचा निष्पक्ष अहवाल सादर करणे, पक्षाच्या कार्यक्रम व आंदोलनांचा आढावा घेणे तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक रणनिती सुचविणे यांसारखी महत्त्वाची कामेही त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत.

दरम्यान, या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना शरद मैंद म्हणाले की, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी माझ्यावर पुन्हा विश्वास दाखवत ही जबाबदारी दिली आहे. या पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि पक्षाची विचारसरणी समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी करणार असून वाशिम जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या निवडीबद्दल त्यांनी शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री जयंत पाटील व आमदार रोहित पवार यांचे आभार मानले.

# आर्थिक धनसंपत्ती पेक्षा धम्माची संपत्ती मिळवणे उत्तम : भंते करूनानंद महाथेरो!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - पुसदपासून जवळच असलेल्या बोरीखुर्द येथील बुद्ध विहारातील प्रंगणामध्ये वंदनी भिक्खू संघाची जाहीर धम्मदेसना आयोजक करण्यात आली होती. यावेळी व्यक्तिने कितीही धन संपत्ती कमविली तरीपरंतु त्यांचे धम्मा प्रमाणे आचरण नसेल, शीलाचे पालन व्यक्ती करीत नसेल तर कितीही संपत्ती मिळवली तरी ती व्यर्थ आहे. भौगोलिक सुख तर मिळू शकते परंतु मानसिक समाधान कदापी मिळू शकत नाही. असे प्रतिपादन भंते करूनानंद महाथेरो यांनी यावेळी आपल्या धम्मदेसने मध्ये केले. त्यानंतर भिक्खू एन.धम्मानंद थेरो,भिक्खू धम्मबोधि थेरो यांनी देखील बुद्धधम्म आचरणबाबत आपले विचार मांडले. घरातील ज्येष्ठांची वागणूक चांगली असेल तर मुलं सुद्धा चागलीच निघतात.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून धम्मसेवक महास्थविर मूळावा, प्रमुख मार्गदर्शक भिक्खू करुणानंद महाथेरो छत्रपती संभाजी नगर, प्रमुख उपस्थिती भिक्खू धम्मबोधी छत्रपती संभाजी नगर, भिक्खू एन धम्मानंद थेरो छत्रपती संभाजी नगर हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून आर्याजी धम्मदीना, आर्याजी धर्मसेविका, भदंत आनंदबोधी, भदंत कमलधम्मो, भिक्खू धम्मरत्न,भंते कश्यप, भिक्खुनी कुशावती, भिक्खूनी विश्वमित्रा, आर्याची शामावती यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम या सर्वांचे हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भंते करुणांनंद यांनी सर्वांना त्रिशरण पंचशील दिले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फुले शाहू आंबेडकर फाउंडेशन पुसद, विशाखा महिला मंडळ बोरी खुर्द, नवयुवक व सम्राट अशोक मंडळ बोरी खुर्द, रमाई महिला मंडळ गोविंद नगर काकडदाती, सुजाता महिला मंडळ इटावा पुसद, पंचशील महिला मंडळ बोरगडी, परिवर्तन बहुउद्देशीय महिला मंडळ शिवाजी वार्ड, रमाई महिला मंडळ हुडी खुर्द, रमाबाई महिला मंडळ निंबी यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विशाल पाटील यांनी मानले.

# साखरा खु. येथे 'महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात; 2017 लाभार्थ्यांना सेवांचा लाभ

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - प्रशासनाच्या सेवा थेट जनतेच्या दारी पोहोचाव्यात या उद्देशाने साखरा खु. येथील बाबासाहेब देशमुख विद्यालयात आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात पार पडले. या शिबिराला उपजिल्हाधिकारी (महसूल) पुनम अहिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नागरिकांच्या विविध समस्यांचा जागेवरच निपटारा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साखरा खु.च्या सरपंच नंदाताई गाऊत्रे होत्या. यावेळी तहसीलदार विजय साळवे, गटविकास अधिकारी वंदना नानोटे, तालुका कृषी अधिकारी श्रीमती बोबडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. साईनाथ भोसीकर, प्रशांत कराळे, उपअधीक्षक भुमी अभिलेख निरंजन पवार तसेच निवासी नायब तहसीलदार व नोडल अधिकारी प्रफुल्ल घोडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी रविंद्र शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी राजू मानकर यांनी केले. शिबिरात महसूल, आरोग्य, कृषी आदी विभागांकडून विविध दाखले, फेरफार, योजनांबाबत मार्गदर्शन, आरोग्य तपासणी, विद्यार्थी प्रश्नमंजुषा तसेच प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात आले.एकूण २० विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून २०३७ लाभार्थ्यांना २३९२ विविध प्रमाणपत्रे व सेवा वितरित करण्यात आल्या. या शिबिरामुळे अनेक प्रलंबित कामे मार्गी लागल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली असून प्रशासनाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# घाटंजी येथे आज शेतकरी संवाद मेळावा

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - भारतीय जनता पार्टी घाटंजी तालुक्याच्या वतीने आज दि. १५ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता घाटंजी नगरपरिषदेच्या सांस्कृतिक भवन येथे शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच विधिमंडळ अधिवेशनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर स्वरूपात ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी व योजनेची सविस्तर माहिती देण्यासाठी या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आर्णी विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रा. राजू तोडसाम राहणार आहेत. तसेच यवतमाळचे माजी आमदार अण्णासाहेब देशमुख पारवेकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती देवानंद पवार, भाजपचे जिल्हा महामंत्री राजुभाऊ पडगिलवार, जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष पंजाब जाधव यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी तसेच भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष विजयसिंह बैस यांनी केले आहे.

# मायनरला पांदन रस्ता घोषित करण्यात यावा गोविंदराव देशमुख यांच्यी मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - सध्या राज्यात महसुल खात्यामार्फत बळीराजा मुख्यमंत्री पांदन रस्ते विकास कार्यक्रम सुरू आहे पुर्वीच्या गावनकाशावरील बहुतांश पांदन रस्ते वाहतूक नसल्यामुळे कालबाह्य झाले किवां आजुबाजुच्या लोकांनी त्यावर अतिक्रमण केले आहे ज्याठिकाणी सीचंन विभागाचे कालवे व मायनर झाले याचाच ऊपयोग शेतकरी वहीवाटीसाठी करतांना दिसतात अर्थात सगळीकडेच हे कालवे किवां मायनर आहेत असेही नाही पंरतु ज्या ज्या गावात शिवारात हे मायनर व कालवे आहेत त्या त्या ठिकाणी मागील अनेक वर्षांपासून वहीवाटीसाठी याच कालव्याचा व मायनरचा उपयोग शेतकरी करीत आहेत व जुने अतीक्रमीत झालेले पादंन रस्ते आज मोकळे करणे शासकिय यंत्रनेला डोकेदुखी ठरत आहे पर्यायी रस्ते मीळाल्याने आता या पांदन रस्ताने कोणीही



जानारही नाही त्यामुळे खुले करुण ऊपयोग होईल असे वाटत नाही या करिता अशा कालव्याच्या व मायनरच्या रस्त्याचां विशेष सर्वे करुन या रस्त्याचे खडीकरण अथवा डांबरीकरण करण्यात यावे अशा प्रकारची कामे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात खुप मोठ्या प्रमाणात झाली आहेत त्या अनुषंगाने या प्रकारची कामे शक्य त्या ठिकाणी झाल्यास हजारो शेतकऱ्यांना फायदा होईल तरी त्या त्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधी व शेतकरी बांधवानी महसुल प्रशासनास ही बाब निदर्शनास आणून देणे महत्त्वाचे आहे.

# महागाव येथे नाफेड अंतर्गत हमीभावाने हरभरा व तूर खरेदीचा शुभारंभ



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - येथील खरेदी-विक्री संघाच्या केंद्रावर नाफेड अंतर्गत केंद्र सरकारच्या आधारभूत किंमत योजनेनुसार हरभरा व तूर खरेदीला अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. खुल्या बाजारात कमी दरामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना या खरेदीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार हरभरा प्रति क्विंटल ५८७५ रुपये तर तूर प्रति क्विंटल ८००० रुपये या दराने शेतकऱ्यांकडून खरेदी केली जाणार आहे. या खरेदीचा शुभारंभ शुक्रवार दि. १३ मार्च २०२६ रोजी सहकार विभागाचे कर्मचारी जे. बी. साळवे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष विशाल पवार, संचालक हनवंतराव देशमुख, तातेराव सरदार, रावसाहेब पाटील नरवाडे, बाजार समितीचे सचिव अभिजित गुगळे तसेच महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम हरभरा विक्रीसाठी आणणारे शेतकरी अमोल बाबाराव शिरगिरे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. खरेदी केंद्रावर केवळ ऑनलाइन नोंदणी पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांनाच एसएमएसद्वारे बोलावून मालाची खरेदी केली जात आहे. खरेदी केंद्रावर माल आणताना शेतकऱ्यांनी हरभरा व तूर स्वच्छ करून आणि व्यवस्थित वाळवून आणावा. तसेच सातबारा उतारा, आधार कार्ड व बँक पासबुकची झेरॉक्स सोबत ठेवावी. ज्यांना एसएमएसद्वारे संदेश प्राप्त झाला आहे, त्यांनीच ठरलेल्या तारखेला माल विक्रीसाठी आणावा, असे आवाहन खरेदी-विक्री संघाच्या वतीने करण्यात आले आहे.यावेळी व्यवस्थापक संतोष भिसे, लिपिक संतोष देशमुख, प्रमोद जाधव, मापारी भिमराव साळवे यांच्यासह शेतकरी व हमाल बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"शेतकऱ्यांनी कोणत्याही व्यापाऱ्याला कमी दरात माल न विकता, नाफेडच्या केंद्रावर नोंदणी करून हमीभावाचा लाभ घ्यावा. आम्ही खरेदी प्रक्रिया जलद व पारदर्शक ठेवण्यासाठी कटिबद्ध आहोत." **– संतोष भिसे, (व्यवस्थापक, खरेदी-विक्री संघ, महागाव)**

### तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

खुल्या बाजारात हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेचा लाभ घ्यावा. हरभरा नोंदणीची अंतिम मुदत ३० मार्च तर तूर नोंदणीची अंतिम मुदत २४ मार्च असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विहित कालावधीत खरेदी-विक्री संघाच्या कार्यालयात नोंदणी करावी. **– विशाल पवार, (अध्यक्ष, खरेदी-विक्री संघ महागाव)**

# पोलीस भरती परीक्षेसाठी तीन केंद्रांची घोषणा, उमेदवारांना प्रशासनाच्या सूचना

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्हा पोलीस भरती 2024-2025 अंतर्गत पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी लेखी परीक्षा रविवारी दि. 15 मार्च 2026 रोजी यवतमाळ शहरातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस प्रशासनाने उमेदवारांना आवश्यक सूचना जारी केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार ही परीक्षा यवतमाळ शहरातील अमोलकचंद महाविद्यालय, अग्रो हिंदी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच जवरलाल दर्डा हायस्कूल, गोधणी रोड या केंद्रांवर होणार आहे. परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर किमान दोन तास आधी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारांनी परीक्षा केंद्रात प्रवेश करताना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र सोबत बाळगणे अनिवार्य असून प्रवेशपत्रावरील फोटोच्या दोन प्रती देखील सोबत असणे आवश्यक आहे. परीक्षेसाठी आवश्यक असलेले पेन व पॅड प्रशासनाकडून उपलब्ध करून दिले जाणार असल्याने उमेदवारांनी स्वतःकडील कोणतेही साहित्य आणू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, डिजिटल डायरी, मायक्रोफोन, कॅमेरा, संगणक, डिजिटल नोटपॅड, नोट्स पुस्तके, इयरफोन, हियरिंग एड, स्मार्ट वॉच, स्मार्ट आय-ग्लासेस यांसारखी इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान कॉपी अथवा गैरप्रकार करताना आढळल्यास संबंधित उमेदवारांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.या सूचनांचे सर्व उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांनी केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### एकल मातांचा सत्कार

**लेहेगाव**-जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा विचोरी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संगिता हिरडे, ग्रामपंचायत सदस्य होत्या, तसेच माजी सरपंच राजकन्या बागडे उपस्थित होत्या.अंगणवाडी सेविका रेखाताई कळसकर, मदतनीस सुजाता शेंडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.यामध्ये इयत्ता पहिली मध्ये दाखल पात्र विद्यार्थ्यांच्या मातांना आणि विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले. तसेच विद्यार्थी आणि मातांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच दाखलपात्र मुलांना बक्षीस देण्यात आले. उपस्थित सर्व महिलांना शाळेचे मुख्याध्यापक नितिन काळे यांनी मार्गदर्शन केले.एकल माता असणाऱ्या महिलां पालकांचा छोटे खाणी सत्कार घेण्यात आला. महिलांची रांगोळी स्पर्धा,भजन स्पर्धा त्यानंतर महिलांची संगीत खुर्ची हा खेळ घेण्यात आला. संगीत खुर्ची मध्ये जिंकलेल्या महिलांना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनावलीचे पुस्तक भेट देण्यात आले.कार्यक्रमाकरिता महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका योगिता भुसारी यांनी केले.



### मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**अमरावती -** लावण्य बहुउद्देशीय संस्था, महाजनपुरा द्वारे १४ मार्च रविवार रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती नगरसवेक योगेश रघुनाथ विजयकर, संस्था अध्यक्ष पुजा अमोल विजयकर, उपाध्यक्ष अमोल केशवराव विजयकर,कोषाध्यक्ष शुभम वासुदेव कामनापुरे , सदस्य राहुल वासुदेव कामनापुरे आदि उपस्थित राहणार आहे.महात्मा ज्योतिबा फुले, आयुष्मान भारत ४ प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिर १४ मार्च रोजी महादेव मंदिर महाजनपुरा अमरावती येथे ११ ते १ या वेळेत आहेत. या शिबीरामध्ये कॅन्सर स्पेशालिस्ट डॉ. आदित्य भागवत तपासणी करणार आहेत.तसेच ब्लड प्रेशर तपासणी, ब्लड शुगर तपासणी, उंची -वजन तपासणी, सर्दी खोकल्या ताप आदिंच्या तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत. मोफत सल्ल्याकरिता प्रोटॉन क्रिटिकल केयर सेंटर, कल्याण नगर, सबनीस प्लॉट, अमरावती येथेही रूग्ण संपर्क करू शकतात अशी माहिती मनोज विजयकर यांनी दिली आहे.

### २४ मार्चला रोजगार मेळावा

**अमरावती-** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींना नामांकित खासगी कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २४ मार्च २०२६ रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' (टीसीएस) ही नामांकित कंपनी या मेळाव्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांची निवड करणार आहे. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी दिलेल्या क्यूआर कोड स्कॅन करून आपली ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीनंतर प्राप्त होणाऱ्या 'Registration Slip' ची प्रिंट सोबत ठेवावी. मेळाव्याच्या दिवशी, म्हणजेच २४ मार्च रोजी सकाळी, स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट फोटो आणि आवश्यक मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे.नोंदणीबाबत काही तांत्रिक अडचण असल्यास उमेदवारांनी कार्यालयाच्या ०७२१-२५६६०६६ किंवा ८९८३२८८९८२ या क्रमांकावर अथवा amravatirojgar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीमती प्रांजली यो. बारस्कर यांनी केले आहे.

### ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या 'खुल्या धोरणा'ला स्थगिती

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने ऑटोरिक्षा आणि टॅक्सी परवान्यांबाबत सुरू असलेल्या खुल्या धोरणाला' तूर्तास स्थगिती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, नवीन परवान्यांसाठी दिले जाणारे 'इरादापत्र' देण्याचे काम थांबविण्यात आले असल्याची माहिती अमरावतीच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली आहे. नुकत्याच राज्याच्या परिवहन मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत या धोरणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी आणि विनंती अर्जांचा विचार करून हे निर्देश देण्यात आले आहेत.शासनाने १७ जुलै २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे जुन्या निर्णयांमध्ये बदल करून नवीन टॅक्सी आणि ऑटोरिक्षा परवाने जारी करण्यावरील निबंध हटवले होते, ज्यामुळे परवाने मिळणे सुलभ झाले होते. मात्र, या खुल्या धोरणामुळे रिक्षा व टॅक्सी व्यवसायावर परिणाम होत असल्याचे सांगत राज्यातील विविध संघटनांनी हे धोरण बंद करण्याची मागणी परिवहन आयुक्त कार्यालयाकडे लावून धरली होती. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार, आता नवीन परवाने देण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.

# महानगरपालिकेत फिशरीज हब प्रकल्पासंदर्भात आढावा बैठक

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली महानगर पालिकेत फिशरीज हब प्रकल्पा संदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत प्रकल्पाची सद्यस्थिती, भविष्यातील कार्ययोजना, प्रकल्पाची व्यवहार्यता तसेच विविध प्रशासकीय बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.बैठकीदरम्यान फिशरीज हब प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात मासेमार संघटना, संस्था तसेच संबंधित व्यावसायिक यांच्या सहभागातून प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रकल्पाचे संचालन, व्यवस्थापन व दीर्घकालीन उपयोगिता लक्षात घेता मासेमार संघटना, सहकारी संस्था तसेच व्यवसायिकांकडून प्रस्ताव मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित घटकांचा सहभाग वाढवून प्रकल्पाला अधिक चालना देण्याबाबत आयुक्तांनी निर्देश दिले. सर्व पाचही जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त मत्स्य विभागांना मत्स्य उत्पादनाबाबत तसेच कार्यक्षेत्रातील तलाव बाबत माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.



फिशरीज हब प्रकल्पाशी संबंधित जिल्हानिहाय उत्पादन क्षमता, उपलब्ध संसाधने तसेच प्रकल्पाची उपयुक्तता याचा देखील बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. फिशरीज हब प्रकल्पाच्या अंतर्गत विविध प्रक्रिया, साठवण, प्रक्रिया केंद्र, बाजार व्यवस्थापन इत्यादींसाठी दैनंदिन वापराकरिता सुमारे १ लाख ५० हजार लिटर प्रतिदिन पाण्याची आवश्यकता भासणार असल्याने पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने आवश्यक त्या विभागांशी समन्वय साधून पाणी नियोजनाचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सद्यस्थितीत बाजार परिसरात कार्यरत असलेल्या मासेमार संघटना, संस्था तसेच मच्छीमार यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यावरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. मासळी विक्री, साठवण आणि वाहतूक यासंदर्भातील व्यवस्था अधिक सुस्थितीत करण्यासाठी नियोजना त्मक उपाययोजना राबविण्या बाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान पशु शल्य चिकीत्सक तथा फिशरीज हब चे नोडल अधिकारी डॉ.सचिन बोंद्रे यांनी फिशरीज हब प्रकल्पाविषयी मार्गदर्शनपर प्रेझेंटेशन सादर केले. या सादरीकरणांमध्ये प्रकल्पाची कार्यपद्धती, संभाव्य सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच व्यवस्थापन पद्धती याविषयी माहिती देण्यात आली.प्रकल्पाची व्यवहार्यता तसेच आर्थिक पडताळणी करण्यासाठी महाराष्ट्र मत्स्य विकास महामंडळ (एमएफ डीसी) व महानगरपालिका उपायुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सविस्तर अहवाल तयार करण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आला.

हा संयुक्त अहवाल तयार करून पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.उपायुक्त कार्यालयामार्फत प्राप्त पत्रानुसार विविध प्रशासकीय व तांत्रिक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून आवश्यक निर्णय घेण्यात आले. प्रकल्पाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून कार्यवाही करण्याबाबतही निर्देश देण्यात आले.उपस्थित अधिकाऱ्यांनी प्रकल्पाशी संबंधित विविध मुद्द्यांवर आपली मते मांडत पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक सूचना दिल्या.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, पशुशल्य चिकीत्सक तथा फिशरीज हब चे नोडल अधिकारी डॉ.सचिन बोंद्रे, शहर अभियंता रविंद्र पवार, सचिन बोंडे अधिष्ठाता मत्स्य विज्ञान, विद्यापिठ, नागपूर, डॉ.सागर जोशी सहयोगी प्रा., मविम, नागपूर, सुनिल जांभुळे प्रादेशिक उपायुक्त, मत्स्य व्यवसाय, अमरावती, दि.रा. खोपे सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय अकोला, प्रियंका झोड सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय वाशिम, कार्यशाळा उपअभियंता स्वप्निल जसवंते, महाराष्ट्र मत्स्य विकास महामंडळ (एमएफडीसी), मत्स्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी, पाचही जिल्ह्याचे मासेमारी सहकारी संघटना उपस्थित होते.

### कौशल्य विकास केंद्राचा मेळावा

**अमरावती-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे मंगळवार १७ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर डेपो रोडयेथे हा मेळावा होणार आहे.यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्या स जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ०७२१-२५६६०६६ किंवा amravatirojgar@gmail.com या मेलवर संपर्क साधावा.


# सावंगा (विठोबा) येथे गुढीपाडव्याला खोळ चढविणार

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

महाराष्ट्रातील विदर्भात प्रसिद्ध आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यात चांदूर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने भव्य गुढीपाडवा–रामनवमी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा महोत्सव १८ते २७ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार असून लाखो भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

यात्रेचे मुख्य आकर्षण असलेला महाराजांच्या झेंड्यांचा चित्तथरारक व नेत्रदीपक सोहळा गुढीपाडव्याच्या दिवशी १९ मार्च (गुरुवार) रोजी दुपारी सुमारे ४ वाजता पार पडणार आहे. अखंड कापूर ज्योती, बासन (टाळ)ढोलकी (मृदंग)चा गजर,हजारोच्या संख्येने नगरीत आलेल्या अवधूत भजन मंडळाच्या मांडीचे सुमधूर गायनात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडतो. शेकडो क्विंटल कापूर विक्रीचा अंदाज असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे.संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर यांच्या शुभहस्ते महाराजांच्या बोहलीचे विधीवत पूजन करून दोन्ही झेंड्यांना नवीन खोळ (कापड) चढविण्यात येणार आहे. झेंड्यांना पायाचा स्पर्श होऊ नये म्हणून



**गुढीपाडवा–रामनवमी यात्रा महोत्सव १८ ते २७ मार्च दरम्यान**

दोरांच्या सहाय्याने झेंड्यांची जुनी खोळ काढून नविन खोळ चढवली जाते. हा सोहळा विश्वस्त मंडळ व लाखो भाविकांच्या साक्षीने पार पडणार आहे. अवधूत संप्रदाया तील भाविकांनी गावोगावी स्वयंप्रेरणेने यात्रेचे बॅनर लावून वातावरण निर्मिती केली आहे.


महोत्सवाची सुरुवात १८ मार्च (बुधवार) रोजी अमावस्या निमित्त सायंकाळी ५ वाजता चंदन-उटी व रमणा कार्यक्रमाने होणार आहे. त्याच दिवशी सकाळी ७ ते १० या वेळेत मंदिर व ग्राम परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.भजनासाठी येणाऱ्या अवधूत भजन मंडळांसाठी व भाविकांसाठी (प्रसादालयाचे मागील शेतात) संस्थानचे वतीने भव्य मंडपात बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दी नियंत्रणासाठी स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन सुद्धा सतर्क आणि दक्ष राहणार आहे.

२० ते २७ मार्च २०२६ या कालावधीत दररोज अवधूत नामप्रचारक महाराजांच्या गाथेतील ओव्यांवर आधारित प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत. २६ मार्च (गुरुवार) रोजी रामनवमी निमित्त चंदन-उटी व रमणा, तर २७ मार्च रोजी चैत्र मांडी वाढवा,बाहेर गावातील सहभागी अवधूत भजन मंडळासह रमणा पालखी व ढालीचा सोहळा व निमंत्रित मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभ आणि भाविकांसाठी भव्य महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. यात्रा महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री विठोबा संस्थान विश्वस्त मंडळाच्या तर्फे करण्यात आले आहे.

# शहरातील रस्त्यांची ऐसीतैसी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

विविध विकासकामासाठी मिळालेल्या निधीतून सध्या शहरातील चांदूर रेल्वे ते तिवसा मार्गाच्या सिमेंट रोड चे बांधकाम अत्यंत वेगवान पद्धतीने सुरु आहे.या परिस्थितीमुळे वाहन चालवणे तर सोडाच.. रस्त्यावर साधे चालणे देखील देखील जिकरीचे आणि धोक्याचे झाले आहे.तेव्हा ह्या समस्येवर कोण पुढाकार घेणार?ह्याबाबत चांदूरकर प्रशासनाला जाब विचारत आहे. ह्या पैकी नागरिकांवर ओढवलेल्या ह्या समस्येवर दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा मोठ्या अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे.यासंदर्भात भाजपचे गटनेते निलेश भालेराव यांच्या नैतृत्वात भाजपच्या नगरसेवकांनी यांनी नुकतेच ठाणेदार पोलीस स्टेशन



**अपघात झाल्यास दोषीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

यांना निवेदन दिले.

सिमेंट रोड चे बांधकाम लवकर व्हावे व जनतेला ह्या मार्गावरून होणारा त्रास वाचावा ह्या साठी बांधकाम कार्य जरी प्रगतीपथावर असले तरी मध्यरात्रीच्या वेळी प्लांट वरून सिमेंट व गिट्टी मिक्स काँकरीट मालाची वाहतूक मालवाहू ट्रकमधून केली जाते.मात्र ट्रक च्या वेगवान वाहतुकीमुळे जास्तीचा काँकरीट माल संपूर्ण अमरावती बायपास सिमेंट रस्त्यावरून ते कुऱ्हा रोड वर बांधकाम स्थळा पर्यंत सतत सांडत आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर सर्वत्र गिट्टी सिमेंट विखुरलेल्या अवस्थेत रात्री (६ मार्च) रोजी पासून आहे.या नंतर काल मध्यरात्री (दिनांक१३ मार्च) रोजी सुध्दा असेच एक चित्र पोलीस स्टेशन च्या समोर मुख्य रस्त्यावर अक्षरशः ह्या काँक्रेट मालाचा खच होता.या परिस्थितीमुळे वाहन चालवणे तर सोडाच.. रस्त्यावर साधे चालणे देखील देखील जिकरीचे आणि धोक्याचे झाले आहे.तेव्हा ह्या समस्येवर कोण पुढाकार घेणार?ह्याबाबत चांदूरकर प्रशासनाला जाब विचारत आहे. ह्या पैकी नागरिकांवर ओढवलेल्या ह्या समस्येवर दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा मोठ्या अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे.यासंदर्भात भाजपचे गटनेते तथा नगरसेवक पप्पू उर्फ निलेश भालेराव यांच्या नैतृत्वात भाजप च्या नगरसेवकांनी यांनी नुकतेच ठाणेदार पोलीस स्टेशन यांना निवेदन सुद्धा दिले आहे त्यात अपघात झाल्यात दोषींवर मनुषवधाचा गुन्हा दाखल करण्याची सुद्धा मागणी केली आहे.

### गुढीपाडवा व श्रीराम-भरत भेट महोत्सवाला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

दर वर्षीप्रमाणे श्री काळा मारोती महाराज संस्थान शिंगणापूर येथे ११ ते २० मार्चपर्यंत गुढीपाडवा व श्रीराम-भरत भेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हे या आयोजनाचे ३६ वे वर्ष आहे.

यामध्ये आळंदी येथील ह.भ.प. श्री सोपान काका काळबांडे यांची श्रीराम कथा आयोजित केली असून कथा ११ ते १९ मार्चपर्यंत सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत होईल. तसेच १९मार्च रोजी दुपारी ३ ते ५.०० वाजेपर्यंत ढोल दिंड्या सह नगर प्रदक्षिणा आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहात श्री ह.भ.प. शुभम महाराज काळे, ज्ञानेश्वर महाराज सखाराम पुरकर व मारोती महाराज बावस्कर हे मृदंगावर साथ देतील व गायनाचार्य म्हणून श्री ह.भ.प. विष्णु महाराज रावणकार, हरिओम महाराज वाटोळे, अक्षय महाराज महल्ले व ज्ञानेश्वर महाराज गायनाची साथ देतील व कृष्ण महाराज वृंदावन धाम यांची साज सज्जा राहील. या सप्ताहाचे आयोजन प्रमुख ह.भ.प श्री भानुदास महाराज शेळके व पाटील महाराज खालखोनीकर आहेत. या सप्ताहात दररोज सायंकाळी ७ ते ९.०० चे दरम्यान हरी कीर्तन होईल. यामध्ये १५मार्च रोजी सोपान महाराज काळबांडे, ज्ञानेश्वर महाराज मिरगे,रोजी ज्ञानेश्वर महाराज वाघ, १८मार्च रोजी विष्णु महाराज रावण कार, १९मार्च रोजी हरिओम महाराज कोल्हे यांची हरी किर्तने होतील. २०मार्च रोजी ह.भ.प.श्री सारंग चैत्यनजी महाराज यांचे सकाळी ९ ते ११.०० वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महा प्रसाद होऊन सप्ताहाचे समापन होईल. भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन दर्शनाचा व सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा अशी विनंती यांनी केले आहे.

# जुळया शहरासाठी मुबलक सिलेंडर साठा उपलब्ध

## बुकिंग व्यवस्था कोलमडल्याने शहरातील गॅस एजन्सीबाहेर लांब रांगा, अफवांवर विश्वास ठेवू नये - सुदर्शन शहारे

**अचलपूर/वार्ताहर**

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील काही घरगुती गॅस बुकिंगची ऑनलाईन यंत्रणा कोलमडून पडली आहे.पहिला गॅस सिलेंडर घेऊन ३० दिवस झाल्यानंतरही बुकिंग होत नसल्याने ग्राहक हवालदिल झाले आहे.यामुळे सोशल मीडियावर घरगुती गॅस सिलेंडर चा तुटवडा असल्याची पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.या अफवेने अक्षरशः थैमान घातले असून सकाळी सात वाजल्यापासून परतवाडा शहरातील विविध गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मात्र प्रत्यक्षात जुळ्या शहरातील ३ ही एजन्सी धारकांकडे सिलेंडरचा मुबलक साठा उपलब्ध असल्याची माहिती अचलपूर तहसील कार्यालय पुरवठा विभागाकडून मिळाली आहे.

परतवाड्यातील अंजनगाव रोडवरील आदिशक्ती इंडियन गॅस एजन्सीसमोर काल सकाळपासूनच सिलेंडर मिळविण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. जवळपास २४० गॅस सिलेंडर वितरीत करण्यात आले.पण यादरम्यान रांगेतून पुढे जाण्यावरून काही किरकोळ वाद ही



झाले.अचलपूर तहसील कार्यालयात १३ मार्च रोजी इंडियन,एच पी गॅस एजन्सी संचालकांची आढावा बैठक अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यादरम्यान तिन्ही गॅस एजन्सी कडे मोठ्या प्रमाणात सिलेंडर उपलब्ध आहे.चंद्रा एचपी गॅस एजन्सी तर्फे ऑनलाइन बुकिंग सेवा सुरू आहे.ग्राहकांनी ओटीपी घेऊन सिलेंडर तात्काळ दिले जात आहे. तसेच बुकिंग घरपोच डिलिव्हरी दिली जाते.यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये असे आवाहन ही अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी केले आहे.

यावेळी दररोज जुळ्या शहरात गॅस सिलेंडर वाटपाची संख्या ,उपलब्ध साठा,ऑनलाइन बुकिंग सेवा बंद असल्यास पर्यायी व्यवस्था आदी विषयावर अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी उपस्थितीत गॅस एजन्सी संचालकांशी चर्चा केली.आणि ग्राहकांना कोणतीही असुविधा चा सामना करावा लागू नाते यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.यावेळी पुरवठा निरीक्षक राहुल केदार, आदिशक्ती इंडियन गॅस एजन्सीचे मधुकर रायवार, एच पी गॅस एजन्सी चे संचालक ,व्यवस्थापक उपस्थित होते. यासर्व परिस्थितीवर अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांचेही लक्ष असून दररोज तालुक्यातील स्थितीचा आढावा तहसील पुरवठा विभागाकडून घेत आहे.

# नाटकाला 'प्रतिभा'च लागते..

सर्वांच्या मनावर राज्य करणारे, रंजन असो वा अंजन असो. सर्व स्वर व्यंजन घालून शब्दावली व त्यातून वाक्याची संवाद असो. सर्व कलेचा सागर अन् त्यात वसलेले माणिक, मोती,रमा,रमणी.रस! सोम असो की अमृत असो, लवण असो, श्वेत धवल रंग असो. रत्नाकर म्हणा की दर्या सागर म्हणा.कितीही उपमा घ्या किंवा रूपके खर्च करा. नाटक खरोखर साहित्य क्षेत्रातील महासागर आहे.अनेक कलावंत एकच मंच आपले कला आविष्कार करण्याची पूर्ण संधी नाटकात असते.

लेखान, दिग्दर्शन, अभिनय, संगीत, प्रकाश, रंग, वेष इत्यादी चे व्यवस्थापन झाल्यावरच नाटकाची पूर्तता होते. नृत्य व साहित्य याचा ही विहार नाटकात होतो. त्यामुळे नाटकाचे घटक अभ्यासून त्याचे परीक्षण करणे आणि त्यानुसार निर्वाळा करणे यासाठी प्रतिभाच लागते. अशाच प्रतिभावंत प्रतिभेचा परिचय म्हणजे अमरावती शहरातील वकिलपेशा आणि अभियानाने आचार्य असलेल्या ॲड. डॉ. प्रतिभा उमाकांत तेटू नागपुरे मॅडम यांचा आहे.

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ महाराष्ट्र शासन,मुंबई म्हणजेच सेन्सार बोर्ड चे सदस्यवत प्राप्त झालेल्या प्रतिभा मॅडम यांच्या बद्दल लिहाव तेवढे लिखाण करता येते.डौलदार व्यक्तिमत्व म्हणजे तुटुंब भरलेल्या संथ गंगेसारखे स्वभावी गुण त्यांच्या शांत व परिपक्व प्रतिभेचा दाखला आहे.त्यामुळे त्यांची वृद्ध साहित्यिक कलावंत मानधन समितीवर शासनाचे जिल्ह्याची जबाबदारी दिली आहे.कारण कोणताही कलावंत जगण्यापासून वंचित राहू नये. यासाठी राजाश्रयाची जाणीव करून देऊन तळागाळातील कलावंत निवडून त्यांच्या आर्थिक नियोजनाची सोय त्या करून देतात.

रायबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून त्यांना शिवरायांचे विचार रायतेपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.शिवाय सारंग बहु उद्देशीय संस्थाचे उपाध्यक्ष म्हणून काम बघत आहे.निर्भया वुमेन्स फाउंडेशन चे सचिव म्हणून काम बघताना पीडित महिलांच्या दुःखाच्या वाटेकरी होऊन त्यांना न्याय मिळावा यासाठी शासनाला धारेवर सुद्धा धरतात.यासर्व सामाजिक कामाचा भार वाहताना आपल्या नाट्य व कला क्षेत्राची नाळ मात्र घट्ट बांधून ठेवली आहे. त्यामुळेच प्रतिभेचा उत्तुंग परिचय त्यांच्या अभिनयातून 'अघोर', 'हुंटाश' या मराठी चित्रपटात पाहायला मिळतो.



चित्रपट कलावंत म्हणून त्यांच्या अभिनयात निरागस स्वभाव आणि उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून स्त्री चारित्र्य भिनलेले असते. स्वतंत्र हा लघुपट सुद्धा त्यांच्या अभिनयाचा आरसा आहे. त्यातून भूमिका साकारताना अमरावतीत असे कलावंत असतात हा आश्चर्यकारक दिलासा मिळतो. चित्रपटातील कामात प्रवेश मिळने यासाठी तोडीची मेहनत लागते.कारण अभियानासोबतच चित्रपटातील इतर तंत्र सांभाळणे,यासाठी स्वतःवर काम करणे महत्त्वाचे असते. चित्रपटात चेहरा जास्त बोलका करतो.त्यात कॅमेरा टिपत असलेले हावभाव दर्शकांच्या नजरेत उतरावे लागतात.त्यात सुद्धा प्रतिभावंत असा प्रतिभेचा गुणधर्म सांभाळत प्रतिभा मॅडम निपुण आहेत.

कारण संगीत संशय कल्लोळ,संगीत एकच प्याला, डान्स हाऊस,मी विरुद्ध मराठी,वेटींग फॉर गोदो, आपण सारे घोडेगावकर, व्वा ! वाट्टेल ते प्रेमासाठी, वाडा चिरेबंदी, शिकस्त अशा भारदस्त नाटकांमध्ये अभिनय रंगवून अंधार पाहिलेला माणूस या गाडगे बाबा यांच्या नाटकात सुद्धा प्रतिभावंत कलाकार म्हणून प्रतिभा मॅडम यांचे नाव समोर येते.'वो नब्बे दिन' या हिंदी नाटकातील फुलवा या चारित्र्यला फुलवताना प्रतिभा मॅडमचे अफलातून स्वागत प्रेक्षकांनी केले.त्यामुळे महाराष्ट्रभर आयोजित होणाऱ्या समस्त नाट्यस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून निवड करण्यात येते.त्यात राज्य नाट्यस्पर्धा सांस्कृतिक कार्य मंत्रालय असो,कामगार कल्याण मंडळ महाराष्ट्र शासन असो,महिला कामगार मंडळ, बाल नाट्य कामगार मंडळ, महापारेषण विभागीय नाट्य स्पर्धा असोत.

त्यामुळे महाराष्ट्र भर अंबा नगरीची ओळख प्रतिभा मॅडमचे योगदानातून झाली आहे. आंबा फेस्टिवल चे नाट्य परीक्षण सुद्धा त्यांच्याच मार्फत दरवर्षी करण्यात येण्यासारखो आहे.त्यांचे लेखनाचे अंग मर्यादा व स्व-अनुभूती एवढ्या एकांकीने दिसून येते.असा भरगच्च परिचय असताना 'अहंकाराचा वारा न लागो' अशी वागणूक ठेऊन आपले आयुष्य कला उपासक म्हणून जगत असताना त्यांचा जीवन नाट्य गौरव पुरस्कार क्रीडा व युवा मंत्रालयाने प्रदान करून सन्मान केला. हे अमरावतीकर यांचे भाग्य प्रतिभावंत कलाकाराच्या रूपाने सांगता येते. महाराष्ट्र राज्यनाट्यस्पर्धेच्या अंतिम फेरीतसाठी परीक्षक म्हणून सिंधुदुर्ग निवड करण्यात आली होती.ज्यातून अभिनय किंवा सिनेमा क्षेत्रात करिअर करणाऱ्या युवा पिढीच्या भविष्याची निवड; त्यांच्या मार्फत करण्याची ही संधी त्यांच्यातील प्रतिभेने दिली असे म्हणायला हरकत नाही.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ वतीने सुरू असलेल्या नाट्य महोत्सवाच्या परीक्षक म्हणून काम बघताना, त्यांच्या सोबत समीक्षक नात्याने झालेला, त्यांचा परिचय नक्कीच उजागर करावा वाटतो. कारण मराठा घराण्यातील घराणे शाहीची चौकट मोडून आपल्या प्रतिभेला प्रतिभावंत करण्यात, प्रतिभामॅडमने पुढाकार घेतला.प्रसिद्धीची कुठलीही कुबडी त्यांनी घेतली नाही.मात्र रंगकर्मीचे कर्म ढंग प्रकाश झोतात यावे,हा हट्टहास केला जावा ! हे ओळखण्यासाठी पण 'प्रतिभा'च लागते.

**डॉ. प्रवीणकुमार राऊत.**
एकदरा,ता.वरूड, जि. अमरावती.
मो.७७९८६४५५६५

**महात्मा बसवेश्वर पुतळा अनावरण व लोकार्पण समारंभाच्या निमित्ताने**

# सामाजिक परिवर्तनाचे जनक महात्मा बसवेश्वर

१२ व्या शतकातील सामाजिक बदलाचे अवलोकन केले असता समाज व्यवस्थेमध्ये अत्यंत क्लिष्टता होती. रूढी, परंपरा, कर्मकांड इत्यादींनी हैदोस घातला होता. समाज व्यवस्थेचा पगडा होता. एवढेच नव्हे तर वर्णभेद, स्त्री पुरुष असमानता, वेदशास्त्र, होमहवन, मूर्तीपूजा, पशु बळी होत होते. जातिभेद तर उफाळून होता. अशा सामाजिक परिस्थिती विरोधात जाण्याचे धैर्य तत्कालीन समाज सुधारक महात्मा बसवेश्वरांनी केले. सामाजिक परिस्थिती विरोधात दंड थोपडण्याचे महान कार्य केले. त्यामुळे अध्यात्मिक, वैचारिक व सामाजिक बदल घडवून आला. समाजा विरोधात जाऊन बंड करण्याचे धाडस करणारे महात्मा बसवेश्वर पहिले क्रांतिकारक होते. त्यामुळे १२ व्या शतकामध्ये सामाजिक समतेचा पहिला उदय झाला. खरे म्हणजे तत्कालीन समाजव्यवस्था मनुवादी प्रवृत्तीत जखडलेली होती. त्यांनी बालवयातच



कर्मकांड विरोध करून उपनयन संस्काराच्या जाणव्याचा त्याग करून कौटुंबिक व सामाजिक व्यवस्थे विरुद्ध बंड केले. कुटुंबाच्या विरोधात गेल्यामुळे त्यांना कुटुंबाचा त्याग करावा लागला. बालपणीच घरचा त्याग केल्यामुळे कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्यातील मलप्रभा व कृष्णा या दोन नद्यांच्या संगम तिरावरील कुडाळ संगम येथील अध्ययन केंद्रात प्रवेश करून बारा वर्ष साधना केली. तेथे त्यांनी धर्म, भाषा, तत्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला.

एवढेच नव्हे तर अंधश्रद्धा, कर्मकांड, अहिंसा विरोधात संपूर्ण समाज एकसंघ उभा केला. चातुर्वर्ण्य व्यवस्थे विरोधात समाज मन तयार केले. जातिभेद करू नका, मानवतेवर विश्वास ठेवा, चोरी करू नका परोपकारी भावना रुजवा हाच भाव लिंगायत धर्मामध्ये रुजवला. समाजाने आत्मनिर्भर होण्याचा संदेश दिला. अठरा पगड जातीला घेऊन त्यांनी लिंगायत धर्माची स्थापना केली. त्यांचा वारसा पुढे त्यांचे अनुयायी चालवित आहे. त्यांचे अनुयायी गळयात लिंग घालतात. गळ्यातील लिंग हे शिवाचे अर्थात सत्याचे प्रतीक मानतात. समानता हा लिंगायत धर्माचा मूळ आधार आहे. समानतेवर आधारित सवर्ण व कनिष्ठ जातीमध्ये विवाह घडवून आणलेत. त्यामुळे जाती जाती मधील भेद निर्मूलन होण्यास सुरुवात झाली. जाती भेदाचे प्रमाण कमी झाले. बसवेश्वरानी सामाजिक समानतेचे सुरू केलेले कार्य पुढे १९ व २० व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी वसा पुढे चालविला त्यामध्ये महाराष्ट्र पुरोगामी झाला.सामाजिक समतेचा आधारावर नव समाज निर्मिती झाली आणि खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला.

शील सगुणांचा अंगिकार करा, चोरी करू नये खोटे बोलू नये. त्यांनी गोर गरीब जनतेता मोठा आधार दिला. श्रम आणि व्यवसाय हाच स्वर्ग सिद्धांत मांडला. महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात समतेची आणि मानवी हक्काची दिलेली शिकवण सामाजिक न्याय मिळवून देणारी आहे. हिंदू धर्मातील अनिष्ट परंपरा आणि विषमता निर्माण करणाऱ्या रुदी यांच्या विरोधात लढा देऊन सर्वसामान्यांना व वंचितांना सामाजिक न्याय देऊन प्रवाहात आणले. महात्मा बसवेश्वर यांना आदरांजली..



**प्राचार्य डॉ.संजय साळीवकर**
मो.९४ २३४२ ८५१

# दिलखुलास व्यक्तिमत्व-अरुण जोशी (विश्रोळीकर)

**श्रध्दांजली**

अमरावती येथील निळकंठ चौक परिसरातील बुधवारा याठिकाणी राहणारे विश्रोळीकर जोशी कुटुंबीय सर्वांना परिचीत आहे. याच कुटुंबातील एक दिलदार, धाडसी आणि खिळाडूवृत्ती असलेले कै.अरुण नारायण जोशी हे असे व्यक्ती होते की ज्यांनी सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून अनेक चांगली माणसे जोडली होती.आज अरुण यांना जाऊन एक वर्षे पूर्ण झाले यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. त्यांच्या पहिल्या वर्षश्राद्धाच्या निमित्याने लेखन करतांना काळ कोणासाठीच थांबत नाही. 'कालायं तस्मै नमः' हेच त्रिवार सत्य आहे. जाणारा माणूस तर जातो पण त्यांच्या सहवसातील परिवारातील व्यक्तींच्या मनातील आठवणी मात्र विसरता येत नाही. त्या कायम स्मरणात राहतात.



शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले अरुण आणि त्यांचे सर्व कुटुंबीय शिक्षणाच्या निमित्ताने बुधवारा परिसरात स्थायीक झाले.कालांतराने प्रपंच वाढत गेला. नोकरीनिमित्य काहींना बाहेर जावे लागले. तरीसुद्धा विभक्त होऊनही जोशी कुटुंबातील बहिण – भावांमधील जिव्हाळा, ओढ कमी झाली नाही.अरुण हे संपूर्ण जोशी परिवारासाठी 'आधारवड' होते. दिलखुलास, आनंदी, अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले अरुण त्यांच्या परिवारातील मंडळीकरीता उत्कृष्ठ मार्गदर्शक होते. अरुण यांना मराठी वाड:मयाची प्रचंड आवड होती.मराठी भाषेचा प्रचंड शब्दसंग्रह त्यांच्याकडे होता. पण त्याच बरोबर आध्यात्मिक वाचनही त्यांचे प्रचंड होते.त्यांच्या विनोदी, खेळकर, हजरजबाबी गुणांमुळे त्यांच्या सहवासात आल्यावर मानवरचा ताण सहज कमी होत असे.जोशी कुटुंबातील पुतण्यांचे ते आवडते काका होते. तर भाच्यांसाठी आवडते मामा होते आणि जवळच्या सर्वांसाठी आवडते अरुणभाऊ होते.

स्वतःच्या कुटुंबावर तर त्यांचे जीवापाड प्रेम होते. जीवनात प्रत्येकालाच केव्हा न केव्हा चढउतारांना सामोर जावे लागते असेच काहीसे चढउतार त्यांच्याही जिवनात आले पण त्या परिस्थितीत त्यांच्या पत्नीने ज्योती अरुण जोशी ने (माझी लहान बहिण) त्यांना कायमच मोलाची साथ दिला. कठीण परिस्थितीत ती पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी होती. वरकरणी कणखर दिसणारे अरूण पत्नी आणि मुलाच्या बाबतीत फार हळवे होते. मुलगा निशांतशी त्यांचे वागणे अगदी मित्रत्वाचे होते. सुन श्रद्धा तिलाही मुलीप्रमाणे प्रेम दिले. त्यांची नात ईशा ही तर त्यांचा जीव की प्राण होती. नातीचे कौतुक करतांना ते थकत नसत.

जिवनातील काही वर्षे त्यांनी निळकंठ विद्यामंदीर ठिकाणी सेवा दिली. निळकंठ व्यायाम मंडळाचे ते सक्रीय सदस्य राहिले, याशिवाय कुस्तीपटू म्हणूनही त्यांनी आपल्या आयुष्यातील काही कालावधी घालविला. त्यांचे शाळेतील विद्यार्थी तथा पालकांशी सलोख्यांचे सबंध होते. काही वर्षे अकोला याठीकाणी त्यांनी व्यवसायही केला ज्या क्षेत्रात त्यांनी हात घातला त्या प्रत्येक ठिकाणी प्रचंड मेहनत त्यांनी केली.

हस्तरेषा ज्योतिष्य शास्त्राचा त्यांचा गाढा व्यासंग होता, ज्योतिष्य शास्त्राची पुस्तके वाचून त्यांत निर्माण झालेली आवडी पासून ते स्वतःला, दूर ठेव शकले नाही. मुळात वाचनाची आवड, जिद्द, सतत काहीतरी नविन शिकण्याची वृत्ती असलेले अरुण ज्योतिष्यशास्त्रात इतके पारंगत झाले की हस्तरेषेवरुन अचूक भाष्य ते करीत असत. लोकांना त्यांची महती लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांची गर्दी वाढू लागली येणाऱ्या प्रत्येक माणसाला हस्तरेषेच्या माध्यमातून मार्गदर्शन करीत असताना ते समुपदेशन ही करीत असत. प्रत्येकाचे चांगले व्हावे यासाठी ते नेहमी प्रयत्नशीलच राहीले प्रत्येक व्यक्तीची सकारात्मक उर्जा वाढविणे यासाठी ते धडपडत असत. थोडासा तब्येतीचा त्रास होत असल्यामुळे दवाखान्यात भरती झालेले अरुण भेटण्यासाठी येणाऱ्यांशी मनमोकळया गप्पागोष्टी ते करत होते. अशा या कठीण परिस्थितीत त्यांच्या कुटुंबियाच्या पाठिशी सदैव आधारस्तंभ म्हणून उभे राहिलेल्या राजाभाऊ जोशी, श्याम जोशी यांचा प्रकर्षाने उल्लेख करणे आवश्यक ठरते. अरुणच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे कुटुंबिय सर्वभाऊ, बहिणी,पूतणे,भाचे त्यांच्या जवळ होते. त्यांनीही अरुणच्या सेवेत कोणतीही कमतरता ठेवली नाही. डॉक्टरांनी अथक प्रयत्न करुनही नियतीपुढे सर्व हतबल झाले. आणि आयुष्यात सर्वांना धीर देणारे, खळखळून हसविणारे, उमदे व्यक्तिमत्व सर्वांना पोरके करून अनंतात विलीन झाले.त्यांच्या प्रथम वर्षश्राद्ध दिनी त्यांना साश्रु नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली.

**मीना रेलकर**
(माजी मुख्याध्यापिका)अकोला

# विरह व प्रेम संगमात 'सती'

**एक टक नाटक**
**समीक्षण**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत, ७१ वा. प्राथमिक नाट्यमहोत्सव २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज, अमरावती येथे सुरू असलेल्या नाट्य स्पर्धेत १२ वे नाटक स्व. व्यंकटेश माडगूळकर लिखित सती पार पडले.

सनई चौघडा चे स्वरात भटजी बुवाचे मंगलाष्टके, रंगमंचाचा पडदा उघडताच हुबेहुब वर-वधू, आप्त व काहीसे वऱ्हाडी प्रकाश झोतात लग्नसोहळ्याचा प्रसंग. लक्ष्मी नारायणाचा विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर हरिपंत व नारायणाची आई सुखाच्या संसारात या वाडा पुनर्जीवीत या आशयाची रम्य चर्चा.वधू वराचे सवाष्णसह उखाणा सोपस्कार.रति शय्येची तयारी, नव वर वधूचा रोमांच ऐवजी नारायणाची स्पर्श सुद्धा न करण्याच्या अटीने लक्ष्मीचे अवसान गळते.माझा दोष काय?नारायणचे इच्छे विरुद्ध लग्न संन्याशी होऊन तीर्थाटनाची अभिलाषा. स्वांतसुखात मग्न असलेल्या नारायणाचा हेतू, हरिपंत व आई यांच्या लक्षात असताना, केवळ वंशाचा वेल वृद्धिंगत होऊन घराणे शाश्वत रहावे !! ह्या हट्टामध्ये लक्ष्मीची गुंफण,नारायण लग्नानंतर संसारात रमेल या अपेक्षेने आई व चुलते हरिपंत लक्ष्मीकडून आशा करीत असताना नारायण सर्व टाळून स्वतःच्या सुखासाठी



पत्नी व कुटुंब सोडून काशीयात्रेला निघताना, हरिपंत कुबडीतील गुप्ती उगारत.मिरजेच्या पटवर्धन यांच्या यात्रेत नारायण काशीला निघून गेल्यावर त्याचा समाचार मिळेल; यासाठी पंत यात्रेतील ब्राह्मणांच्या संभावनानिमित्ताने विचारणा प्रसंगात ब्राम्हणांचे विनोद अंगिक अभिनयाने नाटकाची थोडी चव लज्जत करते. नारायण गेल्याचा मिरजेच्या आलेल्या लखोटावरून वार्ता कळताच लक्ष्मीचे पायाची धरा अधर होतें.

१५ वर्षा पासून ओसळलेल्या वाड्याच्याची जबाबदारी नारायणाकडून होती.आधीच घरात तीन विधवा त्यात लक्ष्मीची भर.मेहंदळ्यांचा शापित वाडा लक्ष्मीच्या पावलाने ही उःशापित झाला नाही. एकल कोंडा, विरक्तीच्या भावात राहणारा नारायण काशी यात्रेत दुष्काळची शिकार झाला.लक्ष्मी विधवा झाली. ब्राह्मणांच्या वंशात पति अनुगमन परंपरा.म्हणून लक्ष्मीची सती देण्यासाठीची तयारी.समस्त विधवा तिच्या भाग्याची प्रशंसा करीत स्वर्गाचे दार,सीता-द्रौपदीच्या पंगतीला बसण्याची संधी आदि समजुतीचे बोल ऐकवून? सुन्न व शून्य झालेली लक्ष्मी बेभानपने सतीचे तयारीत वाहून जाते.शास्त्रीबुवा येतात व झालेल्या घटनेचा विरह संवाद ; या नाटकाचा मर्म गाभा बाप मुलीला मनाच्या आवाजावर सोडून जातो. माझी तुळशी परत करा म्हणून पंताकडे विनवणी करणारे शास्त्रीबुवा येथे शास्त्री व क्षात्रिय घराण्याचं द्वंद दिसते.श्वेतवस्त्रात लक्ष्मीचे सती प्रवेशचे वर्णन सुरू असताना पंत घात झाला!! म्हणून वाड्यावर धावत येऊन झालेला प्रसंगात लक्ष्मी अग्नी ऐवजी जलसमाधीसाठी गंगेत उडी घेऊन फरार.

छावणीचे दृश्य,कृष्णमंदिरात लक्ष्मी श्वेतभिजलेल्या परिधानात, गोरा शिपाई लक्ष्मीला वाचल्याचे सांगते.सरू कुणबीन लक्ष्मीच्या मदतीला.गोरा अधिकारी तिचा स्वामी. जिवंत कुणासाठी या प्रश्नाने लक्ष्मी गोऱ्या शिपाई कडून विचारणा.गोरा मानवी अधिकारची जाणीव करून सभ्यतेचा परिचय करून देतो.लक्ष्मी येथे रमते, गोरा श्वेतवस्त्र त्यागून रंगीत वस्त्र लक्ष्मीला देत अन्न व निवारा आता वस्त्र स्वीकारा म्हणून विनवते.प्रेमळ व वीर पुरुष म्हणून लक्ष्मीचे मन जागृत होऊन गोऱ्याने दिलेल्यावस्त्राचे व काढलेल्या चित्राचे प्रसंगात गुलाबी पातळने रुक्ष लक्ष्मी प्रसन्न होते. इंग्रजाचे गुलाब स्वीकारून येथे प्रेमाची रुजवण होते.गोरा पेंढाऱ्याचे चढाईवर जातात.शास्त्री लक्ष्मीचा शोध घेत छावणीवर येतात.निषिद्ध जागेवर लक्ष्मी म्हणून तिचा धिक्कार करते.परत न्यायला पंत सुद्धा घ्यायला आल्याचे सांगत येथे लक्ष्मीची जगण्याच्या उमेदीने गोऱ्या इंग्रजांशी मनजुळवणी सांगते. सरू शिपाई वीरगतीला गेले!! सांगत लक्ष्मी आता पूर्ण तुटून जाते व स्वतः सती जाऊन अग्निसनावर स्वतःची आहुती देत नाटकाचा विराम.

ऐतिहासिक नाटकाची ही कथा शोकांतिका सदरातील असून भारतीय रूढी, परंपरा,शनिवारवाड्यातील वंश व गोरे अधिकारी यांचे सभ्यत्व दर्शवत लक्ष्मीची होरपळ प्रेमळ भाव जागृत करणाऱ्या वीरगतीमध्ये शांत होतें.लक्ष्मीचे चारित्र्य हे शास्त्रगृही ते सावकार आणि क्षत्रिय या त्रिकुटीत बघताना नारायण सारखा विरक्त पळपुट्यापेक्षा समजूतदार व रंगणार उतरणारा साथीदार जास्त भावतो.ब्राह्मणत्व आणि वंश यात स्त्री जातीची अवहेलना एकच वाड्यात तीन विधवा तसेच पंत विदुर, शास्त्री बाप म्हणून मुलीचे विवेकावर निर्णय देणारी व्यक्ती.

इंग्रज सभ्य, मानवी हक्क जाणीवेतून लक्ष्मीचे मन जिंकणारे असे प्रसंगाने भरलेले नाटक शिखर बिंदूवर शिकंतिकेवर नेताना दिग्दर्शक ममता दीपक नांदगावकर ह्यांनी ज्या तोडीने रंगमंचावर उभे केले त्याला प्रत्येक ठिकाणी दर्शकांनी टाळ्या वाजून दाद दिली.रंग संगत प्रकाश योजनेत प्रसंग उभे करत असताना ऐतिहासिक श्वेत धवल नाटक दीपक नांदगावकर रंगीत करीत होतें ऐन सतीचे प्रसंगी ओरिजन मशाल देण्या ऐवजी वायर असलेल्या मशालीन(जास्तीचा) शहाणपणा दिसला. सौरभ शेंडे यांनी संगीताची उत्तम सुपारी घेत !! मात्र नारायण निधन वेळी शॉक व शोक दर्शवण्यात कमी पडले.वेशभूषा रंगारी काम निलेश दह्राळ यांचे होते.



नेपथ्य करताना शिवानी ठाकरेने वाडा दाखवताना श्वेताभिंती पेक्षा दगडी नक्षीदार खांब दाखवण्यात कमी.लटकावलेला खरोखरचा कंदील पण विझलेला,दिवाणखाना रतिशय्येत एकाच वेळी दाखवून रंगमंचचे स्थान हलके झाले. बाकी सर्व फर्स्टक्लास! हरीपंत विनोद सुरुसे, शास्त्रीबुवा संजय मैदानकर यांनी हुबेहुब अभिनयातून इतिहास दर्शविला.नारायण व इंग्रज शिपाई म्हणून प्रथमेश हाते याने उत्तम संवाद साधून नाटकाचा इतिहास कायम ठेवला.आई संजीवनी पुरोहित कोमल स्वरात विरह सांभाळत होती, आऊ इंशिका बरगट हलकीसी खलनायकी आवाजात दिसली. विरह व प्रेम यात लवचिकता, नाजूकपन रसनिर्मितीसाठी शर्वरी ठाकरे ही लक्ष्मीची भूमिका पहिल्यांदा करीत असावी.बाकी सर्व आपापल्या पात्रात सत्पात्री ठरले. ब्राम्हण अस्सल भट व परेटचा पाय आपटताना ओम गवई हास्य टिपून गेला.दिग्दर्शकाने सुमारे १८ कलावंत जागोजागी टिकून ठेऊन या नाटकाला हौशीतून पुढच्या टप्प्यात काढायला हवे हे उत्तम सादरीकरण म्हणून दर्शकांच्या टाळ्या हर संवादाला दाद मिळाल्यावर समजते. ब्लॉक आऊट ते विराम स्थळी कशी तयारी करावी लागते, याचे चौथी भिंत तांत्रिक अडचणीने फाटल्यामुळे दर्शकांना पाहण्याचा योग सती या तीन अंकी एकटक नाटक पाहताना दिसला.

**कबीर फादर**
मो.७९८६४५५६५

# अकोला पोलिसांच्या ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ला राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च स्वतंत्र सन्मान

## स्कॉच अवॉर्डसाठी निवड; अकोल्याचा ऐतिहासिक विक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला जिल्हा पोलिस दलासाठी अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक असा क्षण ठरला आहे. अकोला पोलिसांनी विकसित केलेल्या ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ या अभिनव आणि तंत्रज्ञानाधिष्ठित उपक्रमाची देशातील शासन, सार्वजनिक प्रशासन व नागरी नवकल्पनांच्या क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या स्कॉच अवॉर्ड साठी निवड करण्यात आली आहे. जिल्हा स्तरावर विकसित झालेल्या एआय - आधारित प्रतिबंधक पोलिसिंग मॉडेलला राष्ट्रीय स्तरावर असा सर्वोच्च स्वतंत्र सन्मान मिळणे ही अकोल्यासाठी अभिमानास्पद व ऐतिहासिक बाब मानली जात आहे.*



अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या दूरदृष्टीपूर्ण प्रशासनिक नेतृत्वातून आणि अकोल्याचे सुपुत्र किशन पानपालिया यांच्या डेटा-आधारित प्रणाली डिझाइन व तांत्रिक नेतृत्वातून ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ची संकल्पना प्रत्यक्षात उतरली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारंपरिक पोलिसिंगला अधिक प्रभावी, अचूक आणि परिणामकारक बनविण्याचा हा अभिनव प्रयत्न ठरला आहे.

देशभरातील विविध शासन, प्रशासकीय संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांमधून कठोर व बहुपदरी मूल्यांकन प्रक्रियेनंतर ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ची अंतिम निवड करण्यात आली. स्कॉच अवॉर्ड हा देशातील आउटकम बेस गव्हर्नन्स, सार्वजनिक सेवा व विकास क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठित स्वतंत्र सन्मानांपैकी एक मानला जातो.

### राष्ट्रीय स्तरावर आधीच दखल

यापूर्वी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो, नवी दिल्ली येथे महाराष्ट्राच्या वतीने ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’चे सादरीकरण करण्यात आले होते. त्यावेळी राष्ट्रीय निवड समितीने या AI-आधारित प्रतिबंधक पोलिसिंग मॉडेलची विशेष दखल घेतली होती. आता स्कॉच अवॉर्ड साठी झालेली निवड ही त्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली अधिकृत दखल मानली जात आहे.

### पुनरावृत्ती गुन्ह्यांत तब्बल ४८ टक्के घट

प्रोजेक्ट त्रीनेत्रच्या अंमलबजावणीनंतर जिल्ह्यातील पुनरावृत्ती स्वरूपातील गुन्ह्यांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. फेब्रुवारी २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीत अशा गुन्ह्यांची संख्या ११४ इतकी होती. मात्र, प्रकल्प सुरू झाल्यानंतर ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ही संख्या ५९ वर आली. म्हणजेच पुनरावृत्ती गुन्ह्यांमध्ये सुमारे ४८ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे. दर बुधवारी घेतल्या जाणाऱ्या मॉनिटरिंग आढावा बैठका, जोखीमाधारित प्राधान्यक्रम आणि वेळेवर करण्यात येणाऱ्या प्रतिबंधक कारवाईमुळे हा सकारात्मक परिणाम साध्य झाल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### २८ मार्च रोजी दिल्लीमध्ये पुरस्कार वितरण

दरम्यान, १०७ व्या स्कॉच समिट दरम्यान हा सन्मान औपचारिकरीत्या प्रदान करण्यात येणार आहे. हा समारंभ २८ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटरमधील सिल्वर ओक हॉल येथे पार पडणार आहे. अकोला ठरला ‘इंटेलिजंट डिस्ट्रिक्ट पोलिसिंग’चा राष्ट्रीय संदर्भ ‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ सोबतच ‘प्रोजेक्ट रक्षा’ सारख्या नागरिकाभिमुख उपक्रमांमुळे अकोला पोलिसांचे काम आता अधिक प्रभावीपणे सुरू आहे. जिल्हा स्तरावरून विकसित झालेला हा अभिनव उपक्रम आता राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व करत असून, इंटेलिजंट डिस्ट्रिक्ट पोलिसिंगच्या क्षेत्रात अकोला एक महत्त्वाचा संदर्भबिंदू म्हणून उदयास येत आहे.

अकोल्यातून उभा राहिलेला हा उपक्रम केवळ पोलिस दलाची कामगिरी नसून संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. राष्ट्रीय स्तरावर अकोल्याचे नाव उजळविणाऱ्या या यशाबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

### एआय आधारित प्रतिबंधक पोलिसिंगचे प्रभावी मॉडेल

‘प्रोजेक्ट त्रीनेत्र’ हा केवळ डिजिटल सॉफ्टवेअर प्रकल्प नसून, गुन्हे प्रतिबंधासाठी डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया सक्षम करणारी एक एकात्मिक प्रशासन प्रणाली आहे. या प्रकल्पामध्ये पुनरावृत्ती गुन्ह्यांचा अभ्यास, जोखमीचे मूल्यांकन, व्यक्तीनिहाय देखरेख, बुधवार परेडचे मॉनिटरिंग, प्रतिबंधक कारवाई, समुपदेशन तसेच वेळेवर फील्ड इंटरव्हेन्शन या सर्व बाबी एआय - सक्षम प्रणालीद्वारे एकत्रित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पोलिस यंत्रणेला गुन्हे घडण्यापूर्वीच त्यांचे प्रतिबंध करण्यासाठी अधिक प्रभावी यंत्रणा उपलब्ध झाली आहे.

# गांधी रोडवरील आगीने व्यापा–यांचे मोठे नुकसान

## महापौर व स्थायी समिती सभापतींची पाहणी, दोषींवर कारवाईचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील गजबजलेल्या गांधी रोड परिसरात शनिवारी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत अनेक दुकानांचे मोठे नुकसान झाले. घटनेनंतर आज महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त दुकानांची पाहणी केली व व्यापाऱ्यांशी संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला.



गांधी रोडवरील आशा स्टोअर, बाबा कलेक्शन, श्री दत्त फ्रेमिंग वर्क्स, सदगुरू गारमेन्ट, पूजा इलेक्ट्रिकल्स आणि साई फ्रेमिंग सेंटर या दुकानांना काल उशिरा रात्री अचानक आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तब्बल १९ ते २० फायर टेंडरच्या मदतीने अथक प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.

दरम्यान, पाहणीदरम्यान काही दुकानदारांनी अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली. यावर स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी गंभीर दखल घेत, चौकशीत कोणताही कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला.

यावेळी सभागृहनेते पवन महल्ले, नगरसेवक रफीक सिद्दीकी, हरिषभाई आलिमचंदानी, सिद्धार्थ उपरवट, देवाशिष काकड, संतोष डोंगरे, नगरसेविका उषाताई वीरर्क, ॲड. कल्पना गोटफोडे, चंदा शर्मा, सामाजिक कार्यकर्ते रणजीत खेडकर, संजय गोटफोडे, संतोष पांडे यांच्यासह मनपा उपायुक्त विजय पारतवार, सहाय्यक आयुक्त राजेश सरप, मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष कथले, सहाय्यक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी प्रवीण मिश्रा, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार व कनिष्ठ अभियंता राहुल राऊत उपस्थित होते. घटनेमुळे गांधी रोड परिसरात मोठी खळबळ उडाली असून नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांना मदत व आगीच्या कारणाचा सखोल तपास करण्याची मागणी पुढे येत आहे.

### मनपा आयुक्तांकडून पाहणी; व्यापाऱ्यांशी साधला संवाद

शहरातील गांधी रोड परिसरात शनिवारी मध्यरात्री लागलेल्या आगीत काही दुकाने जळून नुकसान झाल्याच्या घटनेनंतर अकोला महानगरपालिकेचे आयुक्त सुनील लहाने यांनी रविवारी सकाळी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रभावित व्यापाऱ्यांशी संवाद साधत घडलेल्या प्रकाराची माहिती घेतली. घटनास्थळी पाहणीदरम्यान आमदार वसंत खंडेलवाल यांनी अग्निशमन विभागाच्या गाड्या उशीरा पोहोचल्याची बाब मनपा आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. यावर मनपा अग्निशमन अधिकाऱ्यांनी घटनाक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने संपर्क साधता यावा यासाठी अग्निशमन विभागात एक अतिरिक्त दूरध्वनी क्रमांक कार्यान्वित करण्याची सूचना आमदार खंडेलवाल यांनी केली. या पाहणीवेळी मनपा उपायुक्त विजय पारतवार, सहायक आयुक्त राजेश सरप, मुख्य अग्निशमन अधिकारी मनीष कथले, सहायक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता राहुल राऊत आदी अधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी शेतकरी संघटनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी राम मंगळे यांची नियुक्ती



■ प्रतिनिधी | अकोट ■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी संलग्न असलेल्या राष्ट्रवादी शेतकरी संघटनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी अकोट तालुक्यातील उमरा सर्कलमधील बेलुरा येथील सरपंच रामदादा मंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष तसेच शेतकरी संघटनेचे मार्गदर्शक ॲड. वसंतराव मानकर यांनी ही नियुक्ती जाहीर केली. त्यांच्या निवडीमुळे परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

रामदादा मंगळे हे सामाजिक, शैक्षणिक तसेच ग्रामविकासाच्या कामांमध्ये सातत्याने सक्रिय राहिले आहेत. गावातील विविध विकासकामे, शेतकऱ्यांच्या समस्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर उपजिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली.

मंगळे यांच्या नियुक्तीमुळे शेतकरी संघटनेच्या कामकाजाला अधिक गती मिळेल. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीसंबंधी अडचणी आणि ग्रामीण भागातील विविध समस्या प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, या नियुक्तीबद्दल अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत ॲड. वसंत मानकर यांचे आभार मानले असून राम मंगळे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रतिबंधित प्लास्टिकवर मनपाची कारवाई
## ‘मोती ट्रेडर्स’ला 10 हजारांचा दंड



■ प्रतिनिधी | अकोला ■

शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिक वस्तूंच्या विक्रीविरोधात अकोला महानगरपालिकेने पुन्हा एकदा कडक भूमिका घेतली आहे. शहरातील होलसेल किराणा बाजारात छापा टाकत प्रतिबंधित डिस्पोजेबल चहाचे कप विक्री करताना आढळलेल्या मोती ट्रेडर्स या व्यावसायिकावर तब्बल १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार तसेच उपायुक्त विजय पारतवार आणि स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (१४ मार्च) प्रभाग क्र. १८ मधील होलसेल किराणा बाजार परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी तपासणीदरम्यान मोती ट्रेडर्स येथे शासनाने प्रतिबंधित केलेल्या डिस्पोजेबल प्लास्टिक चहाच्या कपांचा मोठा साठा आढळून आला.

यामुळे संबंधित विक्रेत्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच पर्यावरण संरक्षण नियम २०१८ व २०२१ अन्वये १० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत मनपा पश्चिम झोन कार्यालयाचे सहायक आयुक्त गजानन घोंगे, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक अमर खोडे, स्वच्छता निरीक्षक मनोज सारवान, सचिन आखरे, आदर्श गोहर, राजेश सारवान, रवी महोत आदी कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा व विक्री आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा मनपा प्रशासनाने व्यावसायिकांना दिला आहे.

## महिला बचत गटांना कृषी अवजार अनुदान

**अकोला :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेतून गावपातळीवर ’कृषी अवजार बँक’ स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्क्यांपर्यंत, कमाल २४ लाख पर्यंत अनुदान दिले जाणार आहे.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमलबजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे व अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ही योजना सुरू केली आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या थेट उपयोगाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

केंद्र सरकारने गेल्या पाच महिन्यांतील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र १ लाख ८ हजार ३२७ स्थापित सौरऊर्जा प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत. देशामध्ये या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यापैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- भोड येथील भू-मापन गट क्र - ८६ याचे एकूण क्षेत्र ०६ हे. ७९ आर, यापैकी लिहून देणार १) सुरेश दिनकरराव देशमुख व इतर यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १५/०३/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के. डी. शिराळे
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे. - भोड येथील भू-मापन गट क्र - ६६ याचे एकूण क्षेत्र ०२ हे. ०३ आर, यापैकी लिहून देणार १) मिनाबाई सुनील तायडे व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक १५/०३/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के. डी. शिराळे
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

## कुंभारी येथे प्रमोद मुरुमकार यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■



युरोप विदेश शेतकरी अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण करून मायदेशी परतलेल्या महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांचा फार्म लॅब, कुंभारी यांच्या वतीने १४ मार्च २०२६ रोजी सत्कार करण्यात आला. शिवणी कृषी मंडळाचे अधिकारी समाधान गाडेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी सहाय्यक सदार, फार्म लॅब कुंभारीचे संचालक गणेश ठोंबरे तसेच शुभम बिडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान फार्म लॅब कुंभारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांविषयी मार्गदर्शन केले.

दरम्यान, युरोपमधील शेतकरी अभ्यास दौऱ्याबाबत समाधानजी गाडेकर यांनी उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. यावेळी प्रमोद मुरुमकार यांनी त्या दौऱ्यातील अनुभव, आधुनिक शेती पद्धती तसेच तेथील शेतकऱ्यांच्या कार्यपद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. या चर्चेतून उपस्थित शेतकरी बांधवांना अनेक उपयुक्त बाबी समजल्या.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- भोड येथील भू-मापन गट क्र - ७३ याचे एकूण क्षेत्र ०२ हे. १७ आर, यापैकी लिहून देणार १) अरुण आत्माराम पद्माने यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक. १५/०३/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के. डी. शिराळे
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- भोड येथील भू-मापन गट क्र - ७२ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ८१ आर, यापैकी लिहून देणार १) हरिश्चंद्र सूर्यभानजी वाणखडे यांचे मालकीचे क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक १५/०३/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के. डी. शिराळे
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहिती करिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अकोला, ता. अकोला, मौजे.- भोड येथील भू-मापन गट क्र - ६५ याचे एकूण क्षेत्र ०० हे. ८८ आर, यापैकी लिहून देणार १) मिनाबाई सुनील तायडे व इतर यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून सदर व्यवहारापोटी इसार म्हणून काही रक्कम स्विकारलेली असून सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजाऱ्याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक १५/०३/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
ॲडव्होकेट के. डी. शिराळे
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

# सेलू बसस्थानकात प्रवाशांच्या सुविधांचा बोजवारा

## आठ दिवसांत सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**सेलू/ अभय बेदमोहता**

सेलु शहरात जिल्ह्याचे आमदार व राज्यमंत्री पंकज भोयर यांचे प्रयत्नाने भव्य दिव्य असे बसस्थानक येथील प्रवाश्यांची होत असलेली गैरसोय पाहता कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आले. परंतू त्या बसस्थानकात प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे नसणे, स्वच्छतेचा अभाव आणि पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या गंभीर बाबींकडे लक्ष वेधत भाजप युवा मोर्चाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य धीरज मधुकर पवनाकर यांनी बस



स्थानक प्रमुखांना निवेदन देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सेलू बसस्थानक परिसरात शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र बसस्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली ही व्यवस्था अद्याप का करण्यात आलेली नाही, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.तसेच बसस्थानकातील स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय असून परिसरात घाण व दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे प्रवाशांना, विशेषतः महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. उष्णतेचे दिवस सुरू असताना पिण्याच्या पाण्याची सुविधा देखील अपुरी असल्याने प्रवाशांची आणखी गैरसोय होत आहे.याशिवाय लांब पल्ल्याच्या बसेस बसस्थानकात न येता बाहेरच थांबत असून बाहेरच्या. बाहेरच निघून जात असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. त्यामुळे प्रवाशांना धावपळ करावी लागत असून बस मिळवण्यासाठी यशवंत विद्यालय चौकात जाण्यासाठी एकतर.पैसे खर्च करावे लागतात तर गोरगरिबांना पायपीट करत जावे लागते.व्यवस्थापनाच्या पूर्ण दुर्लक्षितपणामुळे ही समस्या येथै कायम असल्याचे नागरकिंचे आरोप आहे.बसस्थानकात तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत,परिसरात स्वच्छता व स्वच्छतागृहांची योग्य व्यवस्था करावी,प्रवाशांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करावी,तसेच येणाऱ्या जाणाऱ्या सर्व डेपोच्या बसेस या बसस्थानकातच थांबवण्याची सक्ती करावी.असे न करणाऱ्या चालक-वाहकांवर दंडासह.कारवाई करण्यात यावी ची मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे.

**आठ दिवसांचा अल्टिमेटम**

निवेदनात प्रशासनाला आठ दिवसांच्या आत या सर्व समस्या सोडवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. सेलू बसस्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र अशा मूलभूत सुविधांचा अभाव असणे ही अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे. यप्रसंगी नगर सेवक दिनेश माहुरे,समाज सेवक मनोज केळझरकर सह अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक; दोघे जखमी

**कारंजा (घा.)**-शहरातील एमएसईबी कार्यालयालगत भरधाव वेगाने येणाऱ्या दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन दोघे जखमी झाले. सचिन नासरे व मुकेश प्रांजळे हे दोघे जुना बाजार परिसरातून दुचाकीने घराकडे जात असताना समोरून आलेल्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात सचिन नासरे गंभीर जखमी झाला असून मुकेशलाही दुखापत झाली आहे. परिसरातील नागरिकांनी तातडीने जखमींना रुग्णालयात दाखल केले. अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. या घटनेप्रकरणी प्रवीण नासरे यांच्या तक्रारीवरून संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध कारंजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

---

## अवैध रेती वाहतूक उघड;आठ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा**-जिल्ह्यात रेती घाटांचा लिलाव झाल्यानंतरही बेकायदा रेती वाहतूक सुरू असल्याचे चित्र कायम आहे. समुद्रपूर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे वायगाव परिसरात कारवाई करून रेतीने भरलेला ट्रॅक्टर पकडला. या कारवाईत ट्रॅक्टर व रेती असा सुमारे आठ लाख सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चालकाकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने रेतीची तस्करी होत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी दिनेश गलांडे (रा. समुद्रपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील तपास सुरू आहे.

---

## संशयास्पद हालचाली करणारे युवक ताब्यात

**देवळी**-शहरातील इसार पेट्रोल पंपाच्या मागील भागात अंधारात संशयास्पदरीत्या लपून बसलेल्या दोन युवकांना पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली. गस्त घालत असताना पोलिसांना हे दोघे बालाजी टाऊन परिसरात संशयास्पद हालचाली करताना आढळले. चौकशीदरम्यान समाधानकारक माहिती न देता टाळाटाळ केल्याने त्यांना पोलिस ठाण्यात नेण्यात आले. त्रिशुल अविनाश तिवाडे (वय १९) व सम्याक दीपचंद भरणे (वय १९) अशी अटक केलेल्यांची नावे असून दोघेही देवळी येथील रहिवासी आहेत. त्यांच्या विरोधात देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

---

## विहिरीत पडून वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू

**वर्धा**-सालोड (हिरापूर) येथील शेत परिसरातील विहिरीत पडून एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. होमदेव नारायण सुरकार (वय ७०) असे मृताचे नाव आहे. ते घराजवळील शेतात गेले असताना तोल जाऊन विहिरीत पडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यांना मिरगीचा त्रास असल्याची माहिती नातेवाइकांनी दिली. बराच वेळ ते घरी न परतल्याने शोध घेत असताना विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# वर्षभरापासून हायमास्ट दिवे बंद; महामार्ग अंधारात

**आष्टी शहीद/जनमाध्यम**



तळेगाव (शा.प.) ते वरुड या राष्ट्रीय महामार्गावर आष्टी शहरातून जाणाऱ्या मार्गावरील शहीद स्मारक ते मोर्शी टी-पॉईंटदरम्यानचे हायमास्ट दिवे गेल्या वर्षभरापासून बंद असल्याने परिसर अंधारात बुडाला आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे.

आष्टी हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असल्याने या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात असते. मात्र दिवे बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. हायमास्ट दिव्यांच्या देखभालीची जबाबदारी नेमकी कोणाकडे आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.या संदर्भात नगरसेवक ॲड. मनीष ठोंबरे यांनी संबंधित कंपनीच्या कार्यालयात भेट देऊन माहिती घेतली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ पर्यंत दिव्यांची देखभाल आर.आर. कन्स्ट्रक्शन कंपनीकडे होती. त्यानंतर ही जबाबदारी नगर पंचायतीकडे हस्तांतरित करण्याबाबत पत्र पाठविण्यात आले; मात्र नगर पंचायतीकडून त्यास प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी लवकरात लवकर दिवे सुरू करण्याची मागणी केली आहे.

# उष्णतेचा पारा चढला; शीतपेयांच्या विक्रीला उधाण

## लिंबूपाणी-उसाच्या रसासाठी गर्दी, लिंबू दरही कडाडले

**सेलू /जनमाध्यम**

सेलू तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून तापमानातील झपाट्याने झालेल्या वाढीमुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. दुपारच्या वेळी रस्ते निर्मनुष्य दिसत असून सकाळ-सायंकाळीच नागरिक बाहेर पडत आहेत. वाढत्या उष्णतेचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठेवर दिसून येत असून शीतपेयांच्या विक्रीला अक्षरशः उधाण आले आहे.

शहरासह ग्रामीण भागातील शीतपेयांच्या गाड्या व दुकानांवर ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. लिंबूपाणी, लिंबू सरबत, उसाचा रस, लस्सी, ताक, मठ्ठा तसेच कलिंगड, संत्रा, मोसंबी आदी फळांचे रस यांना मोठी मागणी आहे. दुपारच्या कडक उन्हात थंड पेय घेण्यासाठी नागरिक रांगा लावत असल्याचे चित्र सर्वत्र



दिसत आहे.मागणी वाढल्याने लिंबूच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी स्वस्त असलेला लिंबू आता किरकोळ बाजारात सुमारे ५ रुपयांना एक या दराने विकला जात आहे. त्यामुळे लिंबूपाणी विक्रेत्यांनाही वाढत्या खर्चाचा सामना करावा लागत आहे.

उन्हाच्या तीव्रतेमुळे शेतकरीही सकाळच्या थंड वेळेतच शेतीकामे पूर्ण करण्यावर भर देत आहेत. दुपारच्या वेळी शेतात काम करणे कठीण होत असल्याने सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा काम सुरू असल्याचे दिसते. वाढत्या तापमानामुळे पिकांनाही फटका बसत असून शेतकरी अतिरिक्त पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहेत. दरम्यान, बाजारात गॉगल, टोपी, स्कार्फ, छत्री आदी उन्हापासून बचाव करणाऱ्या वस्तूंची मागणीही वाढली आहे. वीजपुरवठ्यातील अधूनमधून होणाऱ्या खंडामुळे पंखे, कुलर व फ्रीज यांसारख्या उपकरणांच्या खरेदीत वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. एकूणच, उन्हाच्या झळांनी जनजीवन विस्कळीत होत असताना थंड पेये व संरक्षणात्मक साधनांवर नागरिकांचा मोठा भर दिसून येत आहे.

# मत्स्यव्यवसाय विषयावर एक दिवशीय प्रशिक्षण

**वर्धा/ जनमाध्यम**

आत्मा व मत्स्यव्यवसाय विभागाच्यावतीने सामाजिक न्याय भवन येथे एक दिवशीय मत्स्यव्यवसाय विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणास जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय संघटनेचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसायिक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी मत्स्यव्यवसायाबाबत विविध प्रकारचे मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर, आत्माच्या उपसंचालक राणी गायकवाड, नागपुरचे सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त शुभम कोमरेवार, वर्धा सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे, मत्स्यविज्ञान महाविद्यालय नागपुरच्या प्राद्यापक डॉ. मीनल वागडे, सहाय्यक मत्स्याविकास अधिकारी शि. क. पाटील, ऋचा कंधारे, जिल्हा मच्छिमार सहकारी संघाचे अध्यक्ष कमलेश मारबडे आदी उपस्थित होते.यावेळी अरविंद उपरीकर यांनी फळबाग, पालेभाजी, शेतीसोबतच जोडधंदा म्हणुन मत्स्यव्यवसाय करणे अतिशय महत्वाचे असून यामधून शेतकऱ्यांचे बळकटीकरण होण्यास मदत होईल, असे सांगितले. शुभम कोमरेवार यांनी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत बायोप्लॉक प्रकल्पाविषयी सुरु करण्यापासून ते मत्स्यबीज संचयन करणे, फ्लॉक तयार करणे, मासे विक्री योग्य झाल्यानंतर मासे विक्री करण्यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर कसा करावा, याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. मीनल वागडे यांनी गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय, खाद्य व्यवस्थापन याबद्दल श्री. पाटील यांनी माशांचे रोग आणि त्यावरील उपाय तसेच ऋचा कंधारे यांनी गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धनासाठी उपयुक्त मत्स्यप्रजातीची ओळख याबाबत मार्गदर्शन केले. तसेच स्वप्नील वालदे यांनी मत्स्यव्यसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व योजनांची माहिती दिली, असे मत्स्यव्यवसाय विभागाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# महिला लोकशाही दिन उद्या

**वर्धा/ जनमाध्यम**

समस्याग्रस्त व पिडीत महिलांच्या प्रश्नांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी तसेच पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलबध व्हावी, यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून राज्य, विभाग व जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन १६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

या महिला लोकशाही दिनामध्ये पिडीत महिलांच्या तक्रारी असल्यास जिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावा. महिलांनी स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे. विहित नमुन्यात नसणारे अर्ज, न्यायप्रविष्ठ, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे स्वीकारण्यात येणार नाही. जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या व तालुकास्तरावर चौथ्या सोमवारला महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने शासनाने एक व्यासपीठ निर्माण केले असुन महिला लोकशाही दिनाचा लाभ महिलांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

# उन्हाळ्याची चाहूल लागताच पानगळ; तापमानात वाढ

**साहूर /जनमाध्यम**



शिशिर ऋतूचा शेवट आणि उन्हाळ्याची चाहूल लागताच परिसरात पानगळ मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या उष्णतेमुळे झाडांवरील पिवळी, सडलेली व पिकलेली पाने खाली झडताना दिसत आहेत. अनेक रस्ते, शेतकाठ व वस्तीभाग सुकलेल्या पानांच्या सड्याने भरून गेले आहेत.

तज्ज्ञांच्या मते, पानगळ ही वृक्षांच्या जीवनचक्रातील नैसर्गिक अवस्था असून ती उन्हाळ्याच्या तयारीचा भाग असते. पानांद्वारे होणारे बाष्पीभवन कमी करण्यासाठी झाडे जुनी पाने टाकून देतात, ज्यामुळे पाण्याची बचत होते. शुष्क वातावरण, घटलेली भूजलपातळी आणि वाढलेले तापमान यामुळे या प्रक्रियेला वेग येतो.हिवाळ्यात पाण्याची उपलब्धता असली तरी उन्हाळ्याच्या सुरुवातीला मातीतील ओल कमी होत जाते. परिणामी पानांना आवश्यक पाणी मिळत नाही आणि ती गळून पडतात. मात्र झाडांची मुळे व खोड जिवंत आणि ओलसर राहतात. लवकरच या झाडांना नव्या पालवीची हिरवी चाहूल लागणार असल्याने निसर्ग नव्या रूपात खुलणार आहे.

# गर्भाशय मुख कर्करोगाविरुद्ध संरक्षणासाठी पुढे या

## तहसीलदार कपिल हाटकर यांचे आवाहन

**समुद्रपूर/ जनमाध्यम**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने ८ मार्च २०२६ पासून १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींसाठी गर्भाशय मुख कर्करोग प्रतिबंधक एचपीव्ही लसीकरण मोहिम सुरू करण्यात आली आहे. १४ वर्ष पूर्ण व १५ वर्ष पूर्ण न झालेल्या सर्व मुलींना या मोहिमेत मोफत लसीकरण करण्यात येणार असून पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार कपिल हाटकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील भगत यांनी केले आहे.

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ११ मार्च रोजी तहसीलदार हाटकर यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय समितीची बैठक घेण्यात आली. गटविकास अधिकारी सतीश टिचकुळे यांचीही उपस्थिती होती. एचपीव्ही लस ही ह्युमन पॅपिलोमा व्हायरसच्या संसर्गापासून संरक्षण देऊन गर्भाशय मुख कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करते.भारतीय महिलांमध्ये गर्भाशय मुख कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा कर्करोग असून मृत्यूदरही चिंताजनक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही या लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. जगभरात ५० कोटीहून अधिक महिलांना ही लस देण्यात आली असून तिची सुरक्षितता सिद्ध झाली आहे. वंध्यत्व, गर्भपात किंवा जन्मदोष यांच्याशी या लसीचा कोणताही संबंध नसल्याचे तज्ञांनी स्पष्ट केले आहे.

समुद्रपूर तालुक्यातील पात्र मुलींनी प्राथमिक आरोग्य केंद्र कोरा, नंदोरी, मांडगाव, गिरड तसेच ग्रामीण रुग्णालय समुद्रपूर येथे जाऊन लसीकरण करून घ्यावे. अधिक माहितीसाठी जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी, आशा व अंगणवाडी सेविकांशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

# अनुवाद हे सांस्कृतिक देवाणघेवाणीचे माध्यम-प्रो. जी. गोपीनाथन

## ‘भारतीय भाषा, साहित्य व संस्कृतीचे महत्त्व आणि अनुवादाची भूमिका’ विषयावरील पुनश्चर्या कार्यक्रमाचे उद्घाटन

**वर्धा /जनमाध्यम**

अनुवाद हा केवळ भाषा व साहित्यापुरता मर्यादित नसून संस्कृतींच्या आदान-प्रदानाचे प्रभावी माध्यम आहे. संवादाच्या माध्यमातून संकटांचे निराकरण करण्यासाठी जागतिक स्तरावर अनुवाद महत्त्वाची भूमिका बजावतो. ते विश्वविद्यालयातील यूजीसी–मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या अंतर्गत आयोजित ‘भारतीय भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे महत्त्व तसेच अनुवादाची भूमिका’ या विषयावरील बारा दिवसीय पुनश्चर्या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू व प्रख्यात अनुवादक प्रो. जी. गोपीनाथन ऑनलाईन मार्गदर्शन करत होते. हा कार्यक्रम गालिब सभागृहात सुरू झाला असून विविध राज्यांतील शिक्षक त्यात सहभागी झाले आहेत.

प्रो. गोपीनाथन म्हणाले की भाषांमध्ये समन्वय निर्माण करण्यासाठी अनुवाद अत्यंत महत्त्वाचा आहे. आपल्या सांस्कृतिक परंपरेतील रामायण, महाभारत, भगवद्गीता आणि पंचतंत्र यांसारख्या ग्रंथांचे विविध भाषांमध्ये झालेले अनुवाद यामुळे हे ग्रंथ जगभर पोहोचले. रवींद्रनाथ टागोर, भास आणि विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्यकृतींच्या अनुवादामुळे विचार आणि संस्कृतींचा व्यापक आदान-प्रदान झाला आहे. वैज्ञानिक परिवर्तन घडवून आणण्यातही अनुवादाची मोठी भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. नवसर्जन, प्रेरणा आणि ज्ञान-विज्ञानाची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनुवाद हा महत्त्वाचा उपक्रम ठरला आहे. पत्रकारिता आणि चित्रपट यांसारख्या माध्यमांनाही अनुवादामुळे जागतिक पातळीवर पोहोच मिळाली आहे. हिंदी विश्वविद्यालयात अनुवाद अभ्यासाची सुरुवात करण्यात आली असून भारतात प्रथमच अनुवाद प्रौद्योगिकी विभाग सुरू करण्यात आला. देश-विदेशातील साहित्य जगभर पोहोचविण्याचा यामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.



अनुवाद क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत बोलताना ते म्हणाले की, जगभरात दुभाषी व्यक्तींची मोठी गरज आहे. पर्यटनासारख्या क्षेत्रात अनुवादकांची मोठी मागणी आहे. सध्या यंत्रमानवाधारित (मशीन) अनुवादावरही मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. जगातील विचारप्रवाह बदलण्यात तसेच जागतिक राजकीय संबंध सुधारण्यात अनुवाद महत्त्वाचे साधन ठरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यूजीसी–मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे निदेशक प्रो. अवधेश कुमार यांनी केले. त्यांनी बारा दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडत विविध विषयतज्ज्ञांच्या व्याख्यानांचा लाभ घेण्याचे आवाहन सहभागी शिक्षकांना केले. संचालन अनुवाद अध्ययन विभागाचे सहायक प्राध्यापक व कार्यक्रम समन्वयक डॉ. राम प्रकाश यादव तर भाषाविज्ञान विभागाचे अध्यक्ष व कार्यक्रम समन्वयक डॉ. एच. ए. हुनगुंद यांनी आभार मानले. यावेळी विश्वविद्यालयातील डॉ. शैलेश कदम, डॉ. राकेश सिंह फकलियाल, डॉ. वरुण कुमार उपाध्याय, डॉ. राम कृपाल, डॉ. आम्रपाल शेंदरे, डॉ. प्रदीप, डॉ. जगदीश नारायण तिवारी व विविध राज्यातील डॉ. धर्मेंद्र कुमार, संजय कुमार बिसेन, गणेश कुमार तुमडाम, नागेश्वर दास, डॉ. कैलाश नारायण मीना, डॉ. श्रुती कुमारी, डॉ. सरोज बाला श्याम, डॉ. सलोचना एच. ई., डॉ. दीपक महाजन, डॉ. सुनील कुमार मानस, डॉ. संतोष एस्केण, सुरेंद्र सिंह सस्तिया आदी उपस्थित होते. कार्यक्रमात जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांच्यासह संगीता मालवीय, राजेश आगरकर, हेमंत दुबे, मिथिलेश राय, विक्रांत, राम प्रवेश, जयश्री डफरे, रोहिणी गायकवाड आदींनी सहकार्य केले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १०७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# उष्णतेची तीव्रता वाढली; नागरिकांनी काळजी घ्यावी

## -आयुक्त सौम्या शर्मा व डॉ. विशाल काळे यांचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात मागील काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्णतेची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून दुपारच्या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असते. त्यामुळे दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असे प्रशासनाने सांगितले आहे. अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर जाणे टाळावे. जर बाहेर जाणे आवश्यक असेल तर डोके झाकण्यासाठी टोपी, कॅप, गॉगल किंवा ओढणीचा वापर करावा. तसेच हलक्या रंगाचे आणि सैल सूती कपडे परिधान केल्यास शरीरावर उष्णतेचा परिणाम कमी होण्यास मदत होते.



नागरिकांनी दिवसाभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास थकवा, चक्कर येणे, मळमळ, डोकेदुखी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे नियमित अंतराने पाणी पिणे, तसेच ओआरएस, लस्सी, ताक, लिंबूपाणी, नारळपाणी यांसारखे द्रव पदार्थ सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. मद्यपान, जास्त प्रमाणात चहा-कॉफी तसेच कार्बोनेटेड पेये यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते.

उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी, बांधकाम कामगारांनी तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी सावलीत विश्रांती घ्यावी. दीर्घकाळ थेट उन्हात काम करणे टाळावे. कामाच्या दरम्यान डोके व चेहरा ओल्या कापडाने झाकल्यास उष्णतेपासून काही प्रमाणात संरक्षण मिळू शकते. शक्य असल्यास सकाळी किंवा सायंकाळी काम करण्यास प्राधान्य द्यावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. अशा व्यक्तींना उष्णतेचा त्रास होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांना थेट उन्हात जाणे टाळावे. घरात थंड आणि हवेशीर वातावरण ठेवावे तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवण्यावर भर द्यावा.उष्माघाताची काही लक्षणे दिसल्यास त्वरित सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, उलटी, जास्त घाम येणे, अशक्तपणा किंवा बेशुद्धी जाणवत असल्यास त्याला त्वरित सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. त्या व्यक्तीचे कपडे सैल करावेत आणि शरीरावर थंड पाणी टाकून शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याला पाणी, ओआरएस किंवा इतर द्रव पदार्थ द्यावेत. परिस्थिती गंभीर वाटल्यास संबंधित व्यक्तीस तातडीने जवळच्या शासकीय किंवा खासगी आरोग्य केंद्रात दाखल करावे, जेणेकरून वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकतील. उष्णतेमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे आवश्यक आहे.शहरातील नागरिकांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी केले आहे.

# पोलीस शिपाई पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा आज

## -२४१ रिक्त जागेसाठी पदभरती

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलीस दला तर्फे पोलीस शिपाई संवर्गातील २१४ रिक्त पदाच्या भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार १५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता बडनेरा मार्गावरील राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी व राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट येथे आयोजित करण्यात आली आहे. पोलीस भरतीसाठी ११ ते २६ फेब्रुवारी दरम्यान उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली होती. यामध्ये एकूण रिक्त प्रवर्गनिहाय पदाकरिता एकूण २६३१ उमेदवार चाचणी उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये १७९१ पुरुष आणि ८४० महिला उमेदवार आहे. या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी होत आहे. उमेदवारांना रोल नंबर ,परीक्षा केंद्र ओळखपत्र ऑनलाइन पद्धतीने पाठविण्यात आले आहे. परीक्षेच्या दोन तास पूर्वी परीक्षा केंद्रावर हजर राहण्याबाबत कळविण्यात आले आहे. उमेदवारांच्या प्रवेश पत्राची पडताळणी करून बायोमेट्रिक तपासणे, परीक्षेचे खोली क्रमांक मिळविणे इत्यादी साठी वेळेवर हजर राहणे गरजेचे आहे. रविवारी सकाळी ८ वाजता उमेदवारांना केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास परीक्षे दरम्यान मोबाईल किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक वस्तू ठेवण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.



# महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केली नागपूरी गेट आणि पठाण चौक परिसराची स्वच्छतेची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** येत्या रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींवर लक्ष देत अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज विशेष पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी नागपूरी गेट आणि पठाण चौक परिसरातील स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधा यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

महापौरांनी सांगितले की, 'शहरातील गर्दी असलेल्या सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे अत्यंत गरजेचे आहे. येत्या रमजान ईदच्या दिवशी नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.'

महापौरांनी नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचा अभ्यास केला आणि संबंधित विभागांना त्वरित कारवाईचे आदेश दिले. विशेषतः कचरा व्यवस्थापन, ढिगाऱ्यांचे निवारण, सार्वजनिक शौचालये, आणि रस्त्यांवरील घाण यावर लक्ष केंद्रित केले गेले. पाहणी दरम्यान, महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी महानगरपालिका कर्मचाऱ्यांना स्वच्छतेसंबंधी उपाययोजना त्वरित राबविण्याचे निर्देश दिले. तसेच, त्यांनी सांगितले की, 'नगरातील नागरिकांनीही स्वच्छतेसाठी सहकार्य करावे, कारण स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची देखील जबाबदारी आहे.'



पाहणीच्या ठिकाणी उपस्थित नागरिकांनी महापौरांच्या या प्रयत्नांचे स्वागत केले. त्यांनी म्हटले की, 'महापौरांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित कारवाई करण्याचा निर्णय घेतल्याने शहरातील स्वच्छतेत सुधारणा होईल आणि येत्या ईदच्या सणाचा आनंद सुरक्षित वातावरणात साजरा करता येईल.' अमरावती महानगरपालिकेने या पाहणीचा संपूर्ण अहवाल तयार करून नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित उपाय राबविण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, शहरातील प्रमुख चौक आणि बाजारपेठांमध्ये नियमित स्वच्छता मोहीम चालवण्याचे ठरवले आहे, ज्यामुळे नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज सार्वजनिक जागा उपलब्ध होतील. या पाहणी दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, मनपा कर्मचारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)

**संपर्क - ९६०७५८२०९४**

# मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'सुकन्या समृद्धी' व 'आरडी' खाते उघडा

## -१६ मार्चपासून अमरावतीत विशेष मोहीम

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत सरकारच्या 'बेटी बचाव, बेटी पढाओ' आणि 'महिला सक्षमीकरण' अभियानांतर्गत अमरावती डाक विभागातर्फे १६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत सुकन्या समृद्धी खाते आणि 'आरडी खाते घरोघरी' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शून्य ते १० वर्षे वयोगटातील मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये बचतीची सवय रुजवण्यासाठी डाक विभाग विशेष पुढाकार घेत आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत, पालक आपल्या १० वर्षांपर्यंतच्या मुलीचे सुकन्या समृद्धी खाते कोणत्याही नजीकच्या डाकघरात किमान २५० रुपये भरून उघडू शकतात. या योजनेवर सध्या ८.२% असा आकर्षक व्याजदर मिळत असून, खाते उघडण्यासाठी मुलीचा जन्म दाखला, आधार कार्ड तसेच पालकांचे आधार कार्ड व पॅन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. याशिवाय, बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी किमान १०० रुपये भरून आवर्ती ठेव (आरडी) खातेही उघडता येणार आहे, ज्यावर ६.७% व्याजदर लागू आहे. या खात्यासाठी आधार आणि पॅन कार्ड आवश्यक असून सर्वसामान्यांनी याचा लाभ घ्यावा, असे सांगण्यात आले आहे.

या मोहिमेची व्याप्ती वाढवण्यासाठी डाक विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष शाळा, अंगणवाड्या आणि घरोघरी जाऊन जनजागृती करत आहेत. पालकांनी आपल्या मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुकन्या समृद्धी खाते उघडून एक भरीव पाऊल उचलावे आणि स्वतःसाठी बचतीची सवय लावण्यासाठी आरडी खात्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती विभागाचे प्रवर अधीक्षक डाकघर पि. ए. गेडाम यांनी केले आहे.

# नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती मार्डीकर यांचे महानगर चेंबरने केले अभिनंदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका स्थायी समेती सभापती करिता चौथ्यानंदा निर्वाचीत झाल्याबद्दल अविनाश मार्डीकर यांचे महानगर चेम्बर अध्यक्ष सुरेश जैन यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या शुभप्रसंगी अध्यक्ष सुरेश जैन यांनी चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अध्यक्ष सुरेश जैन यांनी शुभेच्छा देताना सांगितले की त्यांचा मागील तिन यशस्वी कार्यकाळ पाहून पक्षाने त्यांना आणखी एक संधी दिली . त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शहराच्या समस्यांबाबत बोलताना सुरेश जैन म्हणाले की, नेहरू मैदानाच्या भव्य प्रांगणात पारधींच्या अतिक्रमणामुळे तेथे अस्वच्छता वाढली असून मैदानात कचऱ्याचे ढीग जमा झाले आहे.



आणि त्यामुळे शहरात चोरीच्या घटना सुद्धा वाढल्या आहेत. त्यामुळे त्या मैदानावर सशुल्क पार्किंग मनपा ने सुरू करावी.त्यामुळे अतिक्रमणाची समस्या संपून शहराची पार्किंग व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होईल.

तसेच रेल्वे पूल बंद असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून त्यामुळे इर्विन चौकात नेहमीच वाहतुक जाम होत आहे. म्हणून पुलाचे काम तातडीने सुरू करावे हे सुचविले. शहरातील फेरीवाल्यांच्या वाढत्या अतिक्रमणामुळे शहरात वाहतूकीची कोंडी, अस्वच्छता, प्रदूषण, अपघाताचे प्रमाण व गुन्हेगारी मध्ये वाढ होत आहे. यावर तातडीने कार्यवाही करण्यास प्रशासनास सुचवावे.

अविनाश मार्डीकर यांनी शहरातील सर्व समस्या लक्षपूर्वक ऐकून घेतल्या व येणाऱ्या काळात नियमानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले. सभापतीनी सर्वांचे आभार मानले व कोणत्याही प्रकारची अडचण आली तर त्यासाठी सदैव तत्परतेने काम करणार असल्याचे आश्वासन त्यांनी महानगर चेंबर ला दिले.

यावेळी महानगर चेम्बर तर्फे अध्यक्ष सुरेश जैन, घनश्याम राठी, राजेंद्र भंसाली ,बकुल कक्कड, शरनपाल अरोरा,अनील नरेडी. सुरेद्र पोफली, रश्मी नावंदर. रंजन महाजन ,प्राध्यापक विधले उपस्थित होते.

## PUBLIC NOTICE

That through this notice I hereby informed to the public that I was being known as **Priti Ghanshyam Acharya** and now my name is updated as **Priti Mohit Chhangani** as per Gazzate issued for the period of 5th day of March 2026 to 11th day of March 2026. That Priti Ghanshyam Acharya and Priti Mohit Chhangani are one and the same and Priti Ghanshyam Acharya be recognized as Priti Mohit Chhangani for in future.

**Date:-14/03/2026**

**Place:- Amravati**

**Priti Mohit Chhangani**

# पत्रकारितेतील कार्यकुशल व्यक्तिमत्त्व हेमंत निखाडे

लोकशाहीचा चवथा आधारस्तंभ म्हणजे पत्रकारिता.मनात केवळ निःस्वार्थ भावनेने समाजासाठी काहीतरी करावं हा उद्देश ठेवून वर्ष २००५ पासून पत्रकारिता क्षेत्रात आलेले तिवसा तालुक्यातील निर्भीड,लोकप्रिय, नावलौकिक मिळविणारे पत्रकार म्हणजे हेमंत निखाडे होय.ते किती लिहतात यापेक्षाही त्यांच्यासाठी किती लिहावं,म्हणजे शब्द अपुरे पडतील,एवढं कार्यकुशल, प्रगतिशील व्यक्तिमत्त्व म्हणजे हेमंत निखाडे होय.अगदी जिद्द,चिकाटी व परिश्रमातुन त्यांनी साधलेली प्रगती ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.पत्रकारिता करीत असताना २० वर्षांपूर्वी सुद्धा त्यांचे पाय जमिनीवर होते आणि आज एवढं नावलौकिक मिळविल्यानंतरही त्यांचे पाय जमीनीवरच आहे,हे विशेष!त्यांच्याबद्दल सांगायचं झाल्यास ते २२ वर्षांपूर्वी सुद्धा वृत्तपत्र वितरण करीत होते आणि आजही वृत्तपत्र वितरण करून पत्रकारिता करतात.

वडिलांचं छत्र हरविल्यानंतर परिश्रमातुन प्रगतीकडे वाटचाल करीत असलेल्या हेमंतभाऊ यांच्या संघर्षमय जीवनासोबतच प्रगतीचा आलेख आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मांडला पाहिजे.जीवनात वर्ग दहावीची परीक्षा वर्ष २००० मध्ये होताच त्यांच्या वडिलांचं निधन झालं. बालवयातच वडिलांचं छत्र हरविल्यानंतर वडिलांचं सायकल रिपेअरिंग दुकान सांभाळण्याची एक जबाबदारी घेऊन त्यांनी खूप परिश्रम केले.परिवाराला हातभार लावला.तेव्हा ३-४ वर्ष त्यांनी सायकल दुकानात कष्ट करून वृत्तपत्र वितरण सुरू केले.लिखाणाची त्यांना खूप आवड होती. त्या आवडीला घेऊन त्यांनी तेव्हाच्या काळातील दैनिक जनमाध्यम, हिंदुस्तान या वृत्तपत्राचे एजंट व वार्ताहर म्हणून काम सुरू केले.म्हणतात ना की 'मेहनत करनेवाले की और कोशीस करनेवाले की कभी हार नहीं होती' नेमके याचप्रमाणे ते मेहनत करीत गेले आणि यशाने त्यांची साथ नाही सोडली.वृत्तपत्र वितरण हे त्यांच्या जीवनाचा आधारस्तंभ बनले ते आजही कायम आहे.अगदी ११अंक वृत्तपत्र वितरणापासून ते आज १००० वृत्तपत्र वितरण ते स्वतः तिवसा शहरात करून आपल्या कुटुंबाचा संसारगाडा चालवितात.

सन २००७ ते २०१५ पर्यत अमरावती शहरातील दैनिक मातृभूमी,हिंदुस्थान, जनमाध्यम या तीन वृत्तपत्रात त्यांनी उपसंपादक म्हणून काम केले.त्यादरम्यान व नंतर अभ्यासपूर्ण लिखाण करीत-करीत त्यांना सलग ६ वर्षे महाराष्ट्र शासनाच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेच्या व जलयुक्त शिवार योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी देण्यात येणारे जिल्हा व विभागस्तरावरील प्रतिष्ठेच्या पुरस्काराने त्यांचा सन्मान ही अभिमानास्पद बाब आहे.अतिशय कमी वयात पत्रकारितेत येणाऱ्या युवा व्यक्तिमत्वाने जिल्हा व विभागस्तरावरील पत्रकारितेत मानाचा तुरा रोवून केलेली वाटचाल ही प्रशंसनीय बाब आहे. त्यात हेमंतभाऊ यांनी तिवसा शहरात वृत्तपत्र वितरणासोबतच सामाजिक कार्याला सुद्धा जपले.त्यांच्यातील प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावगुणांनी वाचकांसोबत घरगुती संबंध निर्माण करून एक वेगळी ओळख बनविली.विविध सरकारी व खाजगी पुरस्काराने सन्मानित आहे म्हणून वृत्तपत्र वितरण सोडून द्यायचं,असं त्यांनी न करता जीवनात माणूस किती मोठा झाला,किती नावलौकिक मिळविले, यापेक्षा महत्वाचं आहे त्यांनी किती माणसं जोडली,किती लोकांच्या मनात आदराचं स्थान निर्माण केलं.

मीच नव्हे तर अख्ख्या तिवसा तालुक्यातील जनतेला हेमंतभाऊ व त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील प्रगतीचा प्रवास माहिती आहे.अशी एकही व्यक्ती नसेल की ती हेमंतभाऊ ला ओळखत नसेल.एक-दोन नव्हे तर आज ते तिवसा शहर व तालुक्यातुन ८ दैनिकाचे पत्रकार म्हणून काम पाहतात. यासोबतच आता त्यांचं तिसरं क्षेत्र हे बँकिंग आहे.वर्ष २०२५ मध्ये ते भारतीय स्टेट बँकेशी संलग्नित आलेल्या एसबीआय लाईफ या कंपनीशी जुळल्यानंतर त्यांनी अल्पावधीतच त्याही ठिकाणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावून प्रगती साधली.बँकॉक,थायलंड सारख्या देशात विमानाने जाणून विदेशवारी करण्याची संधीही त्यांना वृत्तपत्रामुळेच मिळाली.म्हणजेच पत्रकारिता ते बिझनेसमॅन आणि आता एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनीचे अडव्हायझर असे तीन क्षेत्रात त्यांनी केलेली प्रगती खरंच वाखाणण्याजोगी आहे.आजच्या युवा पत्रकारांनी त्यांच्या संघर्षाची, त्यांच्या प्रगतीचा आलेख दर्शविणारा लेख वाचून आदर्श घ्यावा,अश्या या कार्यकुशल व्यक्तिमत्वाचा ४२ वा वाढदिवस.यानिमित्ताने हेमंतभाऊ निखाडे यांच्या कार्याला सलाम करीत वाढदिवसाच्या अनंत कोटी शुभेच्छा..



**-तुझा मित्र-**
**राजेंद्र साबळे,गुरुकुंज मोझरी**

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार नामे **श्री. अनुप कृष्णराव चिटकेशवार,** राहणार बोराळे अपार्टमेंट समोर, देवदत्त नगर, अमरावती. ता. जि. अमरावती, पिन कोड : ४४४६०५ यानी **श्री. बापूराव तुकाराम मोंडे** याच्याशीं त्यांच्या मालकीच्या व ताब्यातील व त्यांनी दिनांक ११/०४/१९९६ रोजी दस्त क्रं. ९१८/१९९६ नुसार खरेदीखताने खरेदी केलेली स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे.

**स्थावर मालमत्तेचे (शेतजमीनचे) वर्णन :-** नोंदणी तुकडी व पोट तुकडी मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती कचेरीचे कक्षेतील व अमरावती जि.प.चे हद्दीतील मौजे विचोरी ता. मोर्शी व जि. अमरावती व ग्राम पंचायत वीचोरी येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.३१, भो. वर्ग-१, खाते क्र. ६१२, आकारणी रु.५.४८ पै., एकूण क्षेत्रफळ ४ हे. १३ आर यापैकी खरेदी देणार यांनी खरेदी केलेली व त्यांच्या मालकीची व ताब्यातील मधांतरीची शेतजमीन याचे एकूण क्षेत्रफळ ० हे. ९१ आर यापैकी उत्तर दक्षिण वाटणीचा पश्चिमेकडील कोरडवाहू शेतजमीनीचा भाग याचे क्षेत्रफळ ० हे. ४५ आर आहे व यातील झाडाझुडपांसह व तदंगभूत वस्तूंसह, सदर शेतजमिनीची चर्तुःसीमा पूर्वेस याच शेताचा श्री. बापूराव तुकाराम मोडे यांच्या मालकीचा उर्वरित भाग, पश्चिमेस वांगे यांचे शेत, उत्तरेसः आनंद कीर्तकार यांचे शेत, दक्षिणेस सुधाकर गोंडेकर यांचे शेत. या शेताचा वहिवाटीचा रस्ता हा पूर्वेकडील पंजाबराव तरारे व बापूराव तुकाराम मोंडे यांच्या शेतातून राहील.

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी व्यवहार, वारसाहक्क व इतर अधिकार जे कादेशीररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत / तक्रार नाही अशे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर /अधिकार / हक्क / तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी,

करीता हि नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण : अमरावती**

**दिनांक : १४/०३/२०२६**

**ॲडव्होकेट निलेश ज पुंड,**
१०२ गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी
अर्जुन नगर, अमरावती, मो. नं. ८४२१७२२१११

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १८६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

प्रोसेस क्र. १२४८ /२०२६

## जाहीर नोटीस

### अमरावती येथील विद्यमान तदर्थ
### जिल्हा व सत्र न्यायाधिश-०२, यांचे न्यायालय

M.A.C.P No. १४२/२०२५ F.F. ०८/०५/२०२६

**पिटीशनर :- सतीश मोतीराम आंबेकर**

**विरुध्द**

**रिस्पॉडंट :- लता काशिनाथराव जवंजाळ व इतर**
**गैरअर्जदार : लता काशिनाथराव जवंजाळ**
**रा. येवदा, ता. दर्यापुर, जि. अमरावती**

**APPLICATION U/SEC. 166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील **पिटीशनर सतीश मोतीराम आंबेकर,** यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय -०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील **गैरअर्जदार लता काशिनाथ जवंजाळ,** यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश ०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक : ०९/०३/२०२८

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधिक्षक (न्यायीक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती**

प्रोसेस क्र. १२५२ /२०२६

## जाहीर नोटीस

### अमरावती येथील विद्यमान तदर्थ
### जिल्हा व सत्र न्यायाधिश-०२, यांचे न्यायालय

M.A.C.P No. ३२८/२०२५ F.F. ०६/०५/२०२६

**पिटीशनर :-नितीन सुधाकर राजुत व इतर**

**विरुध्द**

**रिस्पॉडंट :- दिनेश किशनचंद मंगवाणी व इतर**
**Non-applicant :-Dinesh Kishanchand Mangwani, R/o. Sindhi Camp, Navi Vasti, Badnera, Amravati Tq. Dist. Amravati**

**APPLICATION U/SEC. 166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील **पिटीशनर नितीन सुधाकर राजुत व इतर,** यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय -०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील **गैरअर्जदार दिनेश किशनचंद मंगवाणी,** यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश ०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक : ०९/०३/२०२८

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधिक्षक (न्यायीक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती**

प्रोसेस क्र. १२४७ /२०२६

## जाहीर नोटीस

### अमरावती येथील विद्यमान तदर्थ
### जिल्हा व सत्र न्यायाधिश-०२, यांचे न्यायालय

M.A.C.P No. ६१/२०२५ F.F. ०६/०५/२०२६

**पिटीशनर :- बलकराम तिरीसा नरे व इतर**

**विरुध्द**

**रिस्पॉडंट :- सचीन नाटुलाल नरे व इतर**
**Non-applicant :- Sachin Rattulal Narre**
**R/o. Akshay Thorat's House, Mahuli Jahangir, Tq. Dist. Amravati**

**APPLICATION U/SEC. 166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील **पिटीशनर बलकराम तिरीसा नरे व इतर,** यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय -०२, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील **गैरअर्जदार सचीन राटुलाल नरे,** यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश ०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक : ०९/०३/२०२८

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधिक्षक (न्यायीक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती**

## संक्षिप्त

### 'क्रांतीसूर्य बिरसा मुंडा प्रवेशद्वार' उभारण्याची मागणी

**अमरावती-** थोर आदिवासी स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक



क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या गौरवार्थ नांदगाव खंडेश्वर शहरात 'प्रवेशद्वार कमान' उभारण्यात यावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका प्रांजली राहुल गुल्हाने यांनी नगर पंचायतीकडे केली आहे. यासंदर्भात आगामी सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करून कामाला गती देण्याची विनंती त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या स्मृती कायम जतन व्हाव्यात आणि येणाऱ्या पिढीला त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने प्रभाग क्र. १४ मधील मुख्य रस्त्यावरील पुलाजवळ हे भव्य 'बिरसा मुंडा प्रवेशद्वार' उभारण्यात यावे, अशी भूमिका प्रांजली गुल्हाने यांनी मांडली आहे.



### बालविवाह प्रतिबंधक उद्बोधन कार्यशाळा

**अमरावती-**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जांबु येथे बालविवाह प्रतिबंधक उद्बोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी सज्जुलाल पटे, पोलिस पाटील जांबू तर प्रमुख अतिथी म्हणुन ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त शिक्षक मुंगीलाल पाटील, राम धिकार, गणाजी भिलावेकर, मोतीराम भिलावेकर, आर. डी.घवळे मुख्याध्यापक उपस्थित होते. सर्वप्रथम बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यशाळेला सुरवात करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांनी उद्बोधन कार्यशाळेला मार्गदर्शन केले.प्रास्ताविक मुख्याध्यापक रवी घवळे संचलन हिराजी बेठेकर यांनी केले. शेवटी अर्चना बैतुले यांनी बालविवाह प्रतिबंधक उद्बोधन निमित्त सर्वांना शपथ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आभार प्रदर्शन दीपावली पानवे, विषय शिक्षिका यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता शाळेतील सर्व शिक्षक वृंद,आरोग्य सेविका कासदेकर, आरोग्य सेवक जावरकर, अंगणवाडी सेविका अनिता, काळे, मदतनीस कासदेकर, सावलकर, आशा वर्क, ममता आदींनी सहकार्य केले. गावकरी, पदाधिकारी, सदस्य, कर्मचारी, युवक युवती, वर्ग ६ ते ८ चे शालेय विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

### सृजन साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. मंदा नांदुरकर

**अमरावती-** 'सृजन साहित्य संघ' मूर्तिजापूर यांचे दहावे राज्यस्तरीय



एक दिवसीय साहित्य संमेलन रविवार, दि.२२ मार्च रोजी भगवंत लॉन हॉल, गोयनका नगर, मूर्तिजापूर येथे संपन्न होत आहे. सृजन साहित्य संघाचे अध्यक्ष रवींद्र जवादे, प्रमोद पंत यांच्यासह कार्यकारिणी सदस्य व अनेक साहित्यिक यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून सदर बैठकीत संमेलनाध्यक्ष म्हणून अमरावतीच्या डॉ. मंदा नांदुरकर याच्या नावावर शिक्कामोर्तब होऊन एकमताने हा निर्णय घेण्यात आला आहे. डॉ. मंदा नांदुरकर ह्या मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथे मराठी विभाग प्रमुख असून त्या सुप्रसिध्द लेखिका, कवयित्री व बालसाहित्यिक सुध्दा आहेत. त्या आचार्य पदवीच्या मार्गदर्शक असून उत्तम वक्ता व उत्कृष्ट निवेदिका म्हणून प्रख्यात आहेत. आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य व बोली यांच्या अभ्यासक व संशोधक आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलन दिल्ली येथे त्यांचा निमंत्रित कवयित्री म्हणून सहभाग राहिलेला आहे. अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचे अनेक शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. साऊथ सेवूल , दक्षिण कोरिया येथे आदिवासी आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता अध्यक्ष म्हणून सन्मानित झालेल्या आहेत. आजवर त्यांनी विविध ग्रंथ प्रकाशित केले असून अनेक ग्रंथ संपादित सुध्दा केले आहेत. त्यांचा 'फुलकई' हा आदिवासी बालकाव्यसंग्रह प्रकाशित असून त्याला विविध साहित्य संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहे. याच फुलकई काव्यसंग्रहातील 'किल्ला' ही कविता इयत्ता सातवीला अभ्यासक्रमात आहे. ग्रंथसंपदा, मातोश्री विमलाबाई ग्रंथ कथासंपदा, दादा (दादासाहेब काळमेघ ) गौरव ग्रंथ, बिंब - प्रतिबिंब (बाळासाहेब मराठे गौरवग्रंथ), हुंकार काळोखाचे-काव्यसंग्रह, अध्यक्षीय भाषणे, जागर स्वातंत्र्याचा इत्यादी ग्रंथ संपादित आहेत.

# मोसिकॉल कारखान्याची जमीन विक्रीचा प्रस्ताव रद्द

## अमरावतीच्या विकासासाठी सकारात्मक निर्णय; आ.संजय खोडके यांचे अभिनंदन

**अमरावती/का.प्र.**

येथील मोसिकॉल कारखान्याची सुमारे २४ एकर जमीन विक्रीस काढण्याचा शासनाचा प्रस्ताव रद्द करण्यात आल्याची घोषणा राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली आहे. या निर्णयाचे अमरावतीतील नागरिकांनी तसेच विविध सामाजिक संघटनांनी स्वागत केले आहे.या संदर्भात विधान परिषदेचे सदस्य संजय खोडके यांनी विधान परिषदेत लक्षवेधीद्वारे हा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या पुढाकारामुळे अमरावतीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची भावना व्यक्त होत असून त्यांच्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

मोसिकॉल कारखान्याची जमीन विक्रीस काढण्याचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून चर्चेत होता. या पार्श्वभूमीवर कारखाना वाचवण्यासाठी तसेच अमरावती जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने मोसिकॉल तेल बियाणे कर्मचारी संघटनेने १९८८ ते २०१० या कालावधीत विविध आंदोलनांच्या माध्यमातून दीर्घकालीन संघर्ष केला होता. त्या काळात मोर्चे, साखळी उपोषणे, आमरण उपोषण तसेच न्यायालयीन लढ्यांद्वारे कारखाना सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.त्या वेळी मोसिकॉल च्या प्रश्नांवर अमरावतीचे तत्कालीन आमदार सुदामकाका देशमुख,डॉ. देवीसिंह शेखावत, वसुधाताई देशमुख, डॉ. सुनील देशमुख, जगदीश गुप्ता, प्रदीप वडनेरे, रावसाहेब शेखावत, राजीव सातव यांनी विधानसभेत या विषयावर आवाज उठवून कारखाना टिकविण्यासाठी प्रयत्न केले. या प्रयत्नांमुळे काही काळ कारखान्याचे कामकाज सुरू राहिले; मात्र पुढे ते कायमस्वरूपी सुरू ठेवणे शक्य झाले नाही.

कारखाना सतत तोट्यात असल्याचे कारण देत शासनाने १९९२ मध्ये त्याचे व्यवस्थापन कापूस पणन महासंघाकडे सोपविले. पुढील काही वर्षांत कारखाना नफ्यात देखील आला होता; तथापि, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्याचे कामकाज सुरळीतपणे चालू राहू शकले नाही. अखेर २०१० मध्ये आमदार रावसाहेब शेखावत



यांच्या पुढाकाराने कॅबिनेट निर्णयानुसार कामगारांना ऐच्छिक सेवानिवृत्ती देऊन मार्च २०१० मध्ये कारखाना कायमस्वरूपी बंद करण्यात आला.या कारखान्यात सरकीपासून तेल निर्मिती, सोयाबीन तेल गाळप, रिफायनरी तसेच जिनिंग-प्रेसिंगद्वारे कापसाच्या गाठी तयार करण्याचे मोठ्या प्रमाणावर औद्योगिक कामकाज चालत होते. तीन शिफ्टमध्ये जिनिंग-प्रेसिंगमधील कामगार, हमाल, स्थानिक मजूर आणि कायमस्वरूपी कर्मचारी मिळून सुमारे ८०० ते १००० जणांना येथे रोजगार मिळत होता. कारखाना बंद झाल्यानंतर अनेक कुटुंबांवर बेरोजगारीचे संकट ओढवले.

मोसिकॉलची ही जमीन अमरावती शहराच्या मध्यभागी असल्यामुळे तिचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. या ठिकाणी शासकीय कार्यालये,मोठी बाजारपेठ, औद्योगिक प्रकल्प किंवा शैक्षणिक संकुल उभारल्यास शहराच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते.अमरावतीचे माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांनी देखील ही जमीन सार्वजनिक आणि शासकीय उपयोगासाठी राखून ठेवावी अशी मागणी सातत्याने केली आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्राचा वेगाने विस्तार होत असल्याने या जागेचा विकासात्मक प्रकल्पांसाठी उपयोग करणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.शासनाने जमीन विक्रीचा प्रस्ताव रद्द केल्याने अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी नवी संधी निर्माण झाली आहे. या ठिकाणी रोजगारनिर्मिती आणि सार्वजनिक हिताचे प्रकल्प उभारण्यासाठी पुढील काळात सकारात्मक निर्णय व्हावेत अशी अपेक्षा कामगार नेते संतोष देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

# शिक्षणामुळे स्त्रीला आत्मभान प्राप्त-डॉ.दया पांडे

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णयक्षमता विकसित होते. शिक्षणामुळे महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात आपले स्थान निर्माण करता येते तसेच कुटुंब व समाजाच्या प्रगतीत त्यांचा सक्रिय सहभाग वाढतो. डिजिटल युगात महिलांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून नव्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. दया पांडे यांनी केले.

परतवाडा येथील स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'शिक्षणामुळे होणारे महिलांचे सबलीकरण' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते, तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. दया पांडे (समाजशास्त्र विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, अमरावती) उपस्थित होत्या. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम समिती प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. सतीश भागवत आणि डॉ. दयाश्री कोकाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, महिला कक्ष व तक्रार निवारण समितीच्या वतीने करण्यात आले.प्रमुख वक्त्या डॉ. दया पांडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख व महिला कक्ष प्रमुख डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत महाविद्यालयामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. दया पांडे, डॉ. अनिल खांडेकर, प्रा. डॉ. प्रमोद गारोडे आणि डॉ. सतीश भागवत यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व बक्षिसांचे वितरण करण्यात आले.संचालन डॉ. शीतल काळे तर आभार प्रदर्शन डॉ. शालिनी वैष्णव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला कक्ष व तक्रार निवारण समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारीवर्ग तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गॅस दरवाढीने गृहिणींचे बजेट कोलमडले

### तहसीलदाराला दिले मागणीचे निवेदन

**अमरावती/का.प्र.**

केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत केलेल्या भरमसाठ वाढीविरोधात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने स्थानिक तहसीलदारांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका प्रांजली राहुल गुल्हाने यांच्या नेतृत्वाखाली ही निदर्शने करण्यात आली.

सध्या सर्वसामान्य जनता महागाईच्या ओझ्याखाली दबलेली असताना केंद्र सरकारने गॅसच्या किमती पुन्हा वाढवून जनतेची फसवणूक केली आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला. 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवणाऱ्या सरकारने घरगुती गॅसचे दर गगनाला भिडवल्याने गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे जगणे कठीण झाले आहे.यावेळी बोलताना नगरसेविका प्रांजली



गुल्हाने म्हणाल्या की,'केंद्र सरकारने ही अन्यायकारक दरवाढ मागे न घेतल्यास आगामी काळात जनतेच्या हितासाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल.' यावेळी नंदकुमार रावेकर शुभम चौधरी, आर.बिजवे, राजू गुल्हाने, विनोद रावेकर, प्रभु भोयर, इम्रान खान, साहेब खान, जावेद खान, सलाम खान, शारिक खान, साबीर कुरेशी, फिरोज खान, अकरम, तन्वीर, जुनैद खान, माजिद खान, रिझवान, शारिक, मनसब खा, साकीब, सलमान कुरेशी, शाहरुख खान, शोयब रझा, अमिन कुरेशी, अनिस कुरेशी, उपस्थित होते.

## तळेगाव दाभेरी येथे 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग'

**लेहेगाव/वार्ताहर**

देशाचा कणा असलेल्या शेतकऱ्यांवर दिवसेंदिवस वाढत चाललेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या वेदनेशी एकात्मता व्यक्त करण्यासाठी 'अन्नदाता साठी अन्नत्याग' हा अनोखा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम १९ मार्च २०२६ रोजी मोर्शी तालुक्यातील हनुमान मंदिर, तळेगाव दाभेरी येथे पार पडणार आहे.

शेतकरी हा देशाचा अन्नदाता असला तरी आज तो आर्थिक संकट, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला न मिळणारा योग्य दर आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांच्या या वेदनांकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच त्यांच्या संघर्षाला नैतिक पाठिंबा देण्यासाठी हा अन्नत्याग आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.या दिवशी सहभागी नागरिक अन्नत्याग करून शेतकऱ्यांप्रती संवेदना व्यक्त करणार असून शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणीही या माध्यमातून करण्यात येणार आहे.

या उपक्रमात परिसरातील शेतकरी, नागरिक, युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अरुण कोहळे, संजय तट्टे, सचीन ठोके,मुरलीधर डहाने, रघुपती लबडे, सदीप रोडे, सचीन चरपे, सदीप भदाडे, रामदास चांगोले, सुधीर राऊत, श्रीकांत यावले, गोपी केळकर, भगवंत गजभीये, शाम वानखडे, विजय सिरसाम, मिलींद हेडाऊ, नंदकिशोर तिडके, ज्ञानेश्वर तिडके, अनील लांडे, अंकुश काळमेघ, नितीन कोहळे, सचिन उघडे, प्रितेश दळवी, प्रफुल्ल चिखले, मंगेश बोराळकर, संदिप खडागडे, प्रियदर्शन पुंड, मयुर राऊत,शंकरराव दळवी, सुनील झाडे, गणेश डरंगे, पुरुषोत्तम ठाकरे, राजेश दळवी, राहुल बायस्कर,वामनराव कुचे, किशोर ठाकरे, पंकज ठाकरे, किसनराव हिवसे, प्रशांत साबळे, प्रमोद कुचे, नंदू ठाकरे, विनायक ठाकरे, ज्ञानेश्वर साबळे, पिंटू ठाकरे, गजानन साबळे, मनोज साबळे, सुधीर सावरकर यांनी केले आहे.

## 'उल्लास' साक्षरता अभियानाची परीक्षा आता २९ मार्चला

**अमरावती-** केंद्र शासन पुरस्कृत 'उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत जिल्ह्यात होणारी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षेच्या नियोजनात बदल करण्यात आला आहे. १५ मार्च रोजी होणारी ही परीक्षा आता रविवार,२९ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत घेतली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.जिल्ह्यात या मोहिमेअंतर्गत असाक्षरांची नोंदणी आणि पोर्टलवर त्यांचे टॅगींग करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. हे तांत्रिक काम पूर्ण करण्यासाठी आणि साक्षरता वर्गातील उमेदवारांना परीक्षेसाठी अधिक वेळ मिळावा, या उद्देशाने राज्यस्तरावरून परीक्षेचा दिनांक पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.प्रलंबित असलेले नोंदणी व टॅगींगचे काम तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. तसेच, साक्षरता वर्ग नियमितपणे सुरू ठेवून शिक्षकांनी या वर्गांना भेटी द्याव्यात आणि उमेदवारांकडून प्रश्नपत्रिकांचा सराव करून घ्यावा, असेही सांगण्यात आले.

## सिलिंडर टंचाईचा परिणामी माध्यान्ह भोजन योजनेवर

### शिक्षक समितीचे शिक्षण संचालनालयाकडे पत्र

**अमरावती/का.प्र.**

युद्धामुळे एलपीजी बाबतची संभाव्य परिस्थिती लक्षात घेता घरगुती वापरावयाच्या एलपीजी सिलिंडरची नोंदणी करण्याच्या नियमात बदल झाले आहेत.

शालेय माध्यान्ह भोजन आहार (शा.पो.आ.) योजनेंतर्गत ग्रामीण भागातील शाळांत अन्न शिजविल्या जाते. मागील काही वर्षात शाळांना एलपीजी सुविधा देताना एक सिलिंडर उपलब्ध करून दिले आहे. ही अडचण दुर करुन उपाय योजना करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांना राज्याचे शालेय शिक्षण संचालक शरद गोसावी यांना निवेदना व्दारे केली आहे. सध्या मार्च महिना सुरू असून पुढे आणखी दीड महिना शाळा आहे. दररोज विद्यार्थ्यांना शाळेत पोषण आहार शिजवून दिल्या जात आहे.मध्य-पूर्व पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी सिलेंडरची नोंदणी करण्याच्या नियमात झालेल्या बदलामुळे ४५ दिवस नोंदणी करता येणार नाही. शाळांमध्ये जेव्हापासून एलपीजी सुविधा मिळाली तेव्हापासून सर्पणाचा वापर बंद झाल्याने आणि त्यासाठी कोणतेही अनुदानही नसल्याने शाळेला सर्पण मिळणे शक्य नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना अंतर्गत आहार शिजवण्यासाठी सिलिंडर उपलब्ध न होण्याच्या स्थितीत आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. जर संबंधित पुरवठादार कंपन्यांना शाळांसाठी सिलेंडर नोंदणी संदर्भात वेगळे योग्य आदेश दिले तर शाळांना दिलासा मिळेल. तरी तातडीने या बाबत कार्यवाही करावी अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कडून विनंती शासनाला करण्यात आली आहे.अशी माहीती शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# अंबादेवी परिसरातील प्रागैतिहासिक चित्रे सुमारे ३५,००० वर्षे जुनी



**अमरावती/का.प्र.**

सातपुडा पर्वतराजीतील तापी खो-यातील महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवरील अंबादेवी शैलाशय परिसरात २००७ मध्ये अमरावती येथील सहा निसर्ग संशोधकांनी प्राचीन शैलाश्रय सर्व प्रथम शोधली होती. ही गुहाचित्रे प्रागैतिहासिक असून सुमारे ३५,००० वर्षे जुनी असू शकतात, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष नव्या संशोधनातून समोर आला आहे. मंगुसादेव शैलाश्रयातील प्राण्यांच्या चित्रांचा सखोल अभ्यास करताना संशोधकांना एका मोठ्या, लांब मानेच्या धावत्या पक्ष्याचे चित्र आढळले, जे शहामृगाशी अत्यंत साधर्म्य दर्शवते.

स्वतंत्र जनुकीय (DNA) आणि कार्बन-१४ चाचण्यांद्वारे भारतात सुमारे २४,००० ते ४२,००० वर्षांपूर्वी शहामृग अस्तित्वात होते, हे आधीच सिद्ध झाले आहे आणि त्या संदर्भात यावर या चमूचे कर्णधार संशोधक डॉ व्हि.टी. इंगोले यांचा शोध निबंध यापूर्वीच प्रसिध्द झाला आहे. त्यामुळे मंगुसादेव येथील शहामृगसदृश चित्र त्या काळातील प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारित असण्याची शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे. या चित्रगुहेत शिवाथेरियमसारखा (Shivatherium) जिराफवंशीय प्राणी, लांब तोंडाचा कीटकभक्षी (Aardwark) इत्यादी नामशेष प्राणी, तसेच भारतीय गेंडा (Rhinoceros unicornis), यांचीही चित्रे आढळतात. ही सर्व चित्रे एकाच शैलीत रेखाटलेली असून त्यावर नंतरचे रंगकाम किंवा बदल दिसत नाहीत, यामुळे ती एकाच कालखंडातील असावीत असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या संशोधनाच्या निष्कर्षांवर आधारित सविस्तर शोधनिबंध लवकरच प्रकाशित होणार असून, त्यामध्ये सर्व पुरावे, विश्लेषण आणि वैज्ञानिक संदर्भ विस्तृतपणे मांडलेली आहेत.

प्रत्यक्ष रंगद्रव्यांच्या वैज्ञानिक




चाचण्या अद्याप बाकी असल्या तरी उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अंबादेवी परिसरातील ही चित्रे भारतातील आजवर ओळखली गेलेली सर्वांत प्राचीन गुहाचित्रे असू शकतात. तसेच अश्मयुगीन आदी मानवाची ही ४० हजार वर्षांपूर्वीची भारतातील सर्वात मोठी वसाहत असू शकते,अशी शक्यता मूळ शोधकर्ते संशोधक डॉ. व्ही. टी. इंगोले, प्र. सु. हिरुरकर, पद्माकर लाड, डॉ. मनोहर खोडे, शिरीष कुमार पाटील यांनी व्यक्त केली आहे.दुर्दैवाची बाब म्हणजे हा महत्त्वाचा शोध जवळपास १९ वर्षांपूर्वी लागूनही आजपर्यंत त्याला अपेक्षित शासकीय महत्त्व मिळालेले नाही. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने (ASI) या स्थळाचा गांभीर्याने विचार करून युनेस्को जागतिक वारसा दर्जासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

### नव्या संशोधनातून संकेत



अंबादेवी परिसर महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या सीमेवर असल्यामुळे दोन्ही राज्यांच्या प्रशासनाकडूनही या स्थळाच्या विकासाकडे अपेक्षित लक्ष दिले गेलेले दिसत नाही. संशोधक व पर्यटकांसाठी येथे मूलभूत सुविधा, माहिती केंद्र किंवा मार्गदर्शन व्यवस्था उपलब्ध नाहीत.अमरावती विद्यापीठात या संशोधनावर आधारित संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव देखील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रस्ताव प्रत्यक्षात आला तर या प्रदेशाचा प्रागैतिहासिक वारसा जगासमोर मांडण्यास मोठी चालना मिळेल.अंबादेवीचे हे शैलचित्र केवळ अमरावती, विदर्भ किंवा महाराष्ट्राचा अभिमान नाहीत; ते भारताच्या सांस्कृतिक आणि पुरातत्त्वीय वारशाचा अमूल्य ठेवा आहेत. त्यामुळे या स्थळाचे संवर्धन, संशोधन आणि पर्यटनदृष्ट्या विकास करणे ही आता अत्यंत तातडीची गरज आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# ‘एमडी’ची तस्करी पुन्हा उघड

## मुंबईहून आलेला पुरवठादारसह दोघे ताब्यात





**अमरावती/ प्रतिनिधीः**-शहरात अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत ‘एमडी’ (मेफेड्रोन) या घातक अमली पदार्थासह दोन जणांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ७६ ग्रॅम एमडी जप्त केला असून त्याची बाजारमूल्य अंदाजे ११ लाख ४० हजार रुपये इतकी असल्याची माहिती आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाला १४ मार्च रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, मुंबई येथून एक व्यक्ती अमरावतीत एमडी हा अंमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार असल्याचे समजले. या माहितीची खात्री करून पोलिसांनी बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवी वस्ती परिसरातील सर्किट हाऊसजवळ सापळा रचला. या सापळ्यात पोलिसांनी दोन संशयितांना पकडले. अटकेत घेतलेल्यांमध्ये मोहम्मद रफीक मोहम्मद सलीम (वय ४२, रा. अंधेरी वेस्ट, मुंबई) आणि सोहेल खान फिरोज खान (वय २६, रा. छाया नगर, अमरावती) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींची झडती घेतली असता मोहम्मद ☞(पान २ वर)

# बहिणीच्या विरहात गेला भावाचा जीव

### अंत्यसंस्कारा नंतर आला हार्ट अटॅक



**अकोला/ प्रतिनिधीः**- जिल्ह्यातील साखरखेर्डा गावातील शशिकला रामकृष्ण सुरळकर यांचे बुधवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यानंतर गुरुवारी दुपारी त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. अंतिम संस्कारासाठी सर्व लोक एकत्र आले होते. अंत्यसंस्कार झाल्यावर सर्व मंडळी घरी परत आली असता शशिकला सुरळकर यांचे धाकटे भाऊ राम नामदेव ढोबळे ( यवतमाळ ) यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचाही मृत्यू झाला. एकाच वेळी भाऊ आणि बहिणीच्या मृत्यूमुळे सुरळकर आणि ढोबळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

माहितीनुसार साखरखेर्डा निवासी शशिकला रामकृष्ण सुरडकर यांचा बुधवारच्या रात्री हृदयविकाराने मृत्यू झाला. गुरुवारी त्यांच्यावर रोकडोबा हनुमान मंदिर मागील हिंदू सम्शानभूमी मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले. अंतिम संस्कार केल्यानंतर सर्व मंडळी घरी पोहोचल्यावर त्यांचे भाऊ राम ढोबळे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने डॉ.मगर यांच्याकडे उपचारासाठी नेले असता त्यांना मृत घोषित केले. बहिणी पाठोपाठ भावाने सुद्धा जगाचा निरोप घेतल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ☞(पान २ वर)

# पत्नीला माहिती देऊन पतीची आत्महत्या

### चिचफैल परिसरातील घटना



**अमरावती/ प्रतिनिधीः**- पत्नीला सांगून पतीने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिचफैल परिसरात घडली. प्रितम किशोर शिवणकर (वय ४२, रा. चिचफैल) असे मृताचे नाव आहे. पोलिस सुत्रानुसार, प्रितम हा दारु पिण्याच्या सवयीचा होता. त्यामुळे त्याचे व पत्नीचे दारु पिण्याच्या कारणावरून वाद झाले होते. दरम्यान १३ मार्च रोजी ☞(पान २ वर)

# गोवंश वाहतूक करणाऱ्या ट्रकची धडक; चालकासह १० बैलांचा मृत्यू




**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावर शनिवारी पहाटे भीषण अपघात होऊन एका ट्रक चालकासह १० बैलांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकला मागून भरधाव वेगात येणाऱ्या गोवंश वाहतूक करणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. ही घटना सकाळी सुमारे ६ वाजता धानोली-मेघे परिसरात घडली. मृत चालकाचे नाव दिनेश दादाराव गव्हाणे (वय २९, रा. मंगरूळपीर, जि. वाशिम) असे आहे.

माहितीनुसार, आर.जे. ०२ जी.बी. ६३३ क्रमांकाचा ट्रक पुढील लेनने मुंबईकडे जात होता. त्याच्या मागून एम.एच. ३७ टी. ४५८७ क्रमांकाचा गोवंश वाहतूक ट्रक वेगात येत होता. निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याने चालकाचे नियंत्रण सुटून त्याने समोरील ट्रकला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की समोरील ट्रकचे टायर फुटले, ☞(पान २ वर)

# पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या

**अमरावती/ प्रतिनिधीः**- पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी उघडकीस आली. मोहित चावला असे मृताचे नाव आहे.

५० वर्षीय महिलेच्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा मोहितने त्याच्या पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी आरोपी पत्नी (रा. चौकसेनगर, भोपाळ, मध्यप्रदेश) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# संजिता महापात्र होणार प्रभारी मनपा आयुक्त



**अमरावती/ प्रतिनिधीः**- महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा येणाऱ्या काही दिवसात मॅटरनिटी लिव्ह वर जाणार आहे. त्यांच्या जागी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्रा यांना अमरावती मनपाचे प्रभारी आयुक्त म्हणून नियुक्त केले जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. मुंबईमध्ये सुरू अर्थसंकल्पीय अधिवेशन २६ मार्च च्या जवळपास समाप्त होणार आहे. यानंतर मनपा आयुक्त पदावर नियुक्तीसाठी फेरबदल करण्यात येणार असल्याचे दिसते. माहितीनुसार मुंबईमध्ये राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. तसेच १७ मार्च रोजी महानगरपालिकेची आमसभा आयोजित करण्यात आली आहे. मनपा आमसभा आणि अधिवेशन संपण्यापर्यंत मनपाची ☞(पान २ वर)

### ‘राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धा - डिपेक्स २०२६’

# सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रथम व द्वितीय पुरस्कार




**अमरावती/ प्रतिनिधीः**- एम आय टी विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, येथे आयोजित राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धा - डिपेक्स २०२६ मध्ये सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक अर्जित केले आहे.ह्यापूर्वीही सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय डिपेक्स स्पर्धेमध्ये सातत्याने उत्स्फूर्तपणे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाव्दारे सहभागी होते. प्रथम पुरस्कार हा तृतीय आणि द्वितीय वर्षाच्या संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या प्रीत ☞(पान २ वर)

# शेतकऱ्यांना पिकांचा योग्य मोबदला मिळवून देणार

### राष्ट्रवादी किसान सभेचे अध्यक्ष ॲड. मानकर यांचा दावा



**अमरावती/ प्रतिनिधीः**- राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या शेतकरी सभेचे प्रदेशाध्यक्ष एड. वसंत मानकर हे विदर्भ दौऱ्यावर आले आहे. या दरम्यान त्यांनी आज शनिवार १४ मार्च रोजी शहरातील पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की ☞(पान २ वर)




# चहा टपरीचे कुलूप तोडून सिलेंडर आणि भांडे लंपास

### -खापर्डे बगीचा परिसरातील घटना




**अमरावती/ प्रतिनिधीः**- कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या खापर्डे बगीचा येथील आदर्श विद्यालय जवळील एका चहा टपरीचे कुलूप तोडून तेथून गॅस सिलेंडर आणि पितळीचे भांडेसह हजारोचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. ही घटना आज शनिवार १४ मार्च रोजी सकाळी समोर आली आहे. या प्रकरणात चहा टपरी संचालक नरेंद्र मेंढे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहिती नुसार खापर्डे बगीचा मध्ये जिल्हा माहिती कार्यालय आणि आदर्श हायस्कूलच्या मधात नरेंद्र मेंढे यांची चहा टपरी ☞(पान २ वर)

# अंबादेवी संस्थानची प्रसाद सेवा बंद

### गॅस सिलेंडर टंचाईमुळे निर्णय



**अमरावती/ प्रतिनिधीः**- इराण इस्त्राईल युद्धामुळे देशात सध्या एलपीजी गॅस टंचाई निर्माण झाली आहे. याचे परिणाम सर्व ठिकाणी जाणवत आहे. जागोजागी सिलेंडर साठी मारामारी होत आहे. गॅस एजन्सी च्या बाहेर सिलेंडर साठी रांगा लागत आहे.चूल पेटण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर अंबादेवी संस्थानच्या वतीने अनेक वर्षापासून सुरू असलेली प्रसाद सेवा बंद करण्यात आली आहे. गॅस टंचाई मुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे. माहिती नुसार देशात सध्या गॅस टंचाई निर्माण झाली आहे त्याचे परिणाम दिसू लागले ☞(पान २ वर)




# अवैध दारू अड्ड्यांवर धाड, २२ हजाराचा माल नष्ट

**अमरावती/ प्रतिनिधीः**- शहरातील परिहारपुरा व फ्रेजरपुरा परिसरात पोलिसांनी धडक कारवाई करत अवैध दारू अड्डे उघड केले. चार घरांवर छापेमारी करून सुमारे २२ हजार २४० रुपयांचा कच्चा दारूचा माल जप्त आणि नष्ट करण्यात आला. ही कारवाई पोलिसांनी विशेष मोहिमेतून शनिवारी केली.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्या नेतृत्वात १४ मार्च रोजी फ्रेजरपुरा, कुंभारवाडा, वडाळी, परिहारपुरा आदी भागांत अवैध दारू विक्रेत्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान पोलिसांनी संशयित ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात कच्ची दारू जप्त करून नष्ट केली. वडाळी येथील परिहारपुरा परिसरात राहणाऱ्या कृष्ण हिरा सावरकर याच्या घरातून २० लिटर क्षमतेच्या प्लास्टिक ड्रममध्ये साठवून ठेवलेली २० लिटर गावठी दारू आढळून आली. पोलिसांनी सुमारे ७ हजार ६०० ☞(पान २ वर)

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**अमरावती/ प्रतिनिधीः**- : लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला आणि त्यानंतर लग्नास नकार देण्यात आला. इतकेच नव्हे तर तिला मारहाण सुध्दा करण्यात आली.

या घटनेची तक्रार पिडित महिलेने शुक्रवारी बडनेरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी समी कुरेशी शफीक कुरेशी (वय ३५, रा. बडनेरा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.





# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

□ रविवार, १५ मार्च २०२६ □ E-paper - www.janmadhyam.com


**समान हक्क, समान संधी आणि समान सन्मान या दिशेने विचार करण्याचा महत्त्वाचा दिवस. काही दिवसांपूर्वी बदलापूर येथे स्त्री बीजाच्या तस्करीचे प्रकरण उघडकीस आले. परंतु, यामध्ये तस्करी करणाऱ्या चार महिलांना अटक होण्यापलीकडे काहीही घडले नाही. दोन कोटी लोकसंख्या असलेल्या आणि त्यापैकी निम्म्या महिला असलेल्या राज्याच्या राजधानीत आणि महिलांसाठी काम करणाऱ्या शेकडो संस्था असणाऱ्या या महानगरात या तस्करी प्रकरणाच्या विरोधात अद्याप कोणीही आवाज उठवलेला नाही. ही घटना स्त्री सक्षमीकरणाच्या विरोधातली आहे, स्त्रियांचे शोषण करणारी आहे.**

या तस्करी प्रकरणाची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून होणारे हे भयंकर शोषण आणि कोट्यवधी रुपयांचा हा धंदा उघडकीस आणला पाहिजे, असे कोणालाच वाटले नाही, ही शोकांतिका आहे. समाज माध्यमांवर छोट्या मोठ्या गोष्टींवरती आपली मते व्यक्त करणारे आणि लाखोंच्या संख्येने कधी 'लाईक' तर कधी 'ट्रोल' करणारे तथाकथित जागरूक नागरिक अशा वेळेला कुठे गायब होतात, असा प्रश्न पडतो. हे संपूर्ण प्रकरण 'एआरटी' म्हणजेच सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा-२०२१ म्हणजेच 'असिस्टेड रिप्रॉडक्टिव्ह टेक्नॉलॉजी रेग्युलेशन अ?क्ट २०२१' या कायद्याखाली येते. हा भारत सरकारने ४२ नंबरचा १८ डिसेंबर २०२१ रोजी मंजूर केलेला कायदा आहे. याच दरम्यान सरोगसी (नियमन) करणारा कायदा २०२१ देखील मंजूर करण्यात आला. म्हणजेच चार वर्षांपूर्वी हा कायदा अस्तित्वात आला. भारतात अशा तंत्रज्ञानाचा वापर करून पहिली टेस्ट ट्यूब बेबी १९८१ साली जन्माला आली.

'आयसीएमआर'च्या मार्ग दर्शक सूचना सोडल्यास २०२१ चा कायदा येईपर्यंत हे नवीन तंत्रज्ञान नियमन करणारा कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. महाराष्ट्राने २०१८मध्ये या नवीन तंत्रज्ञानाच्या नियमानाच्या संदर्भात एक राज्यस्तरीय तज्ज्ञांची समिती स्थापन केली. कारण याच दरम्यान एका मोठ्या सिनेनटाने या तंत्रज्ञानाचा वापर करून सरोगसी केली. त्या बाळाच्या जन्माच्या आधीच त्याचे लिंग त्यांना माहीत असल्याची बातमी एका वृत्तपत्रात झळकली होती. आम्ही याबाबत खासगी फौजदारी गुन्हा दाखल केला होता. आम्ही दिलेल्या नोटिशीनंतर महाराष्ट्र सरकारने अभ्यास समिती स्थापन केली. त्यांनी सरोगसी आणि एआरटीसंदर्भात स्वतंत्र कायद्याची गरज असल्याचे नोंदविले. यासंदर्भात महाराष्ट्राच्या बाल हक्क संरक्षण आयोगाकडे असलेल्या एका महत्त्वपूर्ण प्रकरणात बालहक्क आयोगाने या सगळ्या प्रकरणाबाबत एका प्रसिद्ध रुग्णालयावर ठपका ठेवून तेथील तंत्रज्ञानाचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा सूचना आरोग्य विभागाला दिल्या होत्या.




गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहता मुंबई ही या कायद्याच्या गैरवापराची राजधानी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या कायद्यात सहा प्रकरणे असून ४६ कलमे आणि १९ नियम आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे २४ विहित नमुने या कायद्यामध्ये अंमलबजावणीच्या दरम्यान वापरायचे आहेत. या कायद्यानुसार राज्यस्तरीय समिती केंद्र सरकार बरोबरीनेच नेमणे अनिवार्य आहे. सध्याच्या महाराष्ट्राच्या समितीचा कार्य काल ५ ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होत आहे. या कायद्याचे उल्लंघन करणारे रॅकेट बदलापूरमध्ये उघडकीस येऊनही समितीने याबाबत कोणतीही कारवाई किंवा आपली भूमिका जाहीर केलेली नाही. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने राजपत्रित आदेशाने समुचित प्राधिकारी नेमले आहेत.

राज्यातील सर्व सिव्हिल सर्जन आणि महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी हे या कायद्यांतर्गत समुचित प्राधिकारी आहेत. राज्यातील सर्व एआरटी क्लिनिक्स म्हणजेच तंत्रज्ञानाची सेवा देणारे सर्व दवाखाने, जे आयव्हीएफ सेंटर्स किंवा वंध्यत्व निवारण केंद्र म्हणून काम करतात, त्यांची तज्ज्ञता आणि वैधता तपासून नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच ज्या ठिकाणी स्त्री बीज आणि पुरुष बीज विशिष्ट तापमानामध्ये साठवून ठेवून योग्य वेळी वापरण्यास दिली जातात, अशा सेंटर्सना 'एआरटी बँक' म्हटले जाते. याचीही तज्ञता आणि वैधता तपासून त्याची नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. या कायद्यांतर्गत किती सेंटर नोंदवलेली आहेत. याची माहिती उपलब्ध नाही. परंतु, सगळ्यांत जास्त मुंबई ५४६, पुणे विभागात २०२, नागपूर विभागात ६९ आणि नाशिक विभागात ५५ अशी ११९९ फर्टिलिटी आणि आयव्हीएफ सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. या व्यतिरिक्त एवढीच संख्या नोंदणी नसणाऱ्या सेंटरची असू शकेल, हे जाहिराती बघता स्पष्ट दिसते.

एआरटी कायद्यानुसार विवाहित स्त्री- पुरुषाने, ज्यांना एक तरी मूल आहे आणि ज्यांच्या आयुष्यात फक्त एकदाच, म्हणजेच स्त्रीला २५ ते ३५ वयोमर्यादेत एका वेळेला सात स्त्रीबीजं देणगी म्हणून द्यावयाची आहेत आणि पुरुषांनी आयुष्यात फक्त एकदाच वय २१ ते ५५ या वयोमर्यादेत पुरुषबीज म्हणजे (सिमेन) देणगी रूपाने द्यायचे आहे. त्यापासून निर्माण झालेला गर्भ कोणत्याही प्रकारे भारतात किंवा भारताबाहेर विक्रीस कायद्याच्या कलम २९ प्रमाणे प्रतिबंधित केलेला आहे. या कायद्याचे कोणतेही कलम किंवा नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तीस पहिल्या वेळेस पाच लाखापासून दहा लाखापर्यंत दंड भरावा लागेल. दुसऱ्या वेळेस असाच गुन्हा करताना आढळल्यास तीन ते आठ वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा आणि २० लाखांपर्यंतचा दंड भरावा लागेल. सदर कायद्याखाली सर्व गुन्हे फौजदारी दंड संहिता १९७३नुसार दखलपात्र गुन्हा आहे.

कोणत्याही प्रकारे याचे व्यापारीकरण करणे किंवा त्याची गोपनीयतेचा भंग करणे हा सदर कायद्यानुसार गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे.

कलम २६नुसार सदर तंत्रज्ञानाचा वापर करताना पंधराहून अधिक वेगवेगळ्या टप्प्यांवर पुरुषबीज आणि स्त्री बीजाचा संयोग करून प्रयोगशाळेत घडविताना 'एक्स' 'एक्स' गुणसुत्रे डावलून 'एक्स' 'वाय'ची निवड करून मुलगाच जन्माला घालणे शक्य असल्यामुळे अशा प्रकारच्या लिंग निवडीलाही एआरटी कायद्यानुसार प्रतिबंध करण्यात आला आहे. एआरटी तंत्रज्ञान हे विज्ञानाला गवसलेले वरदान म्हणून गरजू जोडप्यांना बाळ मिळवण्यासाठी म्हणजेच पालक म्हणून आपल्या आयुष्यातील आनंद घेण्यासाठी मदत करणारा हा कायदा बनवला आहे. परंतु, महाराष्ट्रासह देशामध्ये गरीब, गरजू, अल्पसंख्याक आणि मागास जनजातीतील स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याबरोबरच जीवघेणा खेळ करीत स्त्री-बीज आणि पुरुष बीजाची मोठी तस्करी मुंबईसह देशभरातील अनेक महानगरं आणि जिल्ह्यांच्या ठिकाणी चालणाऱ्या या आयव्हीएफ सेंटर आणि वंध्यत्व निवारण केंद्राद्वारे होत आहे. यासाठी पीआरओ नेमलेले आहेत. मोठमोठ्या अपार्टमेंटस्मध्ये फ्लॅट्स घेऊन असे प्रकार सर्रास सुरू आहेत, हे नुकत्याच उघड झालेल्या प्रकरणात दिसले. गरजूंकडून जेमतेम २५ हजारांत खरेदी केलेले स्त्री बीज किंवा पुरुष बीज लाखो रुपये घेऊन विकले जात आहेत. देणगी देणारा आणि देणगी स्वीकारणारा, तंत्रज्ञानाचा गैरवापर करणारा या सगळ्यांच्या संगनमताने सुरू असणाऱ्या या कोट्यवधी रुपयांच्या तंत्रज्ञानाच्या धंद्याकडे शासन स्तरावर डोळेझाक करण्यासाठी अर्थपूर्ण तडजोडी केल्या जात आहेत. आणि म्हणूनच अशा तंत्रज्ञानाच्या नियमनासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीवर राजकीय पक्षांचा वरदहस्त असणाऱ्या अशासकीय सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना नेमले जाते. कायदा झाल्यामुळे व्यवस्थेला शिस्त लागण्याऐवजी व्यवस्था अबाधित चालू राहण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उलाढाल मात्र सुरू राहिली आहे.

# तडाख्यात.....



# बळीराजा !

**अस्मानी असो वा सुलतानी, कोणत्याही संकटामध्ये अंतिमत भरडला जातो तो देशातील अन्नदाता शेतकरीच! इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्ध संघर्षाचीही झळ भारतातील शेती क्षेत्राला बसू लागली आहे. महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. आखाती देशांतील अस्थिरतेमुळे केवळ नवीन ऑर्डर येणेच थांबले नाही, तर जुन्या पेमेंटची वसुलीदेखील कठीण झाली आहे.**

अस्मानी असो वा सुलतानी, कोणत्याही संकटामध्ये अंतिमत भरडला जातो तो देशातील अन्नदाता शेतकरीच! इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्ध संघर्षाचीही झळ भारतातील शेती क्षेत्राला बसू लागली आहे. महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. आखाती देशांतील अस्थिरतेमुळे केवळ नवीन ऑर्डर येणेच थांबले नाही, तर जुन्या पेमेंटची वसुलीदेखील कठीण झाली आहे. बहुतांश निर्यात ही पत धोरणावर (क्रेडिट) केली जाते, त्यामुळे युद्ध दीर्घकाळ चालल्यास निर्यातदारांचे कोटय़वधी रुपये अडकण्याची भीती आहे. जर निर्यातदारांना पैसे मिळाले नाहीत, तर त्याचा थेट परिणाम शेतक-यांना मिळणा-या भावावर होणार आहे; पण सरकारला या प्रश्नाचे गांभीर्य पुरेसे लक्षात आल्याचे दिसत नाही.

### उत्पादन खर्च वाढण्याची भीती

युद्धाचा परिणाम केवळ निर्यातीवरच थांबत नाही, तर तो शेतीच्या उत्पादन खर्चावरही होणार आहे. आखाती देशांतील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. भारताला लागणा-या खतांच्या, विशेषत युरियाच्या उत्पादनासाठी नैसर्गिक वायूचा मोठय़ा प्रमाणावर वापर होतो. जर गॅसच्या किमती वाढल्या तर खतांच्या किमतीतही वाढ होईल. याशिवाय डिझेलच्या दरात वाढ झाल्यास ट्रॅक्टर, मशागत आणि सिंचनासाठी लागणारा खर्च वाढून शेतक?यांचा नफा आणखी कमी होईल.

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या संघर्षाने आता केवळ आखाती देशांच्या सीमांपुरते मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्थेवर आपले विपरीत परिणाम उमटवण्यास सुरुवात केली आहे. भारतासाठी हा संघर्ष केवळ राजनैतिक चिंतेचा विषय नसून देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेवर घाला घालणारा ठरत आहे. विशेषत महाराष्ट्रातील कांदा आणि द्राक्ष उत्पादक तसेच पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातील बासमती तांदूळ पिकवणारे शेतकरी या युद्धाच्या छायेखाली आले आहेत. निर्यातीतील अडथळे, बंदरांवर अडकलेले कंटेनर आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे भारतीय बळीराजाच्या डोळ्यांत पुन्हा एकदा पाणी येण्याची चिन्हे दिसत आहेत.

### कांदा आणि फलोत्पादनाचे नुकसान

महाराष्ट्र हे देशातील कांदा आणि फलोत्पादनाचे मुख्य केंद्र आहे. मात्र, आखातातील युद्धाने या क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. जवाहरलाल नेहरू बंदर अर्थात जेएनपीटी येथे नाशिक आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून आलेले सुमारे १५० कंटेनर सध्या अडकून पडले आहेत. या कंटेनरमध्ये जवळपास ४,५०० टन कांदा असून त्याचे गंतव्य स्थान दुबई आणि इतर आखाती शहरे होते. दुबई हे भारतीय कांद्यासाठी एक प्रमुख व्यापारी केंद्र मानले जाते, जिथून संपूर्ण मध्यपूर्वेत कांद्याचा पुरवठा होतो. मात्र, युद्धामुळे दुबईची बाजारपेठ ठप्प झाली असून शिपिंग लाइन्सनी आपली वाहतूक तात्पुरती स्थगित केली आहे.

**नवनाथ वारे**

सध्या रमजानचा महिना सुरू असल्याने कांद्याला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा शेतक?यांना होती. मात्र निर्यात थांबल्याने हा सर्व माल आता स्थानिक बाजारपेठेत येण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कांद्याचे दर कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत शेतक?यांना प्रति क्विंटल १,५०० रुपये अनुदान देण्याची आणि बंदराचे शुल्क माफ करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत निर्यात पूर्ववत होत नाही, तोपर्यंत सरकारने मध्यस्थी करून खरेदी योजना राबवणे आवश्यक झाले आहे.

केवळ कांदाच नव्हे, तर द्राक्षे आणि आंबा यांसारख्या नाशवंत पिकांवरही या युद्धाचा मोठा परिणाम झाला आहे. सुमारे ३,९०० टन द्राक्षे असलेले ३०० कंटेनर जहाजांवर चढवले गेले होते, परंतु युद्धामुळे ही जहाजे पुढे जाऊ शकली नाहीत. आता हा माल परत उतरवून स्थानिक बाजारात विकावा लागणार आहे. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष मारुती चव्हाण यांच्या मते, सुमारे सहा हजार टन द्राक्ष उत्पादनावर याचा थेट परिणाम होणार आहे. निर्यातक्षम द्राक्षे जेव्हा स्थानिक बाजारात कमी दराने विकली जातात, तेव्हा शेतक?यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते.

महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतक?यांनाही या युद्धाचा फटका बसू लागला असून सोलापूर जिल्ह्यातील करमाळा भागात याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. कोटय़वधी रुपयांची केळी निर्यात ठप्प झाली असून करमाळा येथील शीतगृहांमध्ये सुमारे १,२०० कंटेनर अडकून पडले आहेत. या संकटामुळे गेल्या दोन दिवसांपासून केळीची कापणी पूर्णपणे थांबविण्यात आली असून जिथे दररोज १,००० ते १,२०० टन केळीची कापणी होत असे, तिथे आता शुकशुकाट पसरला आहे.

केवळ कापणीच नव्हे, तर आधीच निर्यातीसाठी पाठवलेले कंटेनरही आता मोठय़ा अनिश्चिततेत अडकले आहेत. काही कंटेनर परदेशातून परत मागवले जात आहेत, तर इराणसारख्या देशांत पोहोचलेले कंटेनरही परत येत असल्याची माहिती समोर येत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जहाजे उपलब्ध नसल्याने शीतगृहात साठवलेला माल आता उतरवून घेण्याची वेळ उत्पादकांवर आली आहे.

या सर्व भौगोलिक-राजकीय घडामोडींमुळे महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकरी मोठय़ा आर्थिक संकटात सापडला असून त्यांचे अतोनात नुकसान होत आहे.

भारताच्या कृषी निर्यातीत बासमती तांदळाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताच्या एकूण बासमती निर्यातीपैकी तब्बल ७२ टक्के निर्यात केवळ मध्यपूर्वेतील देशांना केली जाते.

# 'चतुर' दीर्घिका !

एक दीर्घिका किंवा गॅलॅक्सी म्हणजे सुमारे १०० ते २०० किंवा त्यापेक्षाही जास्त ता?यांचा समूह. त्यामध्ये आपल्या सूर्यासारखे लाखो 'साधारण' तारे, काही अगदी लहान, तर काही अतिविशाल तारेही असू शकतात. आपल्या आकाशगंगा पिंवा 'मि्ल्की-वे' दीर्घिकेतच अब्जावधी तारे सामावले आहेत. मग त्यापैकी काही ता?यांभोवती आपल्या सूर्यासारख्या ग्रहमाला असतीलच. अशा अनेक ता?यांभोवतीच्या ग्रहमालांची नोंदही झाली आहे. मात्र त्यातल्या एखाद्या ता?याच्या एखाद्या ग्रहावर आपल्यासारखी विकसित झालेली जीवसृष्टी आहे की नाही त्याचा सुगावा लागलेला नाही. कुठेतरी केव्हातरी अगदी मायक्रोब म्हणजे अतिसूक्ष्म एकपेशीय वगैरे 'जीव' आढळतो आणि लगेच 'जीवसृष्टी' सापडल्याच्या ख-याखोटय़ा बातम्यांना बहर येतो.

अर्थात आपल्या आकाशगंगेसारख्याच अब्जावधी दीर्घिकाही विश्वात आहेत. साहजिकच ता-यांची संख्यासुद्धा 'अगणित' म्हणता येईल अशी. त्याभोवतीच्या ग्रहमालांमधल्या 'ग्रहां'चा हिशोब मांडणंही अशक्य नसलं तरी कठीणच. तरीसुद्धा 'दूर' अंतराळात कोणीतरी (!) आहे का? आपल्याइतपत किंवा आपल्याहूनही अधिक विकसित 'सजीव' असेल का? भूतकाळात केव्हातरी 'त्या' प्रगत जिवांनी आपल्याकडे आतासारखी अत्याधुनिक



उपकरणं नसताना आपल्याशी 'संपर्क' तर केला नसेल? की, आपल्याला काहीच उमजत नाही अशा समजुतीने 'त्यांनी' तो प्रयत्न सोडूनही दिला असेल? असे एक ना अनेक प्रश्न.

खरोखरच कोणी 'प्रगत' जीव कुठेतरी असता तर आपल्याला कळो न कळो त्यांनी या ग्रहावरच्या सजीवांचा वेध घेतलाच असता. शिवाय ते अतिप्रगत असतील तर त्यांना हेसुद्धा कळलं असेल की, आपण शारीरिक आणि बौद्धिक उत्क्रांतीच्या कोणत्या टप्प्यावर आहोत. थोडक्यात काय तर आपलं 'व्हॉएजर-१' यान आता सुमारे २६ अब्ज किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून एक 'प्रकाशदिवस' इतपं अंतर कापून अंतराळात जातंय तरी तिथल्या कुठल्या 'कोणी' आपल्याशी संधान साधलेलं नाही. मोठय़ा आशेने १९७४ मध्ये आपण शौरी तारकासमूहाच्या दिशेने धाडलेला संकेतात्मक संदेशही 'मध्ये'च कोणी 'पकडल्या'चं ज्ञात नाही. असा संपर्क होण्यासाठी एखाद्या ग्रहावरची प्रगत वस्तीच सापडायला हवी. आपल्याच दीर्घिकेत अशी शक्यता असलेले सुमारे १० हजार ग्रहमालांचे जनक तारे आहेत असं समजलं जातं. तिथूनही काही साद अथवा प्रतिसाद नाही. बाकी हॉलीवूड-बॉलीवूडपटी 'एलियन' किंवा 'जादू'च्या कथा हा केवळ पडद्यावरचा कल्पनाविलास. आपल्या दीर्घिकेप्रमाणेच आपल्याला ठाऊक झालेल्या अनेक दीर्घिकांना आपण नावं दिली आहेत. एल-२ (लॅगरॅन्ज-२) बिंदूवर असलेली मानवनिर्मित, शक्तिशाली जेम्स-वेब अंतराळ दुर्बिण अगदी विश्वजन्माच्या काळातील दीर्घिकांचा, ताऱ्यांचा शोध घेतेय. येत्या शतकात कदाचित बाह्य जीवसृष्टीबद्दलची काही कोडी उलगडू शकतील आणि नवे कोडय़ात टाकणारे प्रश्नही समोर येतील. मात्र हा वैज्ञानिक प्रवास जितका आव्हानात्मक तितकाच रम्यही आहे. आज आपण नामकरण केलेल्या 'ड्रगनफ्लाय' किंवा 'चतुर' दीर्घिकेविषयी. अरुंधती केश किंवा 'कोमा बेरेनिसेस' या तारकासमूहातली ड्रगलफ्लाय-४४ ही एक दीर्घिका. २०१६ मध्ये या दीर्घिकेचं वस्तुमान आपल्या सूर्याच्या एक 'ट्रिलियन' एवढं असण्याचं सुरुवातीला वाटलं ही अतिधूसर (अल्ट्रा डिफ्युज) दीर्घिका आहे. या दीर्घिकेचा अधिक अभ्यास करता तिचं वस्तुमान सूर्याच्या १६० अब्ज पट असल्याचं (नंतर) निष्पन्न झालं.

ड्रगनफ्लाय (म्हणजे पावसाळ्यानंतर दिसणारा चतुर) दीर्घिकेचं आणखी एक वैशिष्टय़ असं की, आपल्या आकाशगंगा दीर्घिकेतील ता?यांमधून एकत्रितपणे जेवढा प्रकाश निर्माण होतो त्याच्या केवळ १ टक्काच प्रकाश ही दीर्घिका देत असते. म्हणूनच या दीर्घिकेतील 'कृष्णद्रव्य' तथा 'डार्क मॅटर'चा अभ्यास करण्यासाठी 'डिमॉस' हे उपकरण वापरून आणि आठ मीटर व्यासाच्या जेमिनी नॉर्थ दुर्बिणीचा उपयोग करून या दीर्घिकेच्या गाभ्यातील 'आभा' (हेलो) तपासण्यात आली.

# समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांची हुल्लडबाजी



अभिनेत्री मुनमुन दत्ताला 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या मालिकेमुळे मोठी लोकप्रियता मिळाली. यातील तिच्या बबीता या भूमिकेला मोठी पसंती मिळाली. सध्या मुनमुन तिच्या भूमिकांमुळेच नाही, तर एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे.

मुनमुनने नुकताच लोकप्रिय पर्यटन स्थळी काही भारतीय पर्यटकांच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल संताप व्यक्त केला.

मुनमुन हिने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये, काही भारतीय असं काही वर्तन करताना दिसत आहेत, जे लाजिरवाणं आहे जे पाहिल्यानंतर तुम्हाला देखील लाज वाटेल. शिवाय काही जण नैसर्गिक स्थळे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करत असल्याचं देखील चित्र दिसत आहे.

लोकप्रिय पर्यटन स्थळांवर हे लज्जास्पद वर्तन घडत आहे. काही पुरुष पर्यटन स्थळी अर्धनग्न फिरत आहेत, तर काही पुरुष समुद्रात कार चालवत आहेत, हे सर्व पाहिल्यानंतर मुनमुन दत्ताला प्रचंड राग आला.

मुनमुन दत्ता निसर्ग आणि प्राण्यांवर खूप प्रेम करते.

ती नेहमीच पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या बाजूने असते. नुकताच तिने तिच्या 'मॉर्निंग रुटीन'चा एक व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये तिने तिने वाचवलेल्या एका मांजरीच्या पिल्लाची ओळख चाहत्यांशी करून दिली होती. "या व्हिडिओमध्ये ती मांजरीच्या पिल्लाशी लाडाने बोलताना दिसत आहे. 'काय झालं बाळा, तुला माहिती हवी आहे का? चला, आपण मेकअप सुरू करूय, हे आपलं नवीन रेस्क्यू आहे,' असं ती त्या पिल्लाला म्हणताना ऐकू येत आहे. दरम्यान, मुनमुन सोशल मीडियावर खूप सक्रिय असते आणि तिचे दैनंदिन अपडेट्स नेहमीच चाहत्यांसोबत शेअर करत असते.

# शिल्पा शेट्टीला दिलासा



बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिला पर्सनॅलिटी राइट्स प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. बॉम्बे उच्च न्यायालय यांनी दिलेल्या महत्त्वाच्या आदेशानुसार शिल्पा शेट्टी यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या नावाचा, फोटोचा, आवाजाचा किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित कोणत्याही गोष्टीचा वापर करता येणार नाही. शिल्पा शेट्टी यांनी त्यांच्या पर्सनॅलिटी राइट्सच्या संरक्षणासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. डिजिटल माध्यमांवर त्यांच्या नावाचा आणि प्रतिमेचा चुकीच्या पद्धतीने वापर होत असल्याची तक्रार त्यांनी केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने अभिनेत्रीच्या बाजूने निर्णय देत स्पष्ट केले की कोणतीही व्यक्ती किंवा डिजिटल प्लॅटफॉर्म अभिनेत्रीच्या परवानगीशिवाय त्यांच्या ओळखीचा वापर करू शकत नाही. अभिनेत्रीच्या टीमने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की शिल्पा शेट्टी यांच्या नावाचा किंवा प्रतिमेचा व्यावसायिक किंवा इतर कोणत्याही हेतूने चुकीचा वापर करणे पूर्णपणे बंदी आहे. यामुळे अभिनेत्रीच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित अधिकारांना कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.

या प्रकरणाच्या सुनावणा दरम्यान न्यायालयाने डिजिटल प्लॅटफॉर्म आणि इंटरनेटवरील मध्यस्थ कंपन्यांनाही काही महत्त्वाचे निर्देश दिले. न्यायालयाने म्हटले की इंटरनेटचा वापर डीपफेक, बनावट व्हिडिओ किंवा सार्वजनिक व्यक्तींची डिजिटल नक्कल तयार करण्यासाठी केला जाऊ नये. अशा प्रकारे एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची ओळख वापरणे हे त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन मानले जाईल.

न्यायालयाने स्पष्ट केले की कोणत्याही सार्वजनिक व्यक्तीचा फोटो, नाव किंवा आवाज व्यावसायिक उद्देशाने वापरायचा असेल तर त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्या व्यक्तीच्या पर्सनॅलिटी राइट्सचे उल्लंघन झाल्याचे मानले जाईल. डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखणे अत्यंत गरजेचे असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. शिल्पा शेट्टी यांच्यापूर्वीही अनेक बॉलिवूड कलाकारांनी आपल्या पर्सनॅलिटी राइट्सच्या संरक्षणासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. यात अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, हृतिक रोशन आणि ऐश्वर्या राय बच्चन यांसारख्या कलाकारांचा समावेश आहे. या कलाकारांनीही आपल्या नावाचा, आवाजाचा आणि प्रतिमेचा गैरवापर थांबवण्यासाठी कायदेशीर पावले उचलली होती.

शिल्पा शेट्टी यांच्या प्रकरणात आलेला हा निर्णय डिजिटल जगात सेलिब्रिटींच्या पर्सनॅलिटी राइट्सच्या संरक्षणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे प्रसिद्ध व्यक्तींच्या नावाचा किंवा प्रतिमेचा गैरवापर होण्याची शक्यता वाढली आहे. अशा परिस्थितीत न्यायालयाचा हा निर्णय कलाकारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

# गुलाबी साडी आणि लाली लाल लाल



अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने लाल-गुलाबी रंगाची साडी नेसून सुंदर फोटोशूट केले आहे. हे फोटोशूट तिने एका सिनेमागृहात केले आहे. सोनालीचा नुकताच तिघी सिनेमा रिलीज झाला आहे. या सिनेमाच्या निमित्ताने ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या सिनेमातील तिच्या भूमिकेचे कौतुक होत आहे.

# तब्बल १३ वर्षांनी अभिजीत सावंतने गायलं गाणं

इंडियन आयडियल १ चा विजेता, बिग बॉस मराठी ५ चा रनर अप आणि लाखो मुलींची धडकन अभिजीत सावंत. हिंदीत मोहबते लुटाऊंगा तर मराठीत सर सुखाची श्रावणी या दोन्ही गाण्यांनी अभिजीतने प्रेक्षकांना वेड लावलंय. त्याने आतापर्यंत अनेक गाणी गायली पण या दोन गाण्यांसाठी अभिजीतची वेगळीच फॅन फॉलोविंग आहे. मंगलाष्टक वन्स मोअर या सिनेमातील 'सर सुखाची' हे गाणं अभिजीत सावंतने गायलं आणि एक ट्रेंड सेट केला. हे गाणं आजही तितकंच फ्रेश आहे.



'सर सुखाची' या गाण्यानंतर अभिजीत सावंतने कोणत्याच मराठी सिनेमासाठी गाणं गायलं नाही. इतका चांगला गायक आजवर कुठे होता असा प्रश्न अनेकांना पडला होता. सर सुखाची या गाण्यानंतर तब्बल १३ वर्षांनी अभिजीत सावंतने मराठी सिनेमासाठी गाणं रेकॉर्ड केलं आहे.

२०२५ या वर्षात ट्रेंड सेटर ठरलेला गायक अभिजीत सावंत आता पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज होताना बघायला मिळणार आहे. अगदी इंडियन आयडॉल ते ट्रेंड सेटर गायक म्हणून असलेली त्याची ओळख कायम प्रेक्षकांना काहीतरी नवीन गाणं देऊन जाते.

तब्बल १३ वर्षांनी पुन्हा एकदा अभिजीत 'सखे गं साजणी' या मराठी चित्रपटाच टायटल ट्रॅक त्याने केलं आहे. सर सुखाची श्रावणी या सदाबहार गाण्यानंतर तो आता पुन्हा प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. या गाण्यात अभिजीतची एक झलक देखील बघायला मिळत आहे.

सखे गं साजणी हे गाणं नुकतंच रिलीज झालं आहे. गाण्याविषयी बोलताना अभिजीत सावंत म्हणाला, 'चित्रपटासाठी गाणं करणं हे प्रत्येक गायकांच स्वप्नं असतं आणि अश्यातच ही संधी मला मिळाली याचा खूप आनंद आहे. 'सखे गं साजणी' चित्रपटाचं टायटल ट्रॅक करायचं आहे हे समजलं तेव्हा पासून या गाण्याबद्दल मला सुद्धा उत्सुकता होती. गाणं गाऊन अभिनय करणं या दोन्ही गोष्टी या गाण्यात करायला मिळाल्या आहेत त्यामुळे हे गाणं अजून खास झालं आहे. प्रेक्षकांनी आजवर माझ्या प्रत्येक कलाकृतीला भरभरून प्रेम दिलं तेवढंच प्रेम प्रेक्षक या गाण्यासाठी देखील

# सुप्रसिद्ध गायिका रिहानाच्या घरावर गोळीबार



मनोरंजन जगतातील सुप्रसिद्ध गायिका रिहाना हिच्या घरावर गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. एका महिलेने रिहानाच्या घराच्या दिशेने वारंवार गोळीबार केला. या घटनेत कुणीही जखमी झाले नसून गोळीबार करणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. लॉस एंजेलिस पोलिस विभागाने याची पुष्टी करत सांगितले की, रविवारी ८ मार्च रोजी रिहानाच्या घराजवळ गोळीबाराची घटना घडली. या वेळी ५ ते ७ गोळ्या झाडण्यात आल्या. गोळ्या घराच्या गेटला लागल्या, मात्र घराच्या आत पोहोचल्या नाहीत. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. त्या वेळी घरात लोक उपस्थित होते. पोलिसांनी सांगितले की या प्रकरणात ३० वर्षाच्या एका महिलेला अटक करण्यात आली आहे. हल्ल्यानंतर पोलिसांनी एका गाडीचा माग काढला. ही पांढऱ्या रंगाची टेस्ला कार होती. ती रिहानाच्या घराच्या जवळ एका ठिकाणी आढळून आली आणि त्या ठिकाणाहून संशयित महिलेला अटक करण्यात आली. अधिकाऱ्यांनी अद्याप त्या महिलेची ओळख किंवा गोळीबारामागील हेतू जाहीर केलेला नाही. या प्रकरणाची पुढील चौकशी सुरू आहे. माहितीनुसार ३८ वर्षांची रिहाना आपल्या पार्टनर रॅपर एएसएपी रॉकी आणि त्यांच्या तीन मुलांसोबत बेव्हर्ली हिल्स येथील घरात राहते. या प्रकरणावर रिहानाच्या प्रतिनिधींनी अद्याप सार्वजनिकरीत्या कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

# 'धुरंधर-२'ने १८ कोटी कमावले




'धुरंधर-२' हा चित्रपट येत्या १९ मार्चला गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सिनेमागृहात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाने प्रदर्शनापूर्वीच पेड प्रीव्ह्यूमधून १८ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाची रविवारी पेड प्रीव्ह्यूसाठी ८० हजार तिकिटे विकली गेली.

यामुळे बॉक्स ऑफिसवर चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये ८ कोटींची भर पडली. शनिवारी ट्रेलर लाँच झाल्यानंतर अडवॉन्स्ड बुकिंग सुरू झाली होती.

२४ तासांत १.२ लाख तिकीट विक्रीतून १० कोटी रुपये कमावले होते. या चित्रपटाच्या अडवॉन्स्ड बुकिंगची कमाई आता १८.११ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

यात ६ कोटींच्या ब्लॉक बुकिंगचा समावेश आहे. या चित्रपटाच्या हिंदी व्हर्जनला सर्वाधिक पसंती मिळाली आहे.

# 'सैय्यारा' फेम अभिनेत्री अनीत पड्डा मोठ्या पडद्यावर साकारणार मधुबाला



मधुबाला म्हटलं, की एक अलौकिक सौंदर्य अन् अदाकारी समोर येते. हिंदी मनोरंजनसृष्टीसाठी हे नाव एखाद्या गूढरम्य कथेसारखं राहिलं आहे. आज इतक्या वर्षांनंतरही या नावाची चर्चा होणं, ही गोष्ट दिवंगत अभिनेत्री मधुबाला यांच्या लोकप्रियतेची प्रचिती देणारी आहे. याच कारणास्तव गेली अनेक वर्षं मधुबाला यांच्या चरित्रपटाची चर्चा रंगली. त्यांच्यावर सिनेमा झालाच, तर त्यात कुणी काम करावं, याबद्दल अनेकांनी अनेक प्रकारची मतं व्यक्त केली.

अगदी माधुरी दीक्षितपासून करिना कपूर, कंगना रणौतआणि अलीकडे कियारा अडवाणी यांच्या नावाची चर्चा झाली. आता इंडस्ट्रीतल्या ताज्या चर्चेनुसार, 'सैय्यारा' फेम अभिनेत्री अनीत पड्डा हिला मोठ्या पडद्यावर मधुबाला साकारण्याची संधी मिळणार आहे, असं कळतंय. एकीकडे ती या सिनेमात मुख्य भूमिकेत नाही असंही बोललं जात आहे. याआधी कियारा अडवाणीचं नाव चर्चेत होतं. मात्र, कियारा मीनाकुमारी यांच्यावरील चरित्रपट करत असल्याचं पक्कं झाल्यानं ती या चर्चेच्या पर्यायांतून बाहेर पडली आहे.

# मी सार्वजनिक जीवन निवडले, मुलीने नाही!



बॉलिवूड आणि हॉलिवूडमध्ये सध्याच्या घडीला प्रियांका चोप्राच्या नावाचा बोलबाला आहे. प्रियांकाने अलीकडेच तिच्या मुलीच्या सुरक्षेविषयी एक विधान केले आहे. त्यामुळे प्रियांका पुन्हा एकदा तिच्या मुलीच्या एकूणच संगोपनाबद्दल किती जागरूक आहे हे दिसून आले आहे. प्रियांका आणि तिचा पती निक जोनास दोघेही त्यांची मुलगी मालतीला शक्य तितके सार्वजनिक प्रकाशझोतापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचे तिने सांगितले. एका पॉडकास्ट मुलाखतीदरम्यान प्रियांकाने स्पष्ट केले की, लोकांना तिच्या मुलीबद्दल उत्सुकता असणे तिला समजते. मात्र तिची सर्वात मोठी प्राथमिकता म्हणजे मुलगी सुरक्षित आणि संरक्षित राहणे. 'मी सार्वजनिक जीवन स्वतःहून निवडले आहे, पण माझ्या मुलीने तसे केलेले नाही,' असे प्रियांकाने सांगितले. प्रियांकाने एक चिंताजनक प्रसंगही सांगितला. एकदा तिची मुलगी शाळेतून घरी येत असताना एका अनोळखी व्यक्तीने तिच्या मागे येत तिचे रेकॉर्डिंग करण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर प्रियांका आणि निक अधिक सावध झाले आणि त्यांनी मुलीच्या सुरक्षेसाठी खास सुरक्षा रक्षक नेमण्याचा निर्णय घेतला. प्रियांकाच्या मते, सुरक्षा रक्षकांचा उद्देश केवळ प्रसिद्धीपासून तिला दूर ठेवणे नाही तर, त्याचबरोबर मुलीच्या गोपनीयतेचे रक्षण करणे हे देखील आहे. परवानगीशिवाय फोटो किंवा व्हिडिओ काढले जाणे टाळण्यासाठी हा सुरक्षा रक्षक नेमण्यात आल्याचे तिने सांगितले.


प्रियांका पॉडकास्ट दरम्यान म्हणाली, माझ्या मुलीने शक्य तितके सामान्य आयुष्य जगावे असे वाटते. भविष्यात मालतीला सार्वजनिक जीवनात यायचे की नाही, हा निर्णय तिने स्वतः घ्यावा, अशी तिची इच्छा आहे. मुलांनी सुरक्षिततेसोब तच लोकांवर विश्वास ठेवून मोठे व्हावे, असेही ती म्हणाली. सध्या प्रियांका 'सिटाडेल' या बहुचर्चित वेब सीरिजच्या दुसऱ्या सिझनमध्ये दिसणार आहे.

तसेच ती दिग्दर्शक एस. एस. राजमौली यांच्या मोठ्या बजेटच्या चित्रपटात महेश बाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासोबत कामात व्यस्त आहे.

# साखर आणि बीपी नियंत्रणात नाही?

मानवी शरीरातील किडनी हा अतिशय महत्त्वाचा अवयव आहे. आकाराने लहान असली तरी शरीराच्या अनेक महत्त्वाच्या प्रक्रिया सुरळीत ठेवण्याचे काम किडनी करते. मात्र सध्या जगभरात किडनीच्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. विशेषतः मधुमेह (डायबिटीज) आणि उच्च रक्तदाब (हाय ब्लड प्रेशर) नियंत्रणात नसल्यास किडनीला गंभीर नुकसान होऊ शकते, असा इशारा आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे.

दरवर्षी मार्च महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी 'जागतिक किडनी दिन' साजरा केला जातो. यंदा १२ मार्च रोजी हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या दिवसाचा उद्देश लोकांना किडनीच्या आजारांबद्दल जागरूक करणे आणि योग्य काळजी घेण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.



किडनीचे मुख्य काम म्हणजे रक्तातील घातक पदार्थ आणि अतिरिक्त पाणी शरीरातून बाहेर टाकणे. दररोज किडनी सुमारे १३० ते १४० लिटर रक्त फिल्टर करते. यामधून युरिया, क्रिएटिनिनसारखे अपायकारक पदार्थ बाहेर काढले जातात. तसेच शरीरातील सोडियम, पोटॅशियमसारख्या इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखणे, रक्ताचा पीएच स्तर नियंत्रित ठेवणे आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यातही किडनी महत्त्वाची भूमिका बजावते.

तज्ज्ञांच्या मते, चुकीची जीवनशैली आणि आहाराच्या सवयींमुळे किडनीचे आजार वाढत आहेत. जास्त मीठ असलेले पदार्थ खाणे, धूम्रपान आणि मद्यपानाची सवय, जास्त वजन किंवा स्थूलता तसेच वारंवार वेदनाशामक औषधांचा वापर हे किडनीच्या आजारांचे महत्त्वाचे कारण ठरू शकतात.

याशिवाय दीर्घकाळ साखर आणि रक्तदाब वाढलेला राहिल्यास किडनीवर त्याचा गंभीर परिणाम होतो. जेव्हा रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असते, तेव्हा किडनीतील सूक्ष्म रक्तवाहिन्यांना हळूहळू नुकसान होऊ लागते. या स्थितीला डायबिटिक नेफ्रोपॅथी असे म्हणतात. यामुळे किडनीची फिल्टर करण्याची क्षमता कमी होते आणि लघवीत प्रोटीन येऊ लागते. ही स्थिती पुढे क्रॉनिक किडनी डिजीजमध्ये रूपांतरित होऊ शकते.

तसेच उच्च रक्तदाबामुळेही किडनीतील नाजूक रक्तवाहिन्यांवर ताण येतो. त्यामुळे त्या हळूहळू खराब होऊ लागतात. किडनी नीट काम करू शकत नसल्यास शरीरात मीठ आणि पाणी साचू लागते आणि त्यामुळे रक्तदाब आणखी वाढतो. ज्या व्यक्तींना एकाच वेळी मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास असतो, त्यांना किडनीच्या आजारांचा धोका अधिक असतो.

किडनी निरोगी ठेवण्यासाठी जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम केल्याने वजन, रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. आहारात मीठाचे प्रमाण कमी ठेवणेही महत्त्वाचे आहे. दिवसातून पुरेसे पाणी आणि इतर द्रवपदार्थ घेणे आवश्यक आहे.

तसेच आहारात ताज्या भाज्या, फळे आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करावा. प्रक्रिया केलेले अन्न, जास्त मीठ आणि साखर असलेले पदार्थ शक्यतो टाळावेत. धूम्रपानही किडनीसाठी घातक ठरू शकते, कारण त्यामुळे किडनीकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो.

तज्ज्ञांच्या मते, मधुमेह आणि रक्तदाब असलेल्या रुग्णांनी किडनीची तपासणी नियमितपणे करून घेतली पाहिजे. वेळेवर काळजी घेतल्यास किडनीचे गंभीर आजार टाळणे शक्य आहे.

# उन्हाळ्यातील ऋतुचर्या



उन्हाची काहिली जाणवू लागली की आहार-विहारचा समतोल साधणं कठीण वाटू लागतं. मात्र याच काळात ऋतुचर्या पाळण्याची आवश्यक ता असते. आयुर्वेदाच्या दृष्टीने याचा विचार कसा करावा हे पाहूया. मार्च महिना म्हणजे वसंत आणि ग्रीष्म ऋतू आला आहे. आयुर्वेदोक्त ऋतुचर्या म्हणजे दैनंदिन आहार, विहार याचा शास्त्रीय दृष्टीने विचार हे आपण मागील लेखात पाहिले. या लेखात आयुर्वेदानुसार उन्हाळ्यातील ऋतुचर्या कशी असावी हे पाहूया. उन्हाळ्यामध्ये अग्नी मंदावलेला असतो. भूक काहीशी कमी असते. त्यामुळे पचायला जड असलेले अन्न पदार्थ टाळावे. शक्यतो सर्वच प्रकारचा मांसाहार टाळावा. शाकाहारामध्ये कडधान्यांचा वापर कमी करावा. मसूर, कुळीथ, गवार, तोंडली हे अतिशय पित्तकर असल्याने त्यांचा वापर टाळावा. पडवळ, भोपळा, घोसाळी, शिराळी, दुधी, भेंडी, वांगी या भाज्या खाव्यात. तिखट जास्त न वापरता त्याऐवजी ओला कांदा, धणे, जिरे, कोथिंबीर, पुदिना आणि किंचित प्रमाणात मिरे यांचा वापर करावा. ओली अथवा लाल मिरची यांचा वापर शक्यतो टाळावा. ताक, तूप, लोणी यांचा समावेश जेवणात करावा. अति तेलकट पदार्थ शक्यतो टाळावेत. या काळात भरपूर घाम येत असतो. शरीरातील पाणी कमी होत असल्याने द्रव पदार्थांचा वापर जास्त करावा. पाणी भरपूर प्यावे. या काळात मद्यपान टाळावे . कोल्ड्रिंक्स, बर्फाचे पाणी यांचे अतिसेवन करू नये. त्याऐवजी शहाळे, कोकम सरबताचा जास्त वापर करावा. कोकम सरबत किंवा कैरीच्या पह्यामध्ये वेलची, साखर, सैंधव, मीठ, जिरे घालून प्यावे. त्यामुळे थकवा कमी होतो. काम करण्याची ऊर्जा मिळते.या काळात लघवीचे त्रास वाढू लागतात. उन्हाळा लागणे, लघवीला आग होणे, लघवीला लाल होणे अशी अनेक लक्षणे दिसून येतात. यावर उत्तम उपाय म्हणजे धान्य पानक. एक ग्लास गरम पाण्यात कुटलेले धणे भिजत घालून त्यामध्ये साखर घालून सेवन केल्याने लघवीच्या तक्रारी दूर होतात. तहान अधिक लागत असेल आणि थकवा येत असेल तर याचा चांगला फायदा होतो. डाळिंब, काकडी, कलिंगड यांसारखी फळे भरपूर प्रमाणात खावीत. पाणी उकळून प्यावे. फ्रीजपेक्षा मातीचा घडा रांजण किंवा सुरळी यामध्ये पाणी ठेवले असता अतिशय चांगला फायदा होतो. माठामध्ये वाळा किंवा चंदन घालून सुगंधी पाणी प्यावे. वाळामिश्रित पाणी लघवीला साफ होण्यासाठी, लघवीच्या तक्रारी कमी होण्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. वाळ्याची मुळे विकत मिळतात. ती स्वच्छ धुऊन त्यांची पातळ पुडी करून सुती कापडोकंमध्ये पाण्यामध्ये बुडवून ठेवावी. कारण मुळे सुट्टी ठेवल्यास त्यांना गुळगुळीत आवरण पकडून पाणी खराब होण्याची शक्यता असते. प्रत्येक दोन दिवसांआड ही पुरचुंडी सोडून पाण्याने स्वच्छ धुऊन पुन्हा वापरता येते.

या काळात उद्भवणारी समस्या म्हणजे नाकातून होणारा रक्तस्त्राव. याला सामान्य भाषेत घोणा फुटणे म्हणतात. गाईच्या दुधापासून बनवलेल्या तुपाचे दोन-तीन थेंब नाकात सोडल्यास फायदा होतो. वैद्यकीय सल्ल्यानुसारच करावे. उन्हाळ्यामध्ये थोडय़ा श्रमानेसुद्धा जास्त प्रमाणात घाम येतो. पर्यायाने थकवा अधिक जाणवतो. म्हणून शक्य झाल्यास अतिशय श्रमाची कामे टाळावी. या काळात सुती कपडे वापरावेत. काखा, जांघा यांसारख्या जास्त घाम येणारा आणि घाम साठणा-या जागांवर कपडे परिधान करण्यापूर्वी वाळा, चंदन, कडुनिंब यांसारख्या शीतलता देणारा आणि घामाची दुर्गंधी नष्ट करणारे औषध, चूर्ण यांचा प्रसाधनासाठी वापर करावा. उन्हामध्ये टोपी, गमचा वापरावा. डोळ्यांवर गॉगल वापरावे उन्हातून फिरून आल्यानंतर थोडा वेळ शांत बसून थंड पाण्याचा शिडकावा करावा. गुलाबपाणी वापरल्यास उत्तम. फक्त याच ऋतूमध्ये दुपारच्या जेवणानंतर काही काळ विश्रांती घेण्याची अनुमती देण्यात आली आहे. थोडा वेळ वामकुक्षी घ्यावी. या ऋतूमध्ये वैद्यांच्या सल्ल्याने प्रवाहयुक्त गुलकंद, परिपाठादी काढा, त्रिफळा चूर्ण, चंदनादी वटी इत्यादी आयुर्वेदिक औषधांचा वापर केल्यास उन्हाळा सुसह्य होऊ शकतो.

# उन्हाळ्यात गाजर खाणे लाभदायक



गाजर अलिकडे बारही महिने आपल्याला बाजारात दिसतात. गाजर हे आपल्या शरीरासाठी फार महत्त्वाचे मानले जाते. गाजराचा ज्यूस पिण्याचे फायदे अगणित आहेत. खासकरून उन्हाळ्याच्या दिवसात आपण हा रस पिल्याने शरीराला खूप फायदे मिळतात.

गाजराचा रस शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे यकृत निरोगी राहते.

गाजराच्या रसामध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात असते. व्हिटॅमिन ए डोळ्यांसाठी खूप आवश्यक मानले जाते. यामुळे दृष्टी सुधारण्यास खूप मदत होते.

गाजराच्या रसात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन के असते, जे हाडे मजबूत करण्यासाठी आवश्यक आहेत.

गाजरामध्ये व्हिटॅमिन ए आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत होते. तसेच गाजराचा ज्यूस पिण्यामुळे त्वचेवरील डाग कमी होतात. तसेच त्वचेला चमकही येते.

गाजराच्या रसात पोटॅशियमची मात्रा खूप असते. पोटॅशियम आपल्या हृद्यासाठी खूप उत्तम मानले जाते. यामुळे रक्तदाब देखील नियंत्रणात राहतो. तसेच हृदयविकाराचा धोकाही खूप कमी होतो.

वजन कमी करणाऱ्यांसाठी गाजराचा ज्यूस हा खूप महत्त्वाचा मानला जातो. गाजराच्या रसात कॅलरीज कमी असतात. यामुळेच वजन कमी करण्यास मदत होते.

**गाजराचा ज्यूस कसा बनवावा?**

साहित्य – गाजर २०० ग्रॅम, आवळा १ नग, आलं १ इंच (तुकडा), जेष्ठमध पावडर अर्धा चमचा, मीठ चवीनुसार.

कृती – गाजर स्वच्छ धुऊन, सोलून त्यामधे आवळा, आलं, जेष्ठमध पावडर घालून मिक्सरमध्ये बारीक करा. सर्व करतेवेळी चाळणीने न गाळता तसेच सर्व्ह करावे. त्यामुळे फायबर सुद्धा पोटात जातात. वाटल्यास चवीनुसार मीठ व साखर घालावी.

# लसूण खाल्ल्याने घाण कोलेस्ट्रॉल संपते?

लसूण केवळ चवीसाठीच नाही, तर त्याच्या औषधी गुणधर्मांसाठी जगप्रसिद्ध आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अहवालानुसार, लसणामध्ये सूक्ष्मजीवांविरुद्ध अर्थात बॅक्टेरियांसोबत लढण्याची अफाट शक्ती असते. लसणातील सक्रिय घटक आधुनिक अँटीबायोटिक्सप्रमाणेच अनेक घातक बॅक्टेरियांना नष्ट करण्यास सक्षम आहेत. जेव्हा आपण लसूण कापतो किंवा ठेचतो, तेव्हा त्यातून रासायनिक प्रक्रिया सुरू होते, त्यातून बाहेर पडणारे घटक आपल्या शरीराची रोगांशी लढण्याची ताकद वाढवायला मदत करतात आणि आपल्याला आजारांपासून संरक्षण देतात. म्हणजेच शरीराची रोगप्रतिकारक शक्ती एखाद्या ढालीप्रमाणे मजबूत होते. हे केवळ अन्न नसून, निसर्गाने मानवाला दिलेली एक 'लिव्हिंग फार्मसी' आहे. त्यामुळेच लसणाला नैसर्गिक अँटीबायोटिक्स मानतात.

**'ॲलिसिन' हा मुख्य घटक**

लसणाला अँटीबायोटिक बनवणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ॲलिसिन. एमडीपीआय जर्नल मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार, जेव्हा लसूण ठेचला जातो, तेव्हा 'ॲलिनेज' नावाचे एन्झाइम 'ॲलिन'चे रूपांतर 'लिसिन'मध्ये करते. हे रसायन बॅक्टेरिया, व्हायरस आणि बुरशीच्या (इल्हुग्) पेशींमधील एन्झाईम्सना रोखते, ज्यामुळे त्यांची वाढ थांबते. ॲलिसिनचा प्रभाव इतका शक्तिशाली असतो की ते 'पेनिसिलिन'च्या काही अंशांइतके प्रभावी मानले जाते.

**बॅक्टेरियाविरोधी लढण्याची कार्यक्षमता**

लसूण केवळ साध्या बॅक्टेरियांनाच नाही, तर 'मल्टी ड्रग रेझिस्टंट' बॅक्टेरियांविरुद्धही लढू शकतो. जर्नल ऑफ मायक्रोबायोलॉजी एन्ड बायोटेक्नोलॉजी मधील एका रिपोर्टनुसार, लसणातील सल्फरयुक्त घटक बॅक्टेरियांच्या बाहेरील आवरणाला नष्ट करतात. विशेषतः पोटातील संसर्ग निर्माण करणारे प्. ज्बत्दिग् आणि त्वचेचे संसर्ग निर्माण करणारे ऍ्ज्ब्त्दम्द्म्म्ले यांसारख्या जिवाणूंवर लसूण अत्यंत प्रभावी ठरतो.

आधुनिक अँटीबायोटिक्स फक्त बॅक्टेरियांवर काम करतात, पण लसूण हा अँटी-व्हायरल आणि अँटी-फंगल देखील आहे. सर्दी-खोकल्याच्या विषाणूंना रोखण्यासाठी लसूण मदत करतो. तसेच, कॅन्डिडा सारख्या बुरशीजन्य संसर्गामध्ये लसणाचा वापर नैसर्गिक उपचार म्हणून केला जातो.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारा घटक**

लसूण केवळ जंतू, बॅक्टेरिया, इनफेक्शनलाच मारत नाही, तर तुमच्या शरीरातील 'सैनिक' म्हणजेच पांढऱ्या पेशींना सक्रिय करतो.

सायन्स डायरेक्ट वर प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, लसणामुळे शरीरातील 'नॅचरल किलर सेल्स'ची संख्या वाढते. यामुळे शरीर कोणत्याही संसर्गाला अधिक वेगाने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देऊ शकते, ज्यामुळे आजारपणाचा कालावधी कमी होतो.

**नैसर्गिक रक्ताभिसरण आणि हृदयाचे आरोग्य**

अँटीबायोटिक गुणांसोबतच लसूण रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो. प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसच्या संशोधनानुसार, लसणातील 'हायड्रोजन सल्फाइड' रक्तवाहिन्यांना आराम देते, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. यामुळे संसर्ग झालेल्या भागापर्यंत रोगप्रतिकारक पेशी लवकर पोहोचतात आणि जखमा किंवा संसर्ग लवकर बरे होतात.

**लसूण कसा खाणं लाभदायक?**

लसूण हा निसर्गाचा एक चमत्कार आहे जो बॅक्टेरियापासून हृदयापर्यंत सर्वांचे रक्षण करतो. मात्र, याचे औषधी फायदे मिळवण्यासाठी लसूण कच्चा आणि ठेचलेला खाणे अधिक फायदेशीर ठरते, कारण शिजवल्यामुळे त्यातील ॲलिसिनचे प्रमाण कमी होते.

**कच्चा आणि ठेचून खा**

लसूण ठेचल्यावर त्यात 'ॲलिसिन' नावाचा घटक तयार होतो, जो रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यात मदत करू शकतो.

# कडधान्य दीर्घकाळ टिकवायचे आहे?



धान्य साठवण्यासाठी काच, प्लॅस्टिक किंवा ॲल्युमिनियमचे हवाबंद डब्याचा वापर करा. कीड लागू नये म्हणून धान्याच्या डब्यात काही लवंगा ठेवाव्यात, यामुळे कीड लागत नाही व सुगंधही येतो.

कडुलिंबाची सुकलेली पाने असतील तर त्याचाही वापर करता येऊ शकतो. कडधान्यामध्ये कडुनिंबाची पाने टाकल्याने कीड लागत नाही.

कडधान्य शक्यतो ज्या ठिकाणी सूर्यप्रकाश येणार नाही अशा ठिकाणी ठेवावीत. धान्य साठवण्यापूर्वी ते कोरडे आहे का हे तपासून घ्या. नाहीतर त्याला बुरशी लागू शकते. वेळोवेळी कडधान्यांची तपासणी करा.

# अचानक वजन कमी झालंय?



कोणत्याही वयात चांगल्या आरोग्यासाठी वजन नियंत्रण आवश्यक आहे. वजन नियंत्रित करण्यासाठी लोक अनेकदा जिम, डाएटची मदत घेतात.

पण, काही लोकांचं डाएट किंवा वर्कआउट न करताही त्यांचे वजन कमी होऊ लागते. त्यामुळे तुमच्या आरोग्यासाठी हे अत्यंत धोकादायक आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सहा महिन्यांत एकूण शरीराच्या वजनाच्या ५ टक्क्यांहून अधिक घट होणे याला अनएक्सप्लेंड वेट लॉस म्हणतात. आपण अनेकदा कामाचा थकवा किंवा ताण समजून त्याकडे दुर्लक्ष करतो. पण, त्यामागील कारण मोठे आजार सुद्धा असू शकतात.

# भेसळयुक्त माव्याच्या मिठाईमुळे यकृत-मूत्रपिंड धोक्यात?

सणासुदीच्या काळात बाजारात भेसळयुक्त माव्याच्या मिठाया मोठ्या प्रमाणावर विक्रीस येत असल्याच्या घटना समोर येतात. निकृष्ट किंवा भेसळयुक्त माव्यापासून तयार केलेल्या मिठाया आरोग्यास गंभीर अपाय करू शकतात. त्यामुळे गोड पदार्थ खाताना विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.

सणाच्या दिवसांत मिठाईची मागणी वाढते. या संधीचा गैरफायदा घेत काही विक्रेते कृत्रिम दूध, धुण्याची पावडर, यूरिया व इतर घातक रसायनांचा वापर करून बनावट मावा तयार करतात. हा मावा दिसायला आकर्षक असला तरी तो आरोग्यास अत्यंत घातक ठरतो.



**भेसळयुक्त माव्यात कोणती रसायने असतात?**

तज्ज्ञांच्या मते, मावा अधिक पांढरा आणि फेसाळ दिसावा म्हणून त्यात धुण्याची पावडर व कॉस्टिक सोडा मिसळला जातो. वजन वाढवण्यासाठी आणि दूध घट्ट असल्याचा भास निर्माण करण्यासाठी यूरिया व निकृष्ट दर्जाचा स्टार्च वापरला जातो. काही वेळा तेलकटपणा आणण्यासाठी शुद्ध तेलाऐवजी स्वस्त तेल, प्राण्यांची चरबी किंवा इतर निकृष्ट घटक मिसळले जातात. ही सर्व द्रव्ये शरीरासाठी अत्यंत अपायकारक असतात.

**कोणत्या आजारांचा धोका वाढतो?**

अशा माव्याचे सेवन केल्याने अन्नविषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढतो.

खराब माव्यात ई-कोलाईसारखे जंतू वाढतात, ज्यामुळे पोटदुखी, जुलाब व उलट्या होऊ शकतात. दीर्घकाळ अशा रसायनांचा संपर्क आल्यास कर्करोग, अल्सर यांसारख्या गंभीर आजारांची शक्यता वाढते. तसेच टायफॉईड, कावीळ व आतड्यांचे संसर्ग होण्याचाही धोका संभवतो.

**यकृत आणि मूत्रपिंडांवर परिणाम होतो का?**

होय. यूरिया व धुण्याच्या पावडरीतील रसायने थेट मूत्रपिंडांच्या गाळणी प्रक्रियेवर परिणाम करतात. त्यामुळे मूत्रपिंडे नीट कार्य करू शकत नाहीत.

शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्याचे कार्य यकृत करते; मात्र सतत रसायने शरीरात गेल्यास यकृतावर अतिरिक्त ताण येतो. परिणामी रक्तातील विषारी घटक वाढून संपूर्ण चयापचय प्रक्रिया बिघडू शकते.

**कोणती लक्षणे दुर्लक्षित करू नयेत?**

मिठाई खाल्ल्यानंतर २ ते ६ तासांच्या आत तीव्र पोटदुखी, मुरडा व सतत उलट्या होणे ही अन्नविषबाधेची प्रमुख लक्षणे आहेत. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होऊन चक्कर येणे, डोळ्यांसमोर अंधुक दिसणे किंवा रक्तदाब कमी होणे अशी लक्षणेही जाणवू शकतात. त्वचेवर लाल पुरळ, खाज किंवा सूज दिसल्यास ती रासायनिक प्रतिक्रिया असू शकते. अशी कोणतीही लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**सुरक्षिततेसाठी काय करावे?**

नेहमी विश्वासार्ह व नामांकित दुकानांतूनच मिठाई खरेदी करावी. शक्य असल्यास घरी शुद्ध माव्यापासून मिठाई तयार करणे अधिक सुरक्षित ठरते. माव्याची शुद्धता तपासण्यासाठी त्यावर आयोडीनचे काही थेंब टाकावेत; तो निळसर झाला तर भेसळ असण्याची शक्यता असते. अतिशय गडद रंगाच्या किंवा चांदीच्या वर्खाने सजवलेल्या मिठायांपासून दूर राहणे हितावह आहे.

सण साजरा करताना आरोग्याची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. आनंदात गोड खा, परंतु सुरक्षित आणि शुद्ध अन्नाची निवड करा.

# घट्ट पाण्याचा 'तिप्पट' महासागर!

लेखाचं शीर्षक वाचून थोडं कोड्यात पडाल. कारण सागर असेल तर 'घट्ट' स्वरूपाचा कसा आणि 'तिप्पट' म्हणजे काय? अशी अनेक कोडी पृथ्वीमध्ये दडलेली आहेत. आपल्या निळ्या ग्रहाच्या भू-जलपृष्ठावर आपल्यासह असंख्य सजीवांची वस्ती आहे. मात्र समुद्रात विहरणाऱ्या जलचरांचं एक निराळंच जग आहे. महासागरात खूप म्हणजे पॅसिफिक महासागराच्या 'मरिना ट्रेन्स'च्या एका भागात खोल समुद्री जागा आहे. सुमारे ११ किलोमीटर खोलवर! त्याला 'चॅलेन्स डीप' असं म्हणतात. त्यामध्ये जगातलं सर्वोच्च म्हणजे सुमारे ९ किलोमीटर उंचीचं (अर्थात समुद्रसपाटीपासून) 'एव्हरेस्ट शिखर' बुडवलं तरी त्याच्या माथ्यावर २ किलोमीटरपर्यंत 'चॅलेन्स डीप'मधलं सागरजल उसळत राहील. त्यामुळे पॅसिफिक महासागरातली ही जागा जलसाठ्याची सर्वात खोलवरची जागा म्हणता येईल. ज्या प्रकारचं 'एचटूओ' म्हणजे हायड्रोजनचे दोन आणि ऑक्सिजनचा एक अणु यांच्या संयुगातून निर्माण होणारं 'पाणी' आपण पाहतो, अनुभवतो ते लक्षात घेता 'चॅलेन्ज डीप'चं महत्त्व निश्चितच आहे. पृथ्वीवरच्या सागरांमध्ये ७१ टक्के पाणी आहे ते खारट. 'गोडं' पाणी अवघं दीड-दोन टक्के असून ते ध्रुवीय बर्फ, नद्या, तलाव, सरोवर वगैरेत भरलेलं आहे. ते वगळता भूपृष्ठाचा उरलेला भाग आपण राहतो तो भूकवचाचा दगड-धोंडे, माती-पर्वतांचा. मग सर्व महासागरांच्या 'तिप्पट' भरेल एवढं पाणी आहे कुठे? ते आहे, भूकवचापासून ५२५ ते ६६० किलोमीटर खोल 'रिंगवुडराइट' नावाच्या भागात. ते सगळं मिळून पृथ्वीवरच्या सर्व समुद्रांच्या जलसाठ्याच्या 'टिप्पट' आहे! सर्व समुद्र-महासागर वगैरे एकत्र केले तर तो जलनिधी १.३३५ अब्ज घनकिलोमीटर एवढा होईल. एक क्युबिक किलोमीटर (घन किलोमीटर) पाणी लिटरमध्ये मोजलं तर एक ट्रिलियन लिटर (एकावर १२ शून्य) एवढं होतं. असे एक अब्जापेक्षा अधिक घनकिलोमीटर पाणी पृथ्वीवर आपल्याला दिसतं.



त्याच्या तिप्पट म्हणजे सुमारे ३ अब्ज घनकिलोमीटरपेक्षा अधिक 'अदृश्य' पाणी दडलं आहे ते पृथ्वीच्या कवचाखालच्या 'रिंगवुडराइट' भागात!

पृथ्वीमधलं हे 'रिंगवुडराइट' सोप्या शब्दात सांगायचं तर काहीसा 'स्पंज'सारखा द्रव शोषणारा भाग असून या सुमारे अडीचशे किलोमीटर जाडीच्या भूगर्भीय रचनेत प्रचंड पाणी साठलेलं आहे. हा सर्व भाग उच्च दाबाच्या मॅग्नेशिअम सिलिकेटचा बनलेला असून त्यामध्ये हायड्रॉक्साइड आयन (विद्युतभारित कण) आहेत. ते १ मॅग्नॅशिअम आणि २ ऑक्साइड आयनपासून बनतात. याच्या अधिक तांत्रिक चर्चेत न जाता आपण या विशाल, परंतु अज्ञात जलस्रोताची विस्मयकारी माहिती तेवढी घेत आहोत. कारण विज्ञान 'रंजक'पणे जाणून घेण्याचा आपला प्रयत्न आहे. त्यातून एखाद्याला भूगर्भशास्त्रचा (जिओलॉजीचा) अभ्यास करण्याची ऊर्मी आली तर उत्तमच.

हे 'रिंगवुडराइट'सारखं खनिज पहिल्यांदा आढळलं ते 'तेन्हाम' (१८७९) नावाच्या एका अशनीच्या तुकड्याचा अभ्यास करताना. ही गोष्ट १९६९ मधली. तेच पृथ्वीच्या अंतर्भागात मोठ्या प्रमाणावर दडल्याचं नंतर आढळलं. पृथ्वीच्या 'मॅन्टल'मधील (कवचाखाली) ऑलिविन आणि पायरोक्झिनवर सुमारे ६०० किलोमीटर भूकवचाखाली येणा?या दाबाचा (प्रेशरचा) काय परिणाम होतो याचा अभ्यास ऑस्ट्रेलियन भूगर्भतज्ज्ञ टेड रिंगवूड करत होते. त्यावेळी त्यांना या जलशोषक भूमीगत थराचा शोध लागला. त्यामुळे त्याला त्यांचं नाव मिळालं. ते पृथ्वीवर येणा?या अनेक अंतराळी 'अशनी'मध्येही दिसून येतं. त्यांची जलशोषक शक्ती मोठी असते.

मात्र या 'रिंगवुडराइट' भागात पाणी येतं कुठून? असा प्रश्न 'गुगल'ला केलात तर समजेल की, पृथ्वीवरच्या दृश्य जलसाठ्यामधलंच पाणी लाखो वर्षे 'प्लेट टॅक्टॉनिक'मधल्या भेगांमधून झिरपून प्रचंड दाबाखाली 'हायड्रॉक्साइ रॅडिकल'मध्ये परावर्तित होऊन भूगर्भात साचलं आहे.

आता पृथ्वीचं साडेचार अब्ज वर्षांचं वय लक्षात घेतलं तर आतापर्यंत झिरपून 'क्रिस्टल' स्वरूपात साठलेल्या पाण्याचं प्रमाण प्रचंड असणारच. गमतीचा भाग म्हणजे पृथ्वीच्या याच भागात तयार झालेल्या एका हि?याचं पृथक्करण २०१४ मध्ये केलं तेव्हा त्यातही १.४ टक्के जलांश आढळले. समजा, पृथ्वीच्या अंतर्भागात काही उलथापालथ घडून हे घट्ट स्वरूपात दडलेलं सगळं पाणी द्रवरूपात (एच२ओ) भूपृष्ठावर आलं तरष्ठ तर मात्र जलचरांची वस्ती वगळता बाकीचे सजीव, झाडापानांसह सर्वच त्यात बुडून जातील. हा प्रलय एवढा मोठा आणि व्यापक असेल की हिमालय, आल्पस ऑन्डिज वगैरे पर्वतांची उंचच उंच शिखरं पृथ्वीवरच्या पाण्यातून थोडीफार वर डोकावतील. त्यावर कोणी 'सजीव' टिकले तर ते पृथ्वीवरचे भाग्यशाली ठरतील. पायाखालची जमीन सरकणे नव्हे, तर बुडणे म्हणजे काय त्याचा अनुभव प्रगत माणसालासुद्धा येईल. शिवाय ते पाणी उकळतं, उष्ण असेल! अर्थात हा केवळ गणिती कल्पनाविलास. असं काहीच घडणार नाही. मात्र भूकवचाखालचं पाणी कधीतरी वर येऊन समुद्राला कायमचं उधाण आणून पृथ्वी बुडण्याआधीच आपल्या जीवसृष्टीला वेगळ्या अर्थाने 'बुडवायला' माणूस किती 'सक्षम' आहे हे पर्यावरण ऱ्हासाबरोबरच सध्या ठिकठिकाणी उसळलेल्या युद्धज्वराच्या आगडोंबातून दिसतंच आहे.

# हिंदू नववर्षाची सुरुवात 'गुढीपाडवा'



हिंदू नववर्षाची सुरुवात गुढीपाडव्यापासून होते. विशेषत: महाराष्ट्रात गुढीपाडव्याच्या सणाचा मोठा उत्साह पाहायला मिळतो. गुढी म्हणजे विजय पताका. गुढीपाडव्याच्या दिवशी मांगल्याचे प्रतीक म्हणून घरोघरी गुढी उभारण्याची परंपरा आहे. त्यासह घराबाहेर रांगोळ्या काढणे आणि घर सजवण्याची परंपरा आहे. हिंदू दिनदर्शिकेनुसार, गुढीपाडवा हा साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मानला जातो. यंदा हा सण १९ मार्च रोजी साजरा होणार आहे. हा दिवस मराठी नववर्षाची सुरुवातही मानला जातो. त्यामुळे गुढीपाडवा हा सण कशा प्रकारे साजरा केला जातो, शुभ मुहूर्त, तिथी आणि महत्त्व जाणून घेऊ

यंदा चैत्र महिन्यातील प्रतिपदा तिथी १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ०६ वाजून ५५ मिनिटांनी सुरू होणार असून. ती २० मार्च २०२६ पहाटे ०४ वाजून ५० मिनिटांपर्यंत असेल. अशा परिस्थितीत उदय तिथीनुसार १९ मार्च रोजी गुढीपाडवा हा सण साजरा केला जाईल.

महाराष्ट्रात गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. लोक या सणानिमित्त पहाटे लवकर उठून स्नान करून मग दारासमोर गुढी उभारतात आणि त्याची पूजा करतात. काठीवर तांब्याचा लोटा उलटा आणि त्याखाली लाल, पिवळे, भगवे रेशमी कापड बांधले जाते. फुलांच्या माळा आणि आंब्याच्या पानांनी सजवले जाते. त्यासह साखरेचे तोरण आणि कडुलिंबाचा टाळ बांधला जातो. त्यानिमित्ताने घरासमोर फुलांची तोरणे बांधली जातात किंवा रांगोळ्या काढल्या जातात. घराबाहेर बांधलेल्या गुढीमुळे नकारात्मक शक्ती रोखली जाते, असे मानले जाते. गुढीपाडवा हा सण साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी लोक नवीन घर, गाडी किंवा नव्या कामांची सुरुवात करतात.

महाराष्ट्रभर ठिकठिकाणी गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा काढल्या जातात. मुंबई, पुणे, ठाणे यांसह अनेक ठिकाणच्या शोभायात्रा या नेहमी चर्चेचा विषय असतात. अनेक महाराष्ट्रीय तरुण, तरुणी या सणाच्या निमित्ताने पारंपरिक मराठमोळ्या गेटअपमध्ये शोभायात्रांमध्ये सहभागी होतात. लोक सणानिमित्ताने आपल्या जवळच्या व्यक्तींना भेटतात; पण केवळ महाराष्ट्रातच नाही, तर इतर राज्यांमध्येही हा सण साजरा करण्याची परंपरा आहे.

# शेवटपर्यंत मराठीच!

मुंबईवर 'अदानी' सारख्यांचे संकट घोंघावत असताना किती गुजराती बांधव महाराष्ट्राच्या बाजूने उभे राहिले? जर ते मुंबई-महाराष्ट्रापेक्षा अदानीवर त्यांचा जीव ओवाळून टाकणार असतील तर प्रत्येक मराठी माणसाला भाषा व महाराष्ट्र धर्म म्हणून आवाज उठवावाच लागेल. प्रश्न घाटकोपरच्या स्मशानभूमीतल्या गुजराती 'पावत्यां'चा नाही, तर महाराष्ट्राचेच खाऊन मराठीशी बेइमानी करणाऱ्या 'पावट्यां'चा आहे. आज स्मशानभूमीत आक्रमण झाले, उद्या गेटवे ऑफ इंडियाचे रंगरूप बदलण्याचा प्रयत्न होईल. त्यानंतर हुतात्मा चौकावर आक्रमण होईल. संख्याबळावर, पैसा व सत्तेच्या मुजोरीवर कोणालाही मराठीचा अपमान करता येणार नाही. त्यांच्या गोवऱ्या घाटकोपरच्या स्मशानभूमीतच रचल्या जातील!

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या. वगैरे महापौर विराजमान झाला. सर्व सोपस्कार पार पडले. त्यामुळे भाजपने निवडणुकीसाठी तोंडावर चढवलेला मराठी प्रेमाचा मुखवटा उतरवून घाटकोपरच्या स्मशानात फेकला आहे. जणू भाजपचा 'हिंदू मराठी' मराठीची चिताच हिंदू स्मशानभूमीत पेटवली. घाटकोपरच्या स्मशानभूमीतील मृत्यू नोंदीच्या पावत्या गुजरातीमधून



दिल्या जात आहेत व यावर आता गदारोळ उठला आहे. स्मशानभूमीत भाषिक वादाची ठिणगी पडली हे बरे नाही, पण घडले खरे. पालिकेचे सर्व दाखले मराठी आणि इंग्रजीतच हवेत असा नियम जुनाच आहे. आधी मराठी, मग इतर सगळे असे असताना त्यात गुजराती भाषा घुसवली कोणी? मुंबई पालिकेच्या अधिकृत चिन्हांसह या पावत्या कित्येक दिवसांपासून वितरित होत आहेत व या भागाचे पालिकेतले प्रतिनिधित्व विद्यमान महापौर श्रीमती रितू तावडे करीत आहेत.

हीच खरी गोम आहे. मराठीच्या बाबतीत भाजपने घेतलेल्या या भूमिकेचा धिक्कार करावा तेवढा थोडाच. मराठीची अधिकृत गळचेपी करण्याची ही सुरुवात आहे.

एखाद्या रेल्वे फलाटाचे नाव गुजरातीत रंगवणे, कुठे रस्त्यांची नावे गुजरातीत करणे, तर कुठे पावत्या वगैरे गुजरातीत छापणे, असे केल्याने मराठीवर आक्रमण करता येईल या भ्रमात कोणी असेल तर ते सर्वस्वी चूक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अलीकडेच ठणकावून वगैरे सांगितले की, ''महाराष्ट्रात फक्त मराठीचीच सक्ती राहील.''

# चिव चिव चिमणी

आधीच्या 'जेन-एक्स', 'जेन-वाय', 'जेन-झी' असो, नाहीतर आताची 'जेन-अल्फा.' मराठी घरात जन्माला आलेल्या या सगळ्या पिढ्यांनी त्यांच्या लहानपणी एक गोष्ट हमखास ऐकलेली असते ती म्हणजे कावळा-चिमणीची गोष्ट. त्यातलं 'चिऊताई चिऊताई दार उघड' किंवा 'थांब माझ्या बाळाला न्हाऊ घालू दे' हे पालुपद कधीही ऐकलं की, प्रत्येकाला आपलं बालपण आठवतं. 'इसापनीती'त ससा आणि चिमणी, भुंगा आणि चिमणी, पोपट आणि चिमणी, कोळी आणि चिमणी अशा कथा आहेत. चिमणी या पक्ष्यावर अनेक बालगीतं रचली गेलेली आहेत. त्यातली काही लोकगीतं, अंगाई गीतं आहेत. चिमणी हा पक्षी तसा जगभर आढळतो, पण तो दाट जंगलात फारसा आढळत नाही. मानवी वस्तीच्या आजूबाजूला त्याचा अधिक वावर असतो. त्याच्या 'चिव् चिव्' आवाजावरून चिवणी-चिमणी नाव पडल्याचं म्हटलं जातं. उत्तर भारतीय भाषांमध्ये त्याची चिडि, चिडी, चिडिया अशी रूपं आहेत. कृ. पां. कुलकर्णी यांच्या मते, चिमणी हा शब्द मूळ कोल भाषेतील आहे. मध्य प्रदेश, ओडिशा, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये कोल या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. ही



जमाती प्राचीन जमातींपैकी एक मानली जाते.

सर्व पक्ष्यांमध्ये चिमणी हा पक्षी आकाराने फार लहान असतो. त्यावरून चिमण किंवा चिमणा म्हणजे लहान हा अर्थ रूढ झाला असावा. 'चिमणसाळ' ही तांदळाची एक जात आहे. त्याच्या लहान आकारावरून त्याला हे नाव पडलं असावं. लहान मुलांच्या खाऊला 'चिमणचारा' म्हटलं जाई, तर लहान बागेला चिमनबाग. चिमुकले, चिमणसे हे शब्दही लहान याच अर्थाचे आहेत. जगदीश खेबुडकरांचं 'बाई बाई, मनमोराचा कसा पिसारा फुलला' हे आजही लोकप्रिय असलेलं गीत आहे. या गीताच्या पुढील ओळी आहेत – 'चिमनी मैना चिमना रावा, चिमन्या अंगणी चिमना चांदवा, चिमनी जोडी चिमनी गोडी, चोच लाविते चिमन्या चा? याला, चिमनं चिमनं घरटं बांदलं चिमन्या मैनेला' या गाण्यात 'चिमनी', 'चिमना', 'चिमन्या' या शब्दांनी निर्माण केलेल्या अनुप्रासामुळे एक अनवट लय निर्माण झाली आहे. हे सगळे शब्द लहान या अर्थाचेच आहेत.

'पालख पाळणा मोत्यांचा खेळणा, जोजवीते बाई माझा लाडका चिमणा' या अंगाई गीतातील चिमणा शब्दही आई आपल्या तान्हुल्या बाळाला उद्देशून म्हणते आहे. मूल बोलायला शिकतं तेव्हा अडखळत बोलतं. लहान मुलांच्या या बोलण्याला 'चिमखडे बोल' असा समर्पक शब्द आहे.

यावरून आठवलं लहान असताना एखादा पदार्थ वाटून घ्यायचा असला म्हणजे तो चिमणीच्या दाताने म्हणजे वस्त्रात गुंडाळून पहडला जाई व मग वाटून खाल्ला जाई. यावरून दिसतं की, पक्ष्यांनी फळ चोचीने टोचलं तरी ते खराब होत नाही, ही समजूत बरीच जुनी असावी. 'चिमणीसारखे तोंड करणे' असा एक वाक्प्रचार आहे. सबंध चिमणी केवढीशी, त्यात तिचं तोंड आणखी इवलं!

# कामगारांच्या जीवावर उठलेले स्फोटक कारखाने

कळमेश्वर तालुक्यात राउळगाव येथील एसबीएल स्फोटक कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण परिसर हादरून गेला. या दुर्घटनेत १९ कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक जखमी अद्याप मृत्यूशी झुंज देत आहेत. वारंवार घडणाऱ्या अशा स्फोटांमुळे स्फोटक उद्योगातील सुरक्षा आणि प्रशासनाच्या जबाबदारीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. रविवारची सकाळ उजाडली ती नागपूर जिल्ह्यात कळमेश्वर तालुक्यातील राउळगाव येथील एसबीएल या स्फोटकांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटाच्या बातमीने. सकाळी ६ ते ७ च्या सुमारास या कारखान्यात स्फोटकांच्या साठ्यामध्ये स्फोट झाले. त्यात कारखान्याची इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी तर पडलीच, पण कारखान्यात कार्यरत असलेल्या १९ श्रमिकांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे, तर २२ श्रमिक गंभीररीत्या जखमी असून ते अद्यापही मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नागपूर जिल्हा हादरला, तर जिल्हा प्रशासन अ?क्शन मोडवर आले आहे.

या स्फोटाची बातमी कळताच प्रशासन सतर्क झाले असून प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याचबरोबर या परिसराचे आमदार चरणसिंह ठाकूर, तसेच माजी आमदार आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख, जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख यांनीही घटनास्थळी धाव घेतली. काही वेळाने नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे देखील घटनास्थळी पोहोचले होते. चंद्रशेखर बावनकुळे हे तेव्हापासून सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. या परिसरात असे स्फोटकांचे ११ पेक्षा अधिक कारखाने असून गेल्या दीड वर्षांत इथे झालेल्या २३ स्फोटांमध्ये जवळजवळ ४३ कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे, तर अनेक कामगार कायमचे जायबंदी झालेले आहेत. गेल्या सप्टेंबरमध्ये येथून जवळच असलेल्या कोंढाळी परिसरातील सोलार एक्सप्लोजिव्हज या कारखान्यात मोठा स्फोट झाला होता, तर वर्षभरापूर्वी जवळच कोतवालवाडी येथे असलेल्या एका स्फोटकांच्या कारखान्यातही असाच स्फोट झाला होता आणि त्यात काही मजूर मृत्युमुखी पडले होते, तर काही जायबंदी सुद्धा झालेले आहेत. एकूणच या परिसरात ही स्फोटांची मालिका सातत्याने सुरूच आहे, परिणामी जनजीवन विस्कळीत होत आहे. मात्र प्रशासन याबाबत काय करते आहे हा देखील प्रश्न निर्माण होतो आहे. रविवारी घडलेल्या घटनेत एसबीएलचे मालक संजय चौधरी आणि आलोक चौधरी यांच्यासह २१ जणांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. यात १० व्यक्तींना अटक झाली असली तरी मालक मात्र फरारच आहे. कारखान्याचे प्रबंध संचालक मात्र अटकेत असून त्यांच्यासह सर्व १० आरोपींना सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना एसबीएल कंपनीच्या वतीने प्रत्येकी ७५ लाख रुपये, राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी ५ लाख रुपये, तर केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येकी २ लाख रुपये अशी एकूण ८२ लाख रुपयांची



मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. या प्रकरणात जखमी झालेल्यांना कंपनीकडून प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहिती देखील कंपनीच्या वतीने सांगण्यात आली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच नागपूरचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली असून जखमींच्या नातेवाइकांना दिलासा देण्याचे कामही केले आहे.

अनेक कुटुंबांमधील कर्ता पुरुष अपघातात दगावला, तर १४ महिला कामगार देखील या स्फोटात जळून खाक झाल्या. या महिलांच्या चिमुकल्यांचा आक्रोशही बघवत नव्हता. सर्व मृतदेह जळाल्याने ते ओळखणे देखील कठीण झाले होते. शेवटी दोन दिवसांनंतर सर्व मृतदेहांची डीएनए चाचणी करून नंतर ते कुटुंबीयांच्या हवाली करण्यात आले. बहुतेक जखमी कामगारांना नागपूरच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले असून तिथेच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे तिथे देखील नातेवाइकांनी गर्दी केली आहे. वस्तूतः स्फोटकांचा कारखाना हा एक जिवंत बॉम्बच असतो. इथे पुरेपूर सुरक्षा व्यवस्था ठेवणे गरजेचे असते. तसेच इथे काम करणाऱ्या कामगारांना देखील पुरेसे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. मात्र गेल्या दीड वर्षांत झालेल्या २३ स्फोटांच्या घटनांमध्ये कारखान्यात कामगारांना असे प्रशिक्षण दिले नसल्यामुळे आणि तिथे पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवली नसल्यामुळे हे स्फोट झाले असल्याचे सांगितले जात आहे. वस्तुतः नागपुरात डायरेक्टोरेट ऑफ एक्स्प्लोजिव्जचे मुख्यालय आहे. त्यामुळे इथे पुरेशी काळजी घेतली जाणे गरजेचे होते. मात्र त्यांचे दुर्लक्ष झालेच पण जिल्हा प्रशासनाचे देखील अक्षम्य दुर्लक्ष झालेले दिसते. मिळालेल्या माहितीनुसार येत्या सोमवारी सर्व घटकांच्या स्फोटकांच्या कारखान्यांचे संचालक, वरिष्ठ अधिकारी तसेच शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी यांची एक संयुक्त बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

या स्फोटाचे पडसाद राज्याच्या विधिमंडळात देखील बुधवारी उमटले. विरोधी पक्षांनी तर याबाबत सरकारला जाब विचारलाच पण सत्ताधारी आमदारांनी देखील प्रशासनाच्या दुरवस्थेबद्दल तक्रारी केल्या. आता मानवाधिकार आयोगाने देखील या प्रकरणाची दखल घेतली असून राज्य सरकारला दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान या प्रकरणात आतापर्यंत अकरा आरोपींना अटक करण्यात आली असून ते पोलीस कोठडीत आहेत, तर उर्वरित दहा आरोपी फरार घोषित करण्यात आले आहेत. त्यांच्याबाबत लुकाऊट नोटीस देखील जारी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मात्र घटना घडताच हे आरोपी पोलीस आणि प्रशासनाला गुंगारा देऊन इथून पळून गेले आहेत हे निश्चित. स्फोटक निर्मितीच्या कारखान्यात असे स्फोट झाले तर कारखान्याचे तर नुकसान होतेच आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांचे नाहक बळी जातात. मात्र त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसराला देखील त्याचे धक्के बसतात. त्यामुळे अशा कारखान्याच्या आसपासचे नागरिक कायम दहशतीतच जगत असतात. हे लक्षात घेऊन आता प्रशासनाने नागरी सुरक्षेचाही विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नवीन कारखाना आला की, त्या परिसरातील बेकारांना रोजगार मिळतो आणि परिणामी त्या परिसराचे दरडोई उत्पन्न देखील वाढते. मात्र जर असे प्रकार होऊन नाहक जीव जाणार असतील तर असा विकास काय कामाचा असाही प्रश्न विचारला जात आहे. या घटनेनंतर एसबीएल कंपनीला प्रशासनाकडून टाळे ठोकण्यात आले असून त्यांचा स्फोटक निर्मितीचा परवाना देखील रद्द करण्यात आला आहे. ही घटना घडून गेल्यावर अशी कारवाई करण्यापेक्षा आधीच दुर्घटना कशी टाळता येईल यावर उपाययोजना करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.